
ऑक्टोबर २०२१/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य




'प्रबोधन' शताब्दी वर्ष विशेष

# स्वर्णिम विजय मशालीचे स्वागत




भारताने १९७१ मधील पाकिस्तान विरोधातील युद्धात मिळवलेल्या विजयानिमित्त काढण्यात आलेल्या स्वर्णिम विजय मशालीचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते गेट-वे-ऑफ इंडिया येथे समारंभपूर्वक स्वागत करण्यात आले. ही मशाल दिल्ली येथून जैसलमेर, द्वारका, वडोदरा असे साडेचार हजार किमीचे अंतर पार करून मुंबईत दाखल झाली.

या वेळी राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे, कृषिमंत्री दादाजी भुसे, गृह राज्यमंत्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, मुख्यमंत्र्यांच्या पत्नी श्रीमती रश्मी ठाकरे तसेच लेफ्टनंट जनरल एस.के. प्राशर, एअर व्हॉईस मार्शल एस.आर. सिंग, वेस्टर्न नेव्हल कमांडचे व्हॉईस ॲडमिरल आर. हरिकुमार यांच्यासह तिन्ही दलांचे अधिकारी उपस्थित होते.

भारताने पाकिस्तानला १९७१च्या युद्धात नमवले होते. या युद्धाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त देशभर 'स्वर्णिम विजय वर्ष' साजरे करण्यात येत आहे. त्यानिमित्त स्वर्णिम विजय मशालीची देशभर परिक्रमा सुरू आहे. या स्वर्णिम विजय मशालीचे १ सप्टेंबर रोजी मुंबईत आगमन झाले.

## ६ पर्यटकांसाठी सर्वकाही

राज्यातील पर्यटनाला चालना देण्याच्या अनुषंगाने मागील दोन वर्षांपासून राज्य शासनामार्फत अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. कोरोनाच्या संकटामुळे जगभरातील पर्यटन ठप्प झाले होते. देशातील आणि राज्यातील पर्यटनही या काळात ठप्प होते. पण पर्यटन बंद असले तरी या काळात राज्यात विविध पर्यटनविषयक धोरणांची आखणी करण्यात आली.



## १९ रोजगाराचे महाद्वार

पर्यटनस्थळी आलेला पर्यटक हा फिरण्यासाठी वाहनाचा वापर करतो. त्याद्वारे वाहन चालक, मालक आणि वाहतुकीशी संबंधित पेट्रोलपंप इत्यादी ठिकाणी व्यवसायाला आणि रोजगाराला चालना मिळते. पर्यटक एखाद्या लॉज किंवा हॉटेलमध्ये मुक्काम करतो. त्याचबरोबर तो रेस्टॉरंटमध्ये खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतो. या माध्यमातून संबंधित सर्व क्षेत्रातील लोकांना व्यवसाय आणि रोजगार मिळतो.



## १० कोकण विकासाची गुरुकिल्ली

राज्यावर आलेले कोरोनाचे संकट जगभर पसरले आणि याचा सर्वांत जास्त परिणाम पर्यटन क्षेत्रावर झाला पर्यटन व्यावसाय आता पूर्ववत करण्यासाठी शासनस्तरावर विविध उपाययोजना करून पर्यटनाला चालना देण्यात येत आहे. कोकण पर्यटनाला चालना देण्यासाठी बीच शॅक धोरण राबवून समुद्रकिनाऱ्यांचा क्षमतेनुसार विकास करण्यात येत आहे.



## २१ इलेक्ट्रिक वाहन धोरण

जगभर वातावरणीय बदल होत आहे. वातावरणातील या बदलाचे गंभीर परिणाम आपण सर्वच जण अनुभवत आहोत. राज्य शासनाने इलेक्ट्रिक वाहन धोरणाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक पाऊल टाकले आहे आणि यासाठी पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागाने पुढाकार घेतला आहे.




## १६ साद निसर्गाची

महाराष्ट्राला जंगलसमृद्धीचे वरदान लाभले आहे. राज्य शासनानेही महाराष्ट्राच्या या समृद्धीचे जतन केले असून जंगले महाराष्ट्राच्या वैशिष्ट्याचा अविभाज्य भाग झाली आहेत. वनपर्यटनातून विविध संधी निर्माण होत असून, राज्य शासन वनपर्यटनाकडे गांभीर्याने पाहत असून राज्याच्या पर्यटन विकासासाठी राज्य शासन विविध निर्णय घेत आहे.



## 'प्रबोधन' शताब्दी वर्ष

महाराष्ट्राच्या वैचारिक चळवळीचा व पुरोगामी परंपरेचा वारसा पुढे नेण्यासाठी प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांनी सुरू केलेल्या 'प्रबोधन' या पाक्षिकाचे १६ ऑक्टोबर २०२० ते १५ ऑक्टोबर २०२१ हे 'शताब्दी वर्ष' आहे. त्यानिमित्ताने हा विशेष विभाग.. (पृष्ठ क्र. ४५-५८)




| | |
|---|---|
| पर्यटकांसाठी सर्वकाही | ६ |
| कोकण विकासाची गुरुकिल्ली | १० |
| महापर्यटन... महासंधी | १२ |
| साद निसर्गाची | १६ |
| रोजगाराचे महाद्वार | १९ |
| इलेक्ट्रिक वाहन धोरण | २१ |
| पाऊल पडते पुढे | २५ |
| मंत्रिमंडळात ठरले | ३७ |
| लसीकरणाचा विक्रम | ४२ |
| प्रबोधन शताब्दी वर्ष | ४५ |
| जोखडमुक्त समाजासाठी | ४६ |
| 'प्रबोधन'ची संघर्षगाथा | ५० |
| प्रबोधनाच्या वाटा... | ५४ |
| पत्रकार घडवणारे प्रबोधनकार | ५७ |

वर्ष ७३ वे | अंक ४ | ऑक्टोबर २०२१

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — डॉ. दिलीप पांढरपट्टे
- प्रबंध संपादक — गणेश रामदासी, दयानंद कांबळे
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, गजानन पाटील, राजाराम देवकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. प्रिंट प्लस प्रा.लि., पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# जगभरातील पर्यटकांना आकर्षित करा : मुख्यमंत्री

**कोविडचा** सर्वाधिक फटका पर्यटन क्षेत्रालाही बसला आहे. तथापि या कालावधीत पर्यटन विभागाने कोविडनंतर पर्यटन क्षेत्र विकसित करण्यासाठीचे धोरण आणि नियोजन केले. सध्या सुरू असलेल्या कामाच्या माध्यमातून 'महा'राष्ट्र खऱ्या अर्थाने जगासमोर येईल. येणाऱ्या काळात राज्यात येणारा प्रत्येक पर्यटक आपला ब्रँड ॲम्बेसेडर झाला पाहिजे, इतक्या चांगल्या दर्जाचे पर्यटन महाराष्ट्रात विकसित व्हावे. पर्यटनाला असलेले महत्त्व अधोरेखित करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाची एक बैठक डेक्कन ओडिसी रेल्वेमध्ये घेण्यात येईल. राज्यातील पर्यटनाचे वैभव जपा, जोपासा, वाढवा आणि हे करत असतानाच पर्यटन क्षेत्रात स्वतःची शैली निर्माण करून जगभरातील पर्यटकांना आकर्षित करा, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

पर्यटन विभागाद्वारे सह्याद्री अतिथिगृह येथे जागतिक पर्यटन दिन सोहळा संपन्न झाला, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे उपस्थित होते. पर्यटन राज्यमंत्री कु. आदिती तटकरे या ऑनलाइन उपस्थित होत्या. या वेळी पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव वल्सा नायर सिंह, एमटीडीसीच्या व्यवस्थापकीय संचालक जयश्री भोज, पर्यटन संचालक मिलिंद बोरीकर, सहसंचालक डॉ. धनंजय सावळकर आदी उपस्थित होते.

पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी कोविडनंतर पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पर्यटन विभागामार्फत सुरू असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. पर्यटन राज्यमंत्री कु. आदिती तटकरे यांनी ऑनलाईन शुभेच्छा देताना सध्या विभागामार्फत आखलेल्या योजना आणि धोरणांचा भविष्यात पर्यटन विकासाला निश्चित लाभ होईल, असा विश्वास व्यक्त केला.

पर्यटनाला अधिक चालना देण्यासाठी दरवर्षी २७ सप्टेंबर या दिवशी जागतिक पर्यटन दिन साजरा करण्यात येतो. या वर्षी संयुक्त राष्ट्र जागतिक पर्यटन संघटनेतर्फे 'पर्यटनातून सर्वांगीण विकास' हे घोषवाक्य जाहीर करण्यात आले आहे.





## संकेतस्थळ, ॲपचे उद्घाटन

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते महाराष्ट्र पर्यटनाच्या सुधारित संकेतस्थळाचे व 'महाराष्ट्र टुरिझम' या मोबाईल ॲपचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी पर्यटन संचालनालयाच्या कोकण पर्यटन विभागाच्या बेलापूर, नवी मुंबई येथील नव्या कार्यालयाचे ऑनलाइन उद्घाटन करण्यात आले.

# प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा...

***केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार,***
***शास्त्रग्रंथ विलोकन, मनुजा, चातुर्य येतसे फार...***

हे सुभाषित जेवढे आपण घोकले तेवढेच किंबहुना अधिक जगाने स्वीकारले आहे. त्यामुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेचा कणाच पर्यटन झाला आहे. महाराष्ट्र शासन पर्यटन क्षेत्राच्या विकासाला देत असलेली चालना बघता महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग पर्यटन क्षेत्र नक्की होईल, यात शंका नाही. महाआघाडी शासनाने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली व पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे आणि राज्यमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यटन विभागाने सुमारे दोन वर्षांत घेतलेल्या निर्णयांमुळे कोविडपश्चात महाराष्ट्राच्या पर्यटनक्षेत्राचा चेहरामोहरा बदलणार आहे. कोविडपश्चात निर्माण होणाऱ्या संधी साधण्यासाठी पायाभूत सुविधांच्या विकासावर जे काम सुरू केले आहे, ते अतुलनीय आहे.



महाराष्ट्राला निसर्गाचे खूप मोठे वरदान मिळाले आहे. येथे पर्वतांच्या रांगा आहेत तसेच खूप सुंदर समुद्रकिनारे आहेत, जैवविविधतेने नटलेली जंगले आहेत तसेच इतिहासाच्या खुणा अंगावर मिरवणारे दुर्ग आहेत. जगाच्या दृष्टीने हेरिटेज ठरणाऱ्या वास्तू आहेत तसेच लोणारसारखे निसर्गनिर्मित सरोवर आहे. महाराष्ट्र त्यामुळे पर्यटन नकाशावर अधिक समृद्ध आणि वैशिष्ट्यपूर्ण दिसतो.

***बहु असोत सुंदर संपन्न की महा***
***प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा...***

या ओळींमध्ये कसलीही अतिशयोक्ती नसल्याचे आपण अभिमानाने म्हणू शकतो. आलेल्या पर्यटकाने जास्तीत जास्त काळ महाराष्ट्रात गुंतवावा, यासाठी आदरातिथ्य क्षेत्राच्या सक्षमीकरणावर शासनाने भर दिला आहे. राज्य शासनाने पर्यटनविकासासाठी अनेक धोरणे राबवण्यास सुरुवात केली असून त्यातून रोजगार वाढीसाठीही खूप मोठी मदत मिळणार आहे. स्थानिकांना त्याचा लाभ होणार आहे. महाराष्ट्र पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी कशा पद्धतीने पुढे येत आहे, याबाबत या अंकात विशेष लेखांचे समायोजन केले आहे. राज्य शासन राबवत असलेले विविध उपक्रम, योजना आणि त्यातून भविष्यात त्याचा स्थानिकांसह राज्याच्या अर्थव्यवस्थेला होणार असलेल्या लाभाबाबतचा ऊहापोह या अंकात केला आहे.

महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, राजकीय, शैक्षणिक, कला आदी क्षेत्रांमध्ये अनेक मान्यवरांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. तसेच पुरोगामी महाराष्ट्राच्या वैचारीक जडणघडणीमध्ये उल्लेखनीय असे कार्य करून अनेक प्रबोधनपर नियतकालिकांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्याच पद्धतीने प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांनी आपल्या क्रांतिकारक विचारांना समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी आणि त्यातून सामाजिक घुसळण निर्माण करण्यासाठी 'प्रबोधन' हे नियतकालिक चालवले. 'प्रबोधन' नियतकालिक हा प्रबोधनकार ठाकरे यांनी समाजातील अनिष्ट प्रथा आणि परंपरेवर चालवलेला क्रांतिकारक प्रहार आहे. 'प्रबोधन'चे हे शताब्दी वर्ष असून यानिमित्त एक स्वतंत्र विभाग या अंकात समाविष्ट करण्यात आला आहे. सामाजिक सुधारणेत प्रबोधनकार ठाकरे यांची लेखणी अतिशय तेजस्वी आणि महाराष्ट्राची पुरोगामी दिशा ठरवणारी आहे. तत्कालीन परिस्थितीत प्रबोधन नियतकालिक चालवणे हे किती धाडसाचे आणि क्रांतिकारक पाऊल होते, याची जाणीव नव्या पिढीला नक्कीच होईल.

याशिवाय मंत्रिमंडळात ठरले, महत्त्वाच्या घडामोडी ही सदरे आणि कोविडसंदर्भात राज्य शासन राबवत असलेल्या उपाययोजनांचा समावेश या अंकात केला आहे. या महिन्यात विजयादशमी आहे. विजयादशमी 'वाईटावर चांगुलपणाची मात' हा संदेश देते. आपले सण आणि उत्सव साजरे करताना कोरोना महामारी अजून संपली नाही, याकडे विशेषत्वाने लक्ष देऊन त्याबाबत काटेकोरपणे नियम पाळावेत, अशी विनंती यानिमित्ताने करणे अगत्याचे वाटते.

**डॉ. दिलीप पांढरपट्टे**
(मुख्य संपादक)

# पर्यटकांसाठी सर्वकाही

**राज्यातील पर्यटनाला चालना देण्याच्या अनुषंगाने मागील दोन वर्षांपासून राज्य शासनामार्फत अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. कोरोनाच्या संकटामुळे जगभरातील पर्यटन ठप्प झाले होते. देशातील आणि राज्यातील पर्यटनही या काळात ठप्प होते. पण पर्यटन बंद असले तरी या काळात राज्यात विविध पर्यटनविषयक धोरणांची आखणी करण्यात आली. पर्यटन विकासाला चालना देणारे अनेक निर्णय घेण्यात आले.**

**आदित्य ठाकरे**
पर्यटन मंत्री

कोरोनोत्तर काळात पर्यटन क्षेत्राला फार महत्त्व प्राप्त होणार आहे. या दृष्टीने देशातील तसेच जगभरातील पर्यटकांना महाराष्ट्राकडे आकर्षित करण्यासाठी व्यापक प्रयत्न करण्यात येत आहेत. आदरातिथ्य क्षेत्राला प्रोत्साहन, कृषी पर्यटन धोरण, बीच शॅक धोरण, साहसी पर्यटन धोरण, कॅराव्हॅन टुरिझमसाठी स्वतंत्र धोरण, गडकिल्ल्यांचा पर्यटन विकास, नवनवीन पर्यटनस्थळांची निर्मिती, देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईचा पर्यटनविकास, सागरकिनारे, जंगल, हेरिटेज स्थळे यांच्या पर्यटनविकासास चालना देण्यात येत आहे. महाराष्ट्राला पर्यटनातील एक प्रमुख डेस्टिनेशन बनवण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.

### परवानग्यांची संख्या कमी

हॉस्पिटॅलिटी म्हणजेच आदरातिथ्य क्षेत्रासाठी क्रांतिकारी निर्णय घेण्यात आले आहेत. राज्यात आदरातिथ्य उद्योग सुरू करण्यासाठी आतापर्यंत विविध ७० परवानग्या लागत असत. आता यांची संख्या कमी करून फक्त १० परवानग्या तसेच ९ स्वयंप्रमाणपत्रे लागतील असा निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. याबरोबरच आदरातिथ्य क्षेत्राला उद्योगाचा दर्जा देण्यात आला आहे. यामुळे या क्षेत्रातील व्यावसायिकांना उद्योगांसाठीचे सर्व लाभ आणि सवलती मिळणार आहेत. पर्यटनाला चालना देण्यासाठी विविध आदरातिथ्य घटकांसमवेत २ हजार ९०५ कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. राज्यातील होम स्टे पर्यटनास चालना देण्याच्या अनुषंगाने एअर बीएनबीसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे.

### विविध धोरणे

राज्याचे कृषी पर्यटन धोरण जाहीर



करण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना कृषिपूरक व्यवसाय उपलब्ध होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. राज्यातील कृषी पर्यटनाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ (एमसीडीसी) समवेत सामंजस्य करार करण्यात आला आहे. कोकणच्या विकासाला चालना देणारे बीच शॅक धोरण जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये स्थानिकांना ८० टक्के रोजगार देण्याची अट आहे. पथदर्शी प्रकल्प म्हणून रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर, आरेवारे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुणकेश्वर, तारकर्ली, रायगड जिल्ह्यातील वर्सोली, दिवेआगार आणि पालघर जिल्ह्यातील केळवा व बोर्डी या आठ किनाऱ्यांवर बीच शॅक्स उभारण्यात येणार आहेत. राज्याचे कॅराव्हॅन पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले आहे. कॅराव्हॅन पर्यटन धोरणाच्या माध्यमातून लोकांना चालते-फिरते घर असलेल्या कॅराव्हॅनच्या माध्यमातून भटकंती करता येणार आहे. एमटीडीसीमार्फत मोटोहोम कॅम्परव्हॅनचा शुभारंभ करण्यात आला असून हे एक चालतेफिरते घरच आहे. राज्याचे साहसी पर्यटन धोरणही नुकतेच जाहीर करण्यात आले आहे. महाराष्ट्रात स्काय डायव्हिंग साहसी क्रीडा प्रकार सुरू करण्याच्या दृष्टीने स्काय-हायसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे.

## सिंधुदुर्गात हॉटेल ताजची गुंतवणूक

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील मौ. शिरोडा वेळागर येथे पंचतारांकित पर्यटन केंद्र उभारण्यासाठी ताज ग्रुपच्या मे. इंडियन हॉटेल्स कंपनीला ५४.४० हेक्टर जमीन ९० वर्षाच्या दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने देण्यात आली आहे. यामुळे सिंधुदुर्गात पंचतारांकित हॉटेलची निर्मिती होऊन देशी-विदेशी पर्यटक आकर्षित होऊन कोकणातील पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील वन्यजीव पर्यटनास चालना देण्यासाठी थ्रिविंग हॉटेल्स प्रा. लि. सोबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. वन पर्यटनाला चालना देण्यासाठी पर्यटन आणि वन महामंडळाची समिती गठित करण्यात आली आहे.

## एकवीरा देवी मंदिर, राजगड किल्ला येथे लवकरच रोपवे

पुणे जिल्ह्यातील श्रीएकवीरा देवी मंदिर येथे तसेच राजगड किल्ला येथे रोपवे मार्गाच्या निर्मितीसाठी आर्थिक आणि तांत्रिक सुसाध्यता अहवाल तयार करणे, निविदा व्यवस्थापन प्रक्रिया राबवणे, यासाठी भारतीय पोर्ट रेल व रोपवे महामंडळ (आयपीआरसीएल) यांच्यासोबत पर्यटन संचालनालयाचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. हे दोन्ही रोपवे प्रकल्प बांधा, वापरा, हस्तांतरित करा (बीओटी) तत्त्वावर बांधण्याचे प्रस्तावित आहे. पर्यटन विभागाचा हा पथदर्शी प्रकल्प असेल.



## विविध पर्यटनस्थळांना ब वर्गाचा दर्जा

छत्रपती शिवाजी महाराजांचे सरसेनापती प्रतापराव गुजर यांचे जन्मगाव भोसरे (ता. खटाव, जि. सातारा), ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव (ता. खंडाळा, जि. सातारा), हत्ती बेट - देवर्जन (ता. उदगीर, जि. लातूर), श्री क्षेत्र महाबळेश्वर (जुने महाबळेश्वर) (जि. सातारा), महाबळेश्वर नगरपालिका क्षेत्र (जि. सातारा), पाचगणी नगरपालिका क्षेत्र (जि. सातारा) या सहा पर्यटनस्थळांना 'ब' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्यात आला आहे. त्याचबरोबर रायगड जिल्ह्यातील अलिबाग, मुरुड-जंजिरा आणि श्रीवर्धन या पर्यटनस्थळांना 'ब' वर्ग पर्यटनस्थळांचा दर्जा देण्यात आला आहे.

## शिवनेरीसाठी २३ कोटी रुपये

गडकिल्ल्यांच्या जतन आणि संवर्धनाला चालना देण्यात येत आहे. शिवनेरी किल्ल्याचे संवर्धन, सुशोभीकरण आणि पर्यटनदृष्ट्या विकासासाठी २३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. इतर गडकिल्ल्यांच्या जतन-संवर्धनासाठीही भरीव निधी देण्यात येईल. तीर्थक्षेत्रांच्या विकासातून आध्यात्मिक पर्यटनाला चालना देण्यात येत आहे. श्री क्षेत्र निरा नृसिंहपूर (ता. इंदापूर, जि. पुणे) तिर्थक्षेत्र विकासासाठी २८.४८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. राज्यातील इतर तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठीही भरीव निधी देण्यात येईल.

राज्यातील अवर्गीकृत किल्ल्यांच्या ठिकाणी (खासगी मालकीचे किल्ले वगळून) पर्यटकांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे तसेच पर्यटकांना अनुभवजन्य पर्यटन करून देण्यासाठी किल्ले पर्यटन योजना आखण्यात आली आहे. या योजनेबाबत पर्यटन संचालनालयामार्फत लोकांकडून सूचना व हरकती मागवण्यात आल्या आहेत. राज्यात ४०० पेक्षा अधिक किल्ले आहेत. यापैकी केंद्रीय पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीत ४७ तर राज्य पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीत ५१ किल्ले असून हे वर्गीकृत किल्ले आहेत. याशिवाय ३३७ अवर्गीकृत किल्ले आहेत. हे किल्ले

महसूल व वन विभागाच्या अखत्यारीत किंवा खासगी आहेत. यापैकी खासगी मालकीचे किल्ले वगळून उर्वरित अवर्गीकृत किल्ल्यांच्या ठिकाणी पर्यटकांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे तसेच पर्यटकांना अनुभवजन्य पर्यटन करून देण्यासाठी किल्ले पर्यटन योजना आखण्यात आली आहे.

## मुंबई पर्यटनविकासासाठी विविध निर्णय

मुंबई हे पर्यटन वैविध्याने नटलेले शहर आहे. येथे समुद्रकिनारा आहे, वन्यजीवन आहे, प्राचीन मंदिरे-गुंफा आणि किल्ले आहेत. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानासारखे जंगल तर फ्लेमिंगो अभयारण्यदेखील आहे. या सर्वांच्या सोबतीला आधुनिकतेची जोड आहे. मुंबईत आंतरराष्ट्रीय दर्जाचे मल्टिलेव्हल ॲक्वेरिअम (मत्स्यालय), गेट वे ऑफ इंडियासह मुंबईतील विविध स्थळांचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याच्या दिशेने









पावले उचलली जात आहेत.

मुंबई महापालिका मुख्यालयाची इमारत ही जुनी असून स्थापत्याचा उत्कृष्ट नमुना आहे. पर्यटकांसाठी या इमारतीचा हेरिटेज वॉक सुरू करण्यात आला आहे. यामुळे पर्यटकांना या इमारतीमध्ये प्रत्यक्ष फिरून तेथील ऐतिहासिक ठिकाणे, जुन्या वास्तू, पुतळे पाहता येणार आहेत. एमटीडीसी आणि मुंबई महापालिकेमार्फत हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

## माहिम समुद्रकिनाऱ्याचा कायापालट

मुंबईच्या विशेषतः माहिमच्या सौंदर्यात भर घालणारा आणि पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने संवेदनशील असा माहिम समुद्र किनारा सुशोभीकरण प्रकल्प पूर्ण झाला असून या प्रकल्पाचे लोकार्पण नुकतेच करण्यात आले. मुंबईत येणाऱ्या देश-विदेशातील पर्यटकांसाठी हे नवीन आकर्षण आता खुले झाले आहे. नवीन रूप धारण केलेला संपूर्ण माहिम किनारा हा नैसर्गिक अनुभूती देणारा ठरतो आहे. जवळपास ४ कोटी रुपये खर्च करून हे संपूर्ण सुशोभीकरण करण्यात आले आहे.

मुंबईतील पर्यटनस्थळांमध्ये एक महत्त्वाचे आकर्षण असणाऱ्या आणि राणीचा रत्नहार अशी ओळख असणाऱ्या मरिन ड्राईव्ह अर्थात नेताजी सुभाष मार्गालगत लवकरच एक नवे पर्यटनस्थळ आकारास येणार आहे. 'स्वराज्यभूमी' अर्थात गिरगाव चौपाटीच्या उत्तर टोकाला कविवर्य भा. रा. तांबे चौकालगत समुद्राचे आणि मरिन ड्राईव्हचे वैशिष्ट्यपूर्ण व मनमोहक दर्शन घडवणाऱ्या



'दर्शक गॅलरी'चे नुकतेच भूमिपूजन करण्यात आले आहे. लवकरच हे काम पूर्ण होऊन त्याद्वारे मुंबईच्या पर्यटन विकासात एक महत्त्वपूर्ण भर पडणार आहे.

याबरोबरच मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया, मणी भवन, ऑगस्ट क्रांती मैदान यांचा विकास, वांद्रे किल्ला ते माहिम किल्ला बोर्ड वॉक कम सायकल ट्रॅकचा प्रकल्प, वरळी किल्ल्याचे जतन, संवर्धन आणि विकास, मुंबई शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे मल्टिलेव्हल ॲक्वेरिअम (मत्स्यालय) असे अनेक प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत.

## पर्यटन संचालनालयामार्फत उपक्रम

पर्यटन संचालनालयामार्फत 'महा व्हिडिओग्राफी स्पर्धा' आयोजित करण्यात आली. राज्यातील खाद्यसंस्कृती आणि पाककलेला चालना देणे तसेच या माध्यमातून देश-विदेशातील पर्यटकांना महाराष्ट्राकडे आकर्षित करण्याच्या उद्देशाने 'महाराष्ट्राचे मास्टरशेफ' या रेसीपी स्पर्धेचे ऑनलाईन पद्धतीने आयोजन करण्यात आले. जागतिक छायाचित्रण दिनानिमित्त (१९ ऑगस्ट) नवोदित आशय निर्मात्यांना एकत्र आणण्यासाठी आणि महाराष्ट्रातील पर्यटनाला चालना देण्याच्या उद्देशाने फोटोग्राफी स्पर्धा, हेरिटेज वॉक, फूड फोटोग्राफी, ट्रॅव्हल फोटोग्राफी आणि कथाकथन यावर आधारीत ऑनलाईन कार्यशाळा यांचे आयोजन करण्यात आले. अशा उपक्रमांमधूनही राज्यातील पर्यटन विकासाला चालना देण्यात येत आहे. टूर गाईडविषयक (पर्यटन मार्गदर्शक) ऑनलाईन प्रशिक्षणाचेही आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये आतापर्यंत ७०० हून अधिक युवक-युवतींनी सहभाग घेतला आहे. या युवकांना आता राज्याच्या विविध पर्यटनस्थळांवर टूर गाईड म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

## एमटीडीसीमार्फत नवीन सोयीसुविधा

महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाने (एमटीडीसी) जलद आणि अधिक कार्यक्षम सेवा देण्यासाठी सुधारित बुकिंग इंजिन तसेच राज्यातील पर्यटनस्थळांच्या तपशीलवार माहितीसह नवीन संकेतस्थळ सुरू केले आहे. एमटीडीसीच्या पर्यटक निवासांचे बुकिंग अधिक सुलभ होणे आणि जगभरातील पर्यटकांसाठी ही बुकिंग सुविधा उपलब्ध होण्यासाठी मेक माय ट्रीप आणि गो आय बीबो या नामांकित संकेतस्थळांबरोबर सामंजस्य करार करण्यात आला आहे. यामुळे आता ही संकेतस्थळे वापरून एमटीडीसीची पर्यटक संकुले कोठूनही बुक करता येणार आहेत. एमटीडीसी कर्मचाऱ्यांसाठी वार्षिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट यांच्यासोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे.

सिंहगड (जि. पुणे) येथील एमटीडीसीच्या पर्यटक निवासाचे नूतनीकरण करण्यात आले आहे. गणपतीपुळे (जि. रत्नागिरी) येथे बोट क्लब सुरू करण्यात येत आहे. गंगापूर (जि. नाशिक) येथे एमटीडीसी ग्रेप पार्क रिसॉर्ट आणि बोट क्लब सुरू करण्यात आले आहे. खारघर (नवी मुंबई) येथे एमटीडीसी रेसीडेन्सी पर्यटक संकुल सुरू करण्यात आले आहे. एमटीडीसीच्या ताब्यातील शासकीय जमिनींचा आणि मालमत्तांचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्यासाठी खासगीकरणाच्या धोरणास तत्त्वतः मान्यता देण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात गणपतीपुळे, माथेरान, महाबळेश्वर, हरिहरेश्वर, मिठबाव येथील महामंडळाचे रिसॉर्ट तसेच ताडोबा आणि फर्दापूर (औरंगाबाद) येथील मोकळ्या जमिनींचा विकास करण्यात येईल. फिडबॅक क्यूआर कोडसारख्या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे एमटीडीसीचे कामकाज अधिक डिजिटल होणार आहे. राज्यातील पर्यटनस्थळे, रस्ते येथेही माहिती देणारे क्यूआर कोड, सायनेजेस लावण्यात येणार आहेत.

कोरोनामुळे सध्या पर्यटनावर बंधने असली तरी विविध धोरणे ठरवणे आणि पर्यटनस्थळाच्या पायाभूत सुविधा-सेवांमध्ये वाढ करण्यासाठी अनेक निर्णय घेण्यात येत आहेत. आपल्याकडचे पर्यटन वैभव जगासमोर नेणे आणि त्यात नवनवीन पर्यटनस्थळांची, नवनवीन बाबींची भर टाकणे गरजेचे आहे. आपले राज्य पर्यटन वैविध्याने नटले आहे. महाराष्ट्रात सर्व प्रकारच्या पर्यटनाच्या संधी आहेत, यासारखी पर्यटन समृद्धी अन्यत्र कुठे आढळून येत नाही. आदरातिथ्य क्षेत्राला चालना देण्यासाठी याला उद्योगाचा दर्जा देण्याबरोबरच यासाठी परवान्यांची संख्या कमी करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यात हॉटेल सुरू करण्यासाठी आता अनेकांकडून विचारणा होत आहे. राजशिष्टाचार विभागामार्फत नुकतीच मुंबईतील विविध देशांच्या महावाणिज्यदूतांसमवेत बैठक संपन्न झाली, त्यांनीही महाराष्ट्राचा पर्यटनवारसा समृद्ध असल्याचे सांगितले. शासनाकडून राबवण्यात येत असलेले विविध उपक्रम, धोरणे, निर्णय यामधून पर्यटन क्षेत्राला अधिक व्यापक करण्यासाठी पर्यटन विभाग यापुढील काळातही अधिक व्यापक कार्य करेल आणि लवकरच आपले महाराष्ट्र राज्य हे फक्त देशातीलच नव्हे, तर जगातील एक प्रमुख टुरिस्ट डेस्टिनेशन ठरेल, असा मला विश्वास आहे.

**शब्दांकन : इर्शाद बागवान,**
विभागीय संपर्क अधिकारी



# कोकण विकासाची गुरुकिल्ली

**राज्यावर आलेले कोरोनाचे संकट जगभर पसरले आणि याचा सर्वांत जास्त परिणाम पर्यटन क्षेत्रावर झाला. पर्यटन व्यवसाय आता पूर्ववत करण्यासाठी शासनस्तरावर विविध उपाययोजना करून पर्यटनाला चालना देण्यात येत आहे. गोवा राज्यातील किंवा जगभरातील किनारे शॅकमुळे प्रसिद्ध आहेत. कोकण पर्यटनाला चालना देण्यासाठी बीच शॅक धोरण राबवून समुद्रकिनाऱ्यांचा क्षमतेनुसार विकास करण्यात येत आहे. पर्यटनातून रोजगारनिर्मिती आणि त्यातून विकास हीच कोकणच्या विकासाची गुरुकिल्ली आहे.**

**कु. आदिती तटकरे**
पर्यटन राज्यमंत्री

या स्पर्धेच्या जगात टिकण्यासाठी सातत्य ठेवण्यात आपण सर्वच गुंतलेलो आहोत. क्षेत्र कुठलेही असो, शारीरिक व मानसिकदृष्ट्या आपण स्वत:ला तयार ठेवतो. यामध्ये सातत्य व समतोल राखण्यासाठी एखादा छंद, विरंगुळा, खेळ व पर्यटन हे पर्याय आपल्या समोर असतात.

कोरोना काळात पर्यटन थांबले असले तरी राज्याच्या पर्यटन विभागाने या कठीण काळातही पर्यटनास विविध पैलू देणारे निर्णय व सामंजस्य करार केले आहेत. ताडोबातील वाघ, कोकणातील विविध समुद्रकिनारे, वनसंपदा, गडकिल्ले हे राज्याचे भांडवल आहेच. नव्या पिढीसह ज्येष्ठ पर्यटकांना पर्वणी ठरेल असे काही निर्णय राज्याच्या पर्यटन विभागाने गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत घेतले आहेत. ज्यामध्ये आदरातिथ्य व्यवसायास उद्योगाचा दर्जा देऊन अधिक हॉटेल व्यावसायिक पर्यटनाशी थेट जोडण्याचा प्रयत्न आहे.

लोकप्रिय असे लोणार सरोवर, अजिंठा-वेरुळ लेणी, माथेरान व महाबळेश्वर या प्रचलित पर्यटनाच्या स्थळांना अधिक सोई-सुविधांसाठी वाढीव निधी, महत्त्वाच्या पर्यटन स्थळांचे पर्यटन दर्जात श्रेणीवर्धन ज्यामध्ये अलिबाग, श्रीवर्धन व मुरुड-जंजिरा या रायगड जिल्ह्यातील स्थळांचा समावेश आहे. तीर्थक्षेत्र म्हणून भाविकांमध्ये प्रसिद्ध असे अष्टविनायक गणपती या संपूर्ण परिमंडळाचा विकास साधण्यासाठी पर्यटन, ग्रामविकास विभाग एकत्रितपणे प्रयत्नशील आहेत. कॅलिफोर्नियाला कोकणाचे उदाहरण द्यावे अशा दिशेने वाटचाल करताना चिपी विमानतळ लवकरच पर्यटकांच्या सेवेत उतरणार आहे.


मुरुड-जंजिरा किल्ला

राज्यातील पर्यटन क्षेत्राच्या एकूण विकासासाठी राज्य शासन विविध योजना राबवत असून त्यातून महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला गती येणार आहे. विशेषतः कोकण किनारपट्टी ही पर्यटनवाढीसाठी सर्वात महत्त्वाची असून त्यादृष्टीने राज्य शासनाने विविध उपाययोजना राबवण्यास सुरुवात केली आहे. कोकण पर्यटनाला चालना देण्यासाठी बीच शॅक धोरण राबवून समुद्र किनाऱ्यांचा क्षमतेनुसार विकास करण्यात येत आहे. यामध्ये सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड आणि पालघर या जिल्ह्यांचा समावेश आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर, आरेवारे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुणकेश्वर, तारकर्ली, रायगड जिल्ह्यातील वर्सोली, दिवेआगार आणि पालघर जिल्ह्यातील केळवा व बोर्डी या आठ किनाऱ्यांवर बीच शॅक्स उभारण्यात येणार आहेत. प्रत्येकी दहा शॅक उभारून हा पायलट प्रोजेक्ट करण्यात येत आहे. यात ८० टक्के रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्यात येत आहे. हा प्रकल्प पर्यावरणपूरक असून परिसरातील, किनाऱ्यावरील स्वच्छता व सौंदर्य राखून पर्यटकांना सुविधा व स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. भविष्यामध्ये इतर समुद्रकिनाऱ्यांवर देखील हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्याचा प्रयत्न असेल.

## विविध पर्यटनस्थळांचा विकास

कोकण पर्यटनाबरोबरच राज्यातील पर्यटन विकास करण्यासाठी विविध प्रयत्न सुरू आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील मौ. शिरोडा वेळागर येथे पंचतारांकित पर्यटन केंद्र उभारण्यासाठी ताज ग्रुपच्या मे. इंडियन हॉटेल्स कंपनीला ५४.४० हेक्टर जमीन ९० वर्षांच्या दीर्घ मुदतीच्या

भाडेपट्ट्याने देण्यात आली आहे. तसेच रायगड जिल्ह्यातील अलिबाग, मुरुड-जंजिरा आणि श्रीवर्धन या पर्यटनस्थळांना 'ब' वर्ग पर्यटनस्थळांचा दर्जा देण्यात आला आहे.

भारताच्या अनेक राज्यांच्या अर्थव्यवस्था पर्यटनावर उभारलेल्या आहेत. कोकणात ७२० कि.मी.चा विस्तीर्ण समुद्रकिनारा, सह्याद्री पर्वतरांगा, जंगले, जैवविविधता, नद्या, धबधबे, तलाव, प्राचीन वास्तु, तीर्थक्षेत्रे, किल्ले, थंड हवेची ठिकाणे आदी नैसर्गिक संपत्ती उपलब्ध असूनही पर्यटन क्षेत्रातला आपला वाटा तसा पाहिला तर कमी आहे. पर्यटन हा जगात सर्वाधिक रोजगार आणि परकीय चलन मिळवून देणारा उद्योग आहे.

## स्थानिकांना संधी

महाराष्ट्रात पर्यटनावर आधारीत विविध उद्योगधंदे पर्यटनस्थळी व तीर्थक्षेत्रस्थळी विकसित होत आहेत. निसर्गरम्य कोकणात येणाऱ्या पर्यटकांसाठी सर्व सुविधा उपलब्ध करून पर्यटनस्थळी तज्ज्ञ पर्यटक मार्गदशक (गाईड) हा उत्तम पर्याय विकसित होत आहे. स्थानिक पातळीवरील मार्गदर्शन विषयक ज्ञान, कौशल्य आत्मसात करून त्याच्या साहाय्याने राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यटन व्यवसाय व रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात, त्यासाठीचे कौशल्य आत्मसात करण्याची संधी या उपक्रमाच्या माध्यमातून पर्यटन विभाग स्थानिकांना देत आहे.

## विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

रायगड जिल्ह्यातील कर्नाळा पक्षी अभयारण्य व फणसाड अभयारण्य या ठिकाणी पर्यटक, पक्षी अभ्यासक व निसर्गप्रेमी यांची कायम पसंती असते. शालेय विद्यार्थ्यांच्या सहली, अभ्यास दौरे या दोन्ही पर्यटनस्थळी होत असतात. येथे येणाऱ्या पर्यटकांना अभयारण्यातील महत्त्वाच्या स्थळांचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन मिळावे, पर्यटन मार्गदर्शक म्हणून स्थानिक आदिवासी तरुण-तरुणींना प्राधान्याने रोजगार उपलब्ध व्हावा, अशी संकल्पना आहे. त्यानुसार भारत सरकारचा ऑनलाईन पर्यटन सुलभ मार्गदर्शक हा अभ्यासक्रम महाराष्ट्रातील बेरोजगार युवकांसाठी अधिकृतरीत्या महाराष्ट्र शासनाने प्रमाणित करून सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. हे प्रशिक्षण वर्ग पर्यटन संचालनालयामार्फत आयोजित करण्यात आले होते. रायगड जिल्हा हा भौगोलिक, नैसर्गिक, औद्योगिकदृष्ट्या खूप संपन्न आहे. येथील समुद्रकिनारे, किल्ले रायगड, जंजिरा, अभयारण्य, प्राचीन लेणी, पाली-महड सारखी तीर्थक्षेत्रे, माथेरानसारखे हिलस्टेशन, घारापूरची लेणी आणि विविध पर्यटन स्थळे यांचा सर्वांगीण विकास करून येथे येणाऱ्या पर्यटकांना राहण्याच्या योग्य, स्वच्छ सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याचा माझा प्रयत्न आहे. पर्यटकांना जिल्ह्यात आल्यावर ४ ते ५ दिवस राहता, फिरता यावे या दृष्टीने 'टूरिस्ट हब' या जिल्ह्यात व्हावा, यासाठी पर्यटन विभाग व स्थानिक प्रशासन मिळून प्रयत्न करत आहोत. खारघर येथे एम.टी.डी.सी. रेसिडेन्सी सुरू करण्यात आले आहे.


माथेरान

समुद्रकिनारी आलेले पर्यटक आजुबाजूला असलेल्या अनेक स्थळांना भेट देतील व वास्तव्य करतील या दिशेने विकास करून 'रायगड जिल्हा पर्यटन पॅकेज' म्हणून येणाऱ्या काही काळात पर्यटकांना देण्याचा आमचा प्रयास आहे. कुडा लेण्या विकास, एलिफंटा लेण्यांचा विकास, मुरूड-जंजिरा इ. विकास करण्यासाठी एएसआयकडून परवानगी घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. कर्नाळा, फणसाड या अभयारण्यात पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. रायगड जिल्ह्यास लाभलेले वैविध्यपूर्ण निसर्ग सौंदर्य, अद्वितीय ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा यामुळे या जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटकांचा ओघ जास्त आहे. फणसाड व कर्नाळा पक्षी अभयारण्य इथे येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाला एक समृद्ध आणि सुंदर अनुभव देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. भटकंती, प्रवास हा फक्त एक छंद म्हणून न जोपासता त्याला शैक्षणिक आणि व्यावसायिक जोड देण्याचा विचार करून राज्यातील इच्छुक युवक-युवतींसाठी पर्यटक मार्गदर्शक प्रशिक्षण ही संकल्पना सुरू करण्यात आली आहे. आपण कोकणचा कॅलिफोर्निया करण्याबाबत नेहमी बोलत असतो. पण कोकणचा पर्यटनासह इतर सर्व क्षेत्रात सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला आहे. त्यामुळे कॅलिफोर्नियाने कोकणासारखे व्हावे, असे बोलले पाहिजे. किल्ले व ऐतिहासिक वास्तुंचे संवर्धन व संरक्षणाची दिर्घकालीन व्यवस्था करून त्यांचे महत्त्व पर्यटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रभावी यंत्रणा विविध योजनांच्या माध्यमातून राबवली जात आहे. कोकणातील सुंदर सागरी किनारे, हिरवीगार पालवी, जगप्रसिद्ध वारली कला आणि सागरी किल्ले याकडे पर्यटक सतत आकर्षित होतात. कोकणातील प्रत्येक ग्रामस्थाने कोकण पर्यटनाचे मार्केटिंग केले पाहिजे. जगभरात पर्यटन व्यवसायाला मोठी संधी आहे. काही राष्ट्रे तर फक्त पर्यटन व्यवसायावर अवलंबून आहेत इतकी या क्षेत्राची ताकद आहे. गोवा राज्याचे अर्थकारण मुख्यतः पर्यटनावर आधारलेले आहे.

## कोकण विकासाला चालना

देशाच्या भौगोलिक रचनेमुळेच आपण उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा हे तीन ऋतु अनुभवणाऱ्या जगातील मोजक्याच राष्ट्रांमध्ये येतो. निसर्ग रचनेचे काम करणाऱ्या युनेस्कोसारख्या संस्थांनी कोकणातील वनांना 'जागतिक संरक्षित वनांचा' दर्जा दिला आहे. येथील काही प्राण्यांच्या प्रजाती, काही वनस्पतींची जैविकता पृथ्वीतलावर फक्त येथेच पाहावयास मिळते. निसर्ग अबाधित राखून जर विकासाचा चतुःसूत्री आराखडा जर कार्यान्वित केला तर पर्यटनाच्या माध्यमातून कोकणच्या विकासाला सर्वांगीण चालना मिळेल आणि पर्यटनाच्या उद्योगातून कोकण अर्थकारणाचा एक चांगला पर्याय महाराष्ट्राच्या आर्थिक सुबत्तेला उपलब्ध होईल आणि कोकण विकासाची गुरुकिल्ली ठरल्याशिवाय राहणार नाही.

**शब्दांकन : काशिबाई थोरात,**
विभागीय संपर्क अधिकारी

# महापर्यटन... महासंधी

**महाराष्ट्र हे पर्यटनाच्या दृष्टीने विविध पर्वतरांगा, नयनरम्य समुद्रकिनारे, इतिहासाची साक्ष देणारे गडकिल्ले, धो-धो कोसळणारे धबधबे, प्राचीन लेणी, धार्मिक तीर्थक्षेत्रे, समृद्ध जैवविविधतेची प्रचिती देणारी अभयारण्ये अशी एक ना अनेक आकर्षण स्थळे असे पर्यटन समृद्ध राज्य आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या वैभवशाली पर्यटनवृद्धीसाठी गेल्या दोन वर्षात महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाने विविध धोरणे व योजना राबवल्या आहेत.**

**डॉ. धनंजय सावळकर**

भटकंती ही मनुष्याची सहज प्रवृत्ती आहे. आदिमानवाच्या अन्नाच्या भटकंतीपासून ते आधुनिक युगातील अवकाश भटकंतीपर्यंतचा मानवी भटकंतीचा प्रवास हेच अधोरेखित करतो. प्राचीन काळातील प्रवासपद्धती व संकल्पना या आजच्या काळातील प्रवासपद्धती व संकल्पनांपेक्षा वेगळ्या होत्या. सिंधू संस्कृतीमध्ये प्रवासाचा उद्देश शेती व स्थिरस्थावर होण्यासाठी भटकंती, तसेच राजेशाही व्यवस्थेत नवीन प्रदेश काबीज करण्यासाठी स्वाऱ्या तर मध्ययुगीन कालखंडात व्यापार ही भटकंतीची प्रमुख कारणे होती. प्रवासी व व्यापारी विविध भूप्रदेश, देश व राज्यातून प्रवास करत असत. त्यामुळे विविध राज्यांच्या राजधान्या, शहरे, बंदरे, बाजारपेठांची केंद्रे, व्यापारी मार्ग यांचा त्यांच्याशी संबंध येत असे. यातून विविध मानवी समूह, संस्कृती यांची परस्परांशी ओळख झाली. अनेक गोष्टींची देवाण-घेवाण झाली. एकमेकांच्या समाजजीवनाचे आकलन झाले. प्रवास व पर्यटनवाढीसाठी या प्रमुख बाबी दिसून येतात.

पर्यटनाची सर्वमान्य व्याख्या विचारात घेतली तर दैनंदिन गरजा व कामासाठीचा प्रवास वगळून विरंगुळा, मनोरंजन, धार्मिक, साहस व व्यापार यासाठी केला जाणारा प्रवास म्हणजेच पर्यटन होय. पुर्वी वाहतुकीची साधने अत्यल्प असल्याने जवळच्या प्रदेशांमध्येच प्रवास केला जात असे, तथापि, औद्योगिक क्रांतिनंतर वाहतुकीची साधने जशी विकसित होत गेली तशी प्रवास करणाऱ्यांची संख्या व प्रमाण वाढु लागले. भारतातही पूर्वी प्रामुख्याने धार्मिक पर्यटन होत असे तथापि, गेल्या तीन दशकांत जगभरातल्या अनेक देशांमध्ये पर्यटन हा प्रमुख व्यवसाय बनला. विशेषतः युरोपातील बहुतांश राष्ट्र, आग्नेय आशियातील छोटे-छोटे देश, मालदीव, हवाई व कॅरेबियन बेट यांसारखी काही



बांद्रा-वरळी सी लिंक

सामुद्रिक बेटे असलेल्या छोट्या देशांनी पर्यटन वाढीसाठी संरचनात्मक प्रयत्न केले. त्यामुळे या देशांमध्ये पर्यटन व्यवसाय हा त्यांच्या अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा व मुख्य व्यवसाय बनला आहे. पर्यटन व्यवसायातील रोजगार क्षमता, नावीन्यता, परकीय चलन मिळवून देण्याची क्षमता यामुळे आंतरराष्ट्रीय पर्यटन खूप मोठ्या प्रमाणात वाढू लागले आहे. केरळ, गुजरात, राजस्थान व मध्यप्रदेश यांसारख्या राज्यांनी गेल्या दशकांत पर्यटन क्षेत्राच्या वाढीसाठी नियोजनबद्ध प्रयत्न केले आहे. मागील दोन वर्षात (कोरोना महामारीपूर्वी) महाराष्ट्रदेखील पर्यटकांच्या आकडेवारीनुसार देशातंर्गत पर्यटनात (जवळपास १४ कोटी पर्यटकांनी महाराष्ट्रात पर्यटन केले.) पाचव्या क्रमांकाचे राज्य बनले आहे, तर आंतरराष्ट्रीय पर्यटनात (जवळपास ५० लक्ष विदेशी पर्यटकांनी महाराष्ट्रात पर्यटन केले) दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. तथापि, महाराष्ट्रात आगमन झालेल्या पर्यटकांचे जास्त काळ वास्तव्य महाराष्ट्रातच वाढवणे गरजेचे आहे, जेणेकरून येथील स्थानिक पर्यटक व्यावसायिकांना त्याचा लाभ होईल.

## आदरातिथ्य क्षेत्रास औद्योगिक दर्जा

राज्यात पर्यटन व्यवसायाची नियोजनबद्ध व योग्य वाढ साध्य करण्यासाठी व राज्यात उच्चतम पर्यटन साधनसंपत्ती असलेल्या क्षेत्रांचा अग्रक्रमाने व गतीने विकास होण्याच्या दृष्टीने उद्योजकांना आकर्षित करण्यासाठी आदरातिथ्य क्षेत्रास औद्योगिक दर्जा देण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे नोंदणीकृत असलेल्या हॉटेल व्यावसायिकांकडून वीज दर, वीज शुल्क, पाणीपट्टी, मालमत्ता कर, विकास कर, वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक व अकृषिक कराची आकारणी औद्योगिक दराने करण्यात येत आहे. या धोरणामुळे भविष्यात पर्यटन क्षेत्रात गुंतवणूक वाढणार आहे.

## गुंतवणूक

पर्यटन क्षेत्राला आणि संबंधित व्यावसायांना कोविड-१९ महामारीमुळे झालेल्या नुकसानीतून उभारी मिळावी म्हणून भागधारकांच्या माध्यमातून महाराष्ट्रात भविष्यकाळात ३००० कोटींची गुंतवणूक करण्यात येणार असून याद्वारे ६००० हून अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

## व्यवसाय सुलभीकरण

आदरातिथ्य क्षेत्रात व्यवसाय सुरू करण्यासाठी पूर्वी १२ वेगवेगळ्या विभागांमार्फत ७० प्रकारचे परवाने घ्यावे लागत होते. पर्यटन विभागाने निगडित विभागांशी समन्वय साधून, आदरातिथ्य क्षेत्रात व्यवसाय सुरू करण्यासाठी परवान्यांची संख्या ७० वरून १० तर विभागांची संख्या १२ वरून ७ इतकी कमी करण्यात आली आहे.



अंबोली धबधबा

## कृषी पर्यटन धोरण

एखाद्या खेडेगावात निसर्गरम्य ठिकाणी राहणे, शेतामध्ये जाऊन प्रत्यक्ष शेतीच्या कामाचा अनुभव, ग्रामीण संस्कृती, कला, खाद्य, यांचा आस्वाद पर्यटकांना घेता यावा, यासाठी कृषी पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले आहे. कृषी पर्यटन धोरणामुळे राज्यातील शेतकऱ्यांना कृषी क्षेत्राला पूरक व्यवसाय उपलब्ध होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळणार असून ग्रामीण कला संस्कृतीचे जतन व संवर्धन होण्यास मदत होणार. गेल्या वर्षभरात ४०० हून अधिक शेतकऱ्यांनी या धोरणांतर्गत सहभाग नोंदवला आहे.

## मिळकती विकासाबाबत नवे धोरण

पर्यटन धोरणाच्या उद्दिष्टपूर्ततेसाठी तसेच राज्यात पर्यटन प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी आणि विकासासाठी शासनाने राज्यात अनेक ठिकाणी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास शासकीय जमिनी उपलब्ध करून दिल्या आहेत. महामंडळाकडील मोकळ्या जमिनी व विकसित केलेल्या मालमत्ता भाडेतत्त्वावर देऊन पर्यटन क्षेत्रात खासगी भागीदारी वाढवण्यासाठी आणि राज्यातील पर्यटनस्थळांचा जागतिक मानकानुसार विकास करण्यासाठी शासकीय जमिनीचा खासगीकरणाच्या माध्यमातून पर्यटनदृष्ट्या विकास करण्याच्या धोरणास मान्यता दिली आहे. जवळपास ३७ मिळकतींबाबत खासगी गुंतवणुकीसाठी कार्यवाही सुरू आहे.

## कॅरॅव्हॅन पर्यटन धोरण

महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१६ अन्वये महाराष्ट्रात निसर्गरम्य समुद्र किनारे, ऐतिहासिक किल्ले, पर्वतरांगा, थंड हवेची ठिकाणे, नदी, वनसंपदा, ऐतिहासिक वारसास्थळे, लेणी, धरणे अशी अनेक वैशिष्ट्यपूर्ण पर्यटनाची ठिकाणे आहेत. अशा ठिकाणी कॅरॅव्हॅन पर्यटनाकरिता मोठा वाव आहे.

अतिदुर्गम भागात हॉटेल, रिसॉर्ट सारख्या राहण्याच्या सोयी अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. अशा ठिकाणी तसेच ज्या क्षेत्रामध्ये कायमस्वरूपी बांधकामासाठी प्रतिबंध घातले आहेत, अशा ठिकाणी कॅरॅव्हॅन व कॅम्पर व्हॅनच्या साहाय्याने पर्यटकांना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून कॅरॅव्हॅन पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले आहे.

## बीच शॅक धोरण

बीच शॅक म्हणजे समुद्रकिनाऱ्यालगत पर्यटकांकरिता उपहारगृह, स्वच्छतागृह, चेंजिंग रूम या सुविधांकरिता निर्माण

केलेले शॅक. महाराष्ट्राच्या समुद्र किनाऱ्यांचा सर्वांगीण, शाश्वत व एकसमान विकासाकरिता बीच शॅक धोरण संप्रेरक म्हणून काम करणार आहे. या धोरणामुळे राज्याच्या किनाऱ्यालगत आवश्यक मूलभूत सुविधांचा विकास होऊन स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

## समाजमाध्यमातील स्पर्धांचे आयोजन

लोकांचे मनोरंजन व्हावे, तसेच राज्यातील पर्यटन स्थळांची सर्वदूर प्रसिद्धी व्हावी जेणेकरून कोविड-१९ ची संचारबंदी शिथिल झाल्यानंतर पर्यटक महाराष्ट्रात येतील या हेतूने डिजिटल माध्यमातून विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्याला मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक आहे.

## महाराष्ट्र किल्ले योजना

किल्ल्यांच्या जतन व संवर्धनासाठी केंद्र व राज्य यांचे स्वतंत्र कायदे आहेत. या कायद्यातील तरतुदी क्लिष्ट स्वरूपाच्या असून वर्गीकृत किल्ल्यांचे जतन व संवर्धन तसेच पर्यटक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक परवानग्यांकरिता बराच कालावधी लागतो. त्यामानाने महसूल व वन विभागाच्या अखत्यारितील अवर्गीकृत किल्ल्यांच्या ठिकाणी पर्यटकविषयक मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे व याकरिताच्या परवानग्या सहज मिळणे शक्य आहे.

राज्यातील अवर्गीकृत किल्ल्यांच्या ठिकाणी (खासगी मालकीचे किल्ले वगळून) पर्यटकांना मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देणे व पर्यटकांना अनुभवजन्य पर्यटन करून देण्यासाठी किल्ले पर्यटन योजना आखण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पोहोच रस्ता (Approach road), पिण्याचे पाणी (Drinking water), उपहारगृह (Restaurant), प्रसाधनगृह (Toilet), वीज (Electricity), कचरा विल्हेवाट यंत्रणा (Solid waste management), माहिती व दिशादर्शक फलक (Signage), माहिती केंद्र व पर्यटक नोंदणी व्यवस्था (Tourist Information Centre), मार्गदर्शक (Guides), कॅरव्हॅन कॅम्पिंग (Caravan camping), पार्किंग (Parking), परिसर सुशोभीकरण या सोयी-सुविधा पुरवण्यात येणार आहेत. या योजनेत किल्ल्यांच्या जतन व संवर्धनाची कामे प्रस्तावित नाहीत.

## जबाबदार पर्यटन धोरण

राज्यातील पर्यटनस्थळांचा शाश्वत विकास करणे तसेच स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देणे या उद्देशाने जबाबदार पर्यटन धोरण जाहीर करण्यात येणार आहे. यात खालील बाबींचा समावेश आहे-

- पर्यटन विकासात महत्त्वाचा घटक असलेल्या पर्यावरण संसाधनांचा सुयोग्य वापर करणे, महत्त्वाच्या पर्यावरणीय प्रक्रिया कायम ठेवणे, नैसर्गिक वारसा व जैवविविधता यांचे रक्षण करण्यास मदत करणे.
- सामाजिक व सांस्कृतिक वारशांचे जतन व संवर्धन.
- प्रत्यक्षात येऊ शकणारे, दीर्घकालीन आर्थिक कार्यक्रम, सर्व भागधारकांना सामाजिक-आर्थिक फायदे पुरवणे, त्यांचे समतोल वाटप करणे, स्थिर रोजगार पुरवणे, उत्पन्न मिळवण्याच्या संधी पुरवणे आणि यजमान समूहांना सामाजिक सेवा पुरवणे, आणि दारिद्र्य निर्मूलनास हातभार लावणे यांचा समावेश होतो.


लोहगड

## माईस पर्यटन धोरण

माईस (MICE-Meetings, Incentives, Conferences and Events) बैठका, प्रोत्साहन, चर्चा व प्रदर्शने यासाठी राज्यात मोठ्या प्रमाणात देशी व विदेशी पर्यटक भेटी देतात. राज्यात बैठका, कार्यक्रम व परिषदा सातत्याने आयोजित होत असतात. याचे व्यवस्थापन एका छताखाली आणण्यासाठी माईस टूरिझम सोसायटी स्थापन करण्यात येणार आहे.

## गुंतवणूक सुलभीकरण कक्ष

राज्यातील पर्यटन क्षेत्रास खासगी गुंतवणुकीस मोठ्या प्रमाणावर वाव आहे. गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी व त्यांना आवश्यक ते सहकार्य करण्याच्या उद्देशाने 'पर्यटन गुंतवणूक सुलभीकरण कक्ष' स्थापन करण्यात येणार आहे.

## व्हॅकेशन रेंटल होम व होम स्टे योजना

विकेन्ड बंगल्यांच्या संदर्भात मूळ मालक हे त्या घरात किंवा गावात राहत नसून ते शहरी भागात राहत असल्याचे निदर्शनास आले आहे व अशा बंगल्याचे एकत्रित व्यवस्थापन आदरातिथ्याशी निगडित पर्यटन सेवा पुरवठादार (Tourism Service Provider) कंपन्या/संस्था करत असल्याचे दिसून येते. असे बंगले



गणपतीपुळे, रत्नागिरी

पर्यटकांसाठी विकेन्डला उपलब्ध करून देण्यासंदर्भात व्हॅकेशन रेंटल होम योजना, त्याचप्रमाणे राज्यातील आदिवासी/ग्रामीण/किल्ल्यांच्या पायथ्यालगत जागा यासारख्या वैशिष्ट्यपूर्ण स्थळी पर्यटकांना राहण्याची सुविधा उपलब्ध करून स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने स्थानिक घरमालकांची घरे/राहत्या घरातील ओसरीवरील जागा व्यावसायिक तत्त्वावर विशेषकरून ट्रेकर्स, बर्ड वॉचर्स, फोटोग्राफर्स, बॅग पॅकर्स यांच्याकरिता होमस्टे योजना राबवण्यात येणार आहे.

## पर्यटनस्थळांवर मूलभूत सोयी-सुविधा

राज्यातील १०० ऑफ-बीट पर्यटनस्थळांवर पर्यटकांना उपाहरगृह, प्रसाधनगृह, माहिती फलक, दिशादर्शक फलक, पार्किंग यांसारख्या मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

## पर्यटन कार्यालयाची निर्मिती

पर्यटन संचालनालयांतर्गत राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये पर्यटन कार्यालये निर्माण करण्यात येणार आहेत. तसेच या ठिकाणी पर्यटन अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार आहे. यामुळे त्या जिल्ह्यात व शेजारील जिल्ह्यात पर्यटनाच्या दृष्टीने केलेल्या सुविधांची अंमलबजावणी करण्यासाठी मदत होईल, सोबतच पर्यटन क्षेत्राला चालना मिळेल.

## २० पर्यटन स्थळी होणारे महोत्सव

महाराष्ट्रातील कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर या सहा विभागांमध्ये २० महोत्सवांचे आयोजन करण्याचे नियोजन आहे. नोव्हेंबर २०२१ ते जानेवारी २०२२ या दरम्यान हे आयोजन होईल. यासाठी राज्य पर्यटन विभागाकडून एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. वेंगुर्ला (सागरेश्वर) महोत्सव, श्रीवर्धन महोत्सव, कातळशिल्प महोत्सव, वाई महोत्सव, पन्हाळा महोत्सव, नांदूर मधमेश्वर पक्षी महोत्सव, अहमदनगर किल्ला महोत्सव, ग्रेप हार्वेस्टिंग महोत्सव, नळदुर्ग महोत्सव, कपिल धार महोत्सव, होट्टल महोत्सव सिंदखेड राजा महोत्सव, नरनाळा किल्ला महोत्सव, टिपेश्वर अभयारण्य महोत्सव, रामटेक महोत्सव, बोर धरण व वन्यजीव महोत्सव, बोधलकसा पक्षी महोत्सव.

## मुंबई शहरातील इमारतींचे प्रकाश प्रदीपन (Light Illumination)

मुंबई शहरातील १२ महत्त्वाच्या व प्रसिद्ध ऐतिहासिक वास्तूंचे/इमारतींचे प्रकाश प्रदीपन करण्यात येणार आहे. यासाठी महाराष्ट्र पर्यटन विभागामार्फत ३०.०० कोटी रुपये खर्च केला जाणार आहे. यामुळे मुंबई शहराला भेट देणाऱ्या पर्यटकांना नावीन्यपूर्ण अनुभव घेता येईल आणि नाइट टुरिझमला चालना मिळेल, सोबतच स्थानिक लोकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. या प्रकल्पात खालील इमारतींचा समावेश आहे :-

मुंबई हाय कोर्ट, सिटी सिविल कोर्ट (ओल्ड सेक्रेटरीएट), चीफ मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट कोर्ट, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय (हाय कोर्ट कॅम्पस), महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय (डीजी कार्यालय), दीक्षांत सभागृह (Convocation Hall), एलफिन्स्टन कॉलेज, एलफिन्स्टन तांत्रिकी संस्था, रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट, गेट वे ऑफ इंडिया, जनरल पोस्ट ऑफिस (G.P.O.).

कोरोना महामारीच्या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाने सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया व डिजिटल मीडियाच्या माध्यमातून पर्यटनाच्या प्रसिद्धीमध्ये आघाडी घेतली आहे. महाराष्ट्र राज्याच्या पर्यटनाची वेगवेगळ्या सामाजिक माध्यमांमध्ये तसेच पर्यटकांमधील आवड बघता महाराष्ट्र पर्यटनाच्या सोशल मीडियावर तब्बल १० लक्षपेक्षा अधिक फॉलोअर्स आहेत. त्याचबरोबर इतर राज्यांतील इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसिद्धी, प्रसिद्ध सेलिब्रेटी यांच्याद्वारे देखील महाराष्ट्र पर्यटनाची प्रसिद्धी करणे तसेच सोशल मीडियावर प्रसिद्ध असलेल्या प्रभावशाली व्यक्ती यांच्या मार्फत महाराष्ट्रातील पर्यटन वैभव हे देशातील इतर राज्यांना आणि आंतरराष्ट्रीय समुदायाला दाखवण्यासाठी असे यशस्वी प्रयत्न महाराष्ट्र पर्यटन विभागामार्फत होत आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र पर्यटन विभाग आगामी काळात महाराष्ट्र पर्यटनवृद्धीसाठी राबवत असलेल्या विविध योजना आणि प्रसिद्धी यांच्या माध्यमातून महाराष्ट्र पर्यटनाला भविष्यात चांगले दिवस येतील, हे निश्चित !

सह संचालक, पर्यटन संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# साद निसर्गाची

महाराष्ट्राला जंगलसमृद्धीचे वरदान लाभले आहे. राज्य शासनानेही महाराष्ट्राच्या या समृद्धीचे जतन केले असून जंगले महाराष्ट्राच्या वैशिष्ट्याचा अविभाज्य भाग झाली आहेत. पर्यावरणाच्या दृष्टीने जंगले जितकी महत्त्वाची आहेत तितकीच ती राज्याच्या विकासातही महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी सिद्ध आहेत. वनपर्यटनातून विविध संधी निर्माण होत असून, राज्य शासन वनपर्यटनाकडे गांभीर्याने पाहत असून राज्याच्या पर्यटन विकासासाठी राज्य शासन विविध निर्णय घेत आहे.

**सुनील लिमये**

महाराष्ट्राला जवळपास सातशेवीस किलोमीटर लांबीचा कोकण किनारपट्टीचा प्रदेश आणि त्याला समांतर अशी सह्याद्री पर्वतरांग लाभली आहे. सह्याद्रीच्या जोडीला महाराष्ट्रात सातपुडा आणि विंध्य अशा पर्वतरांगा आहेत. प्राचीन दुर्गवैभव, पर्वतांमधून उगम पावणाऱ्या नद्या तसेच पश्चिम महाराष्ट्र व विदर्भातील घनदाट जंगले असा वैविध्यपूर्ण आणि समृद्ध निसर्ग लाभलेल्या राज्यात पर्यटन अतिशय चांगल्या प्रकारे राबवले जाणे ही एक अत्यंत महत्त्वाची बाब आहे. परंतु पर्यटन म्हणजे अशा प्रदेशातून फक्त भटकंती करणे असे न होता त्या पर्यटनापासून आनंद, काही ठिकाणी साहस केल्याचा अनुभव, काही ठिकाणी नवीन माहिती अथवा ज्ञान मिळणे अशा सर्वच बाबी समाविष्ट असणे गरजेचे असते.

## ‘निसर्ग पर्यटन’

गेल्या १० ते १५ वर्षात ‘निसर्ग पर्यटन’ हा एक शब्द खूप प्रचलित होऊ लागला आहे परंतु बहुतेकांना निसर्ग पर्यटन म्हणजे निव्वळ जंगलात किंवा निसर्गरम्य ठिकाणी जाणे व त्या क्षेत्रात भटकंती करणे असे वाटू लागले आहे.

पर्यटनाच्या नावाखाली जेव्हा समुद्रकिनारे, वनक्षेत्रे व पर्वतरांगा येथे भटकंती व त्याचबरोबर साहसी उपक्रम अनियमितपणे वाढू लागले, तेव्हा या अनियंत्रित पर्यटनाबाबत शासनस्तरावर काहीतरी वेगळे केले जावे व त्याचे संनियंत्रण केले जावे अशी भावना वाढू लागली. त्यामुळेच राज्य शासनाने वन विभागामार्फत २००८ मध्ये राज्याचे ‘निसर्ग पर्यटन’धोरण जाहीर केले. यात ‘टन’ म्हणजे काय? याची एक सुटसुटीत व्याख्या करण्यात आली. निसर्ग पर्यटन म्हणजे स्थानिक रहिवाशांच्या संस्कृतीचा आविष्कार, अप्रदूषित व नैसर्गिक क्षेत्रात वन्यजीवांचा अभ्यास, निसर्गाची ओळख तसेच निसर्गाचा नाश न करता त्या जागेतील अशा फिरण्यामुळे स्थानिकांना रोजगार प्राप्त करून देणारे पर्यटन निसर्ग पर्यटनाच्या धोरणात काही तत्त्वेसुद्धा अंतर्भूत



केलेली आहेत जसे की, लहान ते सुंदर या उक्तीप्रमाणे निसर्ग पर्यटन छोट्या प्रमाणात असावे, पर्यावरणीय दृष्टिकोनाबरोबरच ते सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिकदृष्ट्या योग्य असावे, अनुभवसिद्ध व शिकण्यायोग्य असावे, त्यात स्थानिक लोकांचा व्यवस्थापनासाठी व रोजंदारी मिळण्यासाठी सहभाग असावा, पारिस्थितिकीय पर्यावरणाचा (Ecology) ऱ्हास करणारे नसावे व ते पर्यटकांच्या मागणीनुसार परंतु काही जरूर त्या निर्बंधानुसार असावे. हे धोरण ठरवताना महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रामधील असलेली निसर्गरम्य ठिकाणे, वनविभागाच्या निसर्गरम्य जागा, पर्यटनाची अभिमुखता म्हणजे कोणकोणत्या प्रकारचे पर्यटक यात येऊ शकतील, याचा अभ्यास, निसर्ग पर्यटनाविषयी माहिती, प्रसार त्याचप्रमाणे प्रसिद्धी यांचाही विचार केला आहे. त्या अनुषंगाने यात सहभागी असणाऱ्यांची क्षमताबांधणी कशी करावयाची याचाही विचार करण्यात आला आहे. या निसर्ग पर्यटनाबरोबरच राज्यातील पर्वतरांगा, उंच टेकड्या, नदी व समुद्रकिनारे या सर्व ठिकाणी बरेच निसर्गप्रेमी हायकिंग, गिर्यारोहण, प्रस्तरारोहण (Rock Climbing) अशा वेगवेगळ्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात काम करत आहेत व पर्यटनाचे हे प्रकार साहसी पर्यटन म्हणून ओळखले जात आहेत. परंतु या साहसी पर्यटनामध्येच बऱ्याचदा पर्यटकांच्या अतिउत्साहामुळे किंवा अशा प्रकारच्या पर्यटनात पाळावयाच्या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी न केली गेल्यामुळे बऱ्याचदा अपघात वा पर्यटकांच्या मृत्यूसारखे प्रकार दिसून आले आहे. त्यामुळेच यावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने नुकतेच २०२१ मध्ये राज्याचे 'साहसी पर्यटन उपक्रम' धोरण घोषित केले आहे. एकंदरीतच पर्यटन हे लोकांच्या उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी व त्याचबरोबर स्थानिकांना रोजगार मिळण्यासाठी केलेले अतिशय चांगले प्रयत्न आहेत.

निसर्ग पर्यटन दिवसेंदिवस लोकप्रिय होत असून ते राज्यात बऱ्याचशा भागांमध्ये रुजत आहे. याद्वारे स्थानिक जनतेला रोजगार उपलब्ध होतोच व त्याद्वारे निसर्ग संवर्धनाविषयी जनजागृतीसुद्धा करता येते. याच अनुषंगाने २०१५ मध्ये 'महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ'ची स्थापना करण्यात आली असून, शासकीय अधिकारी व अशासकीय सदस्य यांचे एक नियामक मंडळ स्थापन करण्यात आले आहे. याद्वारे या पर्यटनमंडळाचे कामकाज चालते. नागपूर येथे महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाचे



मुख्यालय असून त्या मंडळाच्या विविध उद्दिष्टांपैकी 'निसर्ग पर्यटनाला चालना देणे व स्थानिकांना त्याद्वारे शाश्वत रोजगार मिळवून देणे' ही महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. महाराष्ट्र राज्यातील विविध निसर्गरम्य क्षेत्रांचा आढावा घेऊन राज्यात महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाने सुमारे ३५० जागा निसर्ग पर्यटनास चालना देण्यासाठी निवडल्या आहेत.

## निसर्गभ्रमण योजना

राज्याचे निसर्ग पर्यटनासंबंधीचे Vision Document (पथदर्शक योजना) तयार करण्यात आले आहे व सद्य:स्थितीत पश्चिम महाराष्ट्रातील तानसा व नांदूरमधमेश्वर या दोन अभयारण्यांसाठी तर विदर्भातील टिपेश्वर अभयारण्यासाठी निसर्ग पर्यटन बृहत आराखडे बनवण्यात आले आहेत. या मंडळाची आणखी एक महत्त्वाकांक्षी योजना म्हणजे 'निसर्गभ्रमण योजना' आहे. महाराष्ट्रातील अनेक शेतकरी, खासगी उद्योजक तसेच अशासकीय संस्था निसर्ग पर्यटनाच्या क्षेत्रामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. पर्यटकांना महाराष्ट्राचे वनवैभव तसेच वन पर्यटनाची ओळख करून देणे व वन तथा वन्यजीवविषयक काही बाबींसाठी वेगळा अनुभव घेऊ देण्यास ते उपयोगी ठरू शकतात. यात वनातून पदभ्रमण, पक्ष्यांची ओळख, रोपवाटिका पर्यटन, साहसी खेळ, वनसंपत्तीची ओळख, शेती व निसर्गाविषयी माहिती करून देणे तसेच वनाशी संबंधित इतर गतिविधी यांचा समावेश केला जाऊ शकतो. निसर्ग पर्यटन क्षेत्रात अशा उपक्रमांना एका छत्राखाली आणण्याकरिता तसेच त्याद्वारे वनपर्यटनाला चालना देण्याकरिता असे इच्छुक शेतकरी, उद्योजक आणि अशासकीय संस्थांना महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास महामंडळाकडे नोंदणी करावी लागते व त्यानंतर त्या त्या भागात निसर्गात, मग ते वनक्षेत्र असो वा शेती खालील क्षेत्र असो त्यात हे निसर्गभ्रमण केले जाते. निसर्ग भ्रमणाप्रमाणेच निसर्गानुभव हीसुद्धा एक चांगली योजना हे मंडळ राबवत आहेत. प्रत्येक जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषदा व आश्रमशाळेतील २००० शालेय विद्यार्थ्यांना एक दिवसाकरिता या योजनेंतर्गत वनक्षेत्रामध्ये निसर्गरम्य ठिकाणी सहल घडवून आणण्यात येते व त्यात त्यांना वनांबाबतीत माहिती, वनांचे, वन्यप्राण्यांचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात येते. याकरिता अशासकीय संस्था/तज्ज्ञ व वनअधिकारी, कर्मचारी, जिल्हा परिषद व आदिवासी विकास विभागाचा सहभाग घेण्यात येतो, हा कार्यक्रम आतापर्यंत



नागपूर वनविभाग, चंद्रपूर वनवृत्त, गडचिरोली वृत्त व गोंदिया वन विभागात राबवण्यात आला असून त्याला चांगला प्रतिसाद लाभलेला आहे. संपूर्ण राज्यात २०२१-२२ मध्ये हा कार्यक्रम राबवण्याचे नियोजित आहे. २०२१-२२ मध्ये निसर्गानुभव कार्यक्रम राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये राबवण्याचे प्रस्तावित आहे. जेणेकरून अंदाजे ७०,००० विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश करून घेणे शक्य होईल व या सर्वांनाच वने व वन्यजीव यांचे ज्ञान व त्यांच्या संवर्धनार्थ शासनाचे प्रयत्न यांची माहिती होईल.

या निसर्गानुभव क्षेत्रामध्ये खाड्या, कांदळवन क्षेत्र, लोणार सरोवर, विविध गडकिल्ले यांचा समावेश करण्यात आलेला आहे. वनक्षेत्रातील पर्यटनामध्ये निसर्ग पायवाटा, मचाणवर राहण्याचा अनुभव, रात्र सफारी, सायंकाळ अवकाश अवलोकन, काजवा निरीक्षण, पक्षी निरीक्षण यांसारख्या विविध बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

## साहसी पर्यटनालाही चालना

या सर्व पर्यटनातील साहसी पर्यटन हा सुद्धा महत्त्वाचा भाग असून तो मात्र राज्याच्या 'पर्यटन व सांस्कृतिक विकास' विभागामार्फत राबवण्यात येत आहे. कारण साहसी पर्यटन उपक्रमात सहभागी होणाऱ्या व्यक्तींच्या सुरक्षिततेची फार मोठी जबाबदारी हे पर्यटन आयोजित करणाऱ्या आयोजकांकडे राहील. प्रस्तरारोहण, कृत्रिम भिंतीवरील स्पर्धात्मक प्रस्तरारोहण, हवाई खेळ हे स्वयंक्षमता व स्वयंजबाबदारी यापेक्षा सुद्धा ४-५ जणांच्या चमूने मिळून करावयाचे साहसी खेळ असल्याने त्यासाठी अत्यंत अनुभवी संस्था किंवा व्यक्ती हे आयोजक म्हणून असणे अत्यंत गरजेचे आहे व यासाठी नोंदणी शासनाच्या संबंधित विभागाकडे करणे गरजेचे आहे, यासाठी महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन संचालनालयात साहसी उपक्रमांकरिता एका स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्यात येणार असून, साहसी पर्यटनामध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्ती व आयोजकांकडे या पर्यटनाचे स्वरूप लक्षात घेता पुरेसे विमा सुरक्षा कवच असेल, याची खात्री करण्यात येणार आहे.

साहसी पर्यटन उपक्रमाच्या परिणामकारक अंमलबजावणीकरिता राज्यस्तरावर अपर मुख्य सचिव (पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखाली एक राज्यस्तरीय समिती तर विभागीय स्तरावर उपसंचालक (पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात येणार आहे व या साहसी उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संचालक (पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखाली एक साहसी पर्यटन उपक्रम कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. या सर्वच धोरणांमुळे

## बृहतआराखडे तयार

निसर्ग मंडळाने या पर्यटनास चालना देण्यासाठी काही क्षेत्रांचे बृहतआराखडे तयार केले असून त्यामध्ये एखाद्या निसर्गपर्यटन स्थळाचा कसा विकास करता येईल यासाठी काही महत्त्वाचे मुद्दे तयार केले आहेत. निसर्ग पर्यटनामध्ये वन्यजीव पर्यटन, वारसा स्थळांचे पर्यटन, रमणीय भूप्रदेश पर्यटन, शहरी वने पर्यटन, साहसी पर्यटन याचा समावेश आहे व या ५ विविध प्रकारच्या पर्यटनांतर्गत महाराष्ट्रातील मेळघाट, काटेपूर्ण, ज्ञानगंगा, ताडोबा, पेंच, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, माळढोक पक्षी अभयारण्य, गौताळा अभयारण्य ही क्षेत्रे वन्यजीव पर्यटनासाठी, राजगड किल्ला, तोरणमाळ किल्ला, रोहिडा किल्ला, रायरेश्वर किल्ला, सिंहगड किल्ला, राजमाची किल्ला हे किल्ले वारसास्थळ पर्यटनासाठी, गोराई कांदळवने, दहिसर कांदळवन, ऐरोली कांदळवन क्षेत्र हे 'शहरी वने' पर्यटनासाठी निवडण्यात आली असून या ठिकाणी अतिशय चांगल्या रीतीने पर्यटन कसे करता येईल? या दृष्टीने आराखडे तयार करण्याचे काम सुरू आहे. हे आराखडे करत असताना त्या जागेचे महत्त्व लक्षात घेऊन तेथे कशा प्रकारे पर्यटनास चालना देता येऊ शकेल? याचे नियोजन करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

एकंदरीतच आपल्या या राज्यातील निसर्ग व साहसी पर्यटन अतिशय चांगल्या प्रकारे वकोणताही अनुचित प्रकार न घडता पर्यटनांचा आनंद घेऊन स्थानिकांना त्यामधुन रोजगार मिळेल या पद्धतीने करण्यासाठी शासनाचे अविरत प्रयत्न सुरू आहेत व आता कोविड-१९ च्या परिस्थितीतून हळूहळू सर्वच जण बाहेर येत असताना लोकांना चांगल्या पर्यटनाचा अनुभव व लाभ मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध आहे.

**लेखक राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) आहेत.**

# रोजगाराचे महाद्वार

> **पर्यटनस्थळी आलेला पर्यटक हा फिरण्यासाठी वाहनाचा वापर करतो. त्याद्वारे वाहन चालक, मालक आणि वाहतुकीशी संबंधित पेट्रोलपंप इत्यादी ठिकाणी व्यवसायाला आणि रोजगाराला चालना मिळते. पर्यटक एखाद्या लॉज किंवा हॉटेलमध्ये मुक्काम करतो. त्याचबरोबर तो रेस्टॉरंटमध्ये खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतो. या माध्यमातून संबंधित सर्व क्षेत्रातील लोकांना व्यवसाय आणि रोजगार मिळतो.**

**इर्शाद बागवान**

महाराष्ट्र राज्य हे अगदी सुरुवातीपासूनच पर्यटन क्षेत्रातील देशामधले अग्रेसर राज्य राहिले आहे. देशांतर्गत तसेच आंतर्देशीय पर्यटक महाराष्ट्रामध्ये मोठ्या संख्येने भेट देतात, किंबहुना परदेशातून भारतात येणाऱ्या पर्यटकांपैकी सर्वाधिक पर्यटक हे महाराष्ट्रात येतात. त्यामुळे महाराष्ट्र हे देशविदेशातील पर्यटकांचे नेहमीच आवडते ठिकाण राहिले आहे. आपले राज्य हे पर्यटन वैविध्याने समृद्ध आहे. येथे एकीकडे सुमारे ७०० किलोमीटरचा समुद्रकिनारा आहे, त्याच वेळी जंगले, पर्वतरांगा, हिल स्टेशन्स, व्याघ्र प्रकल्प, प्राचीन आणि पुरातन मंदिरे, गुंफा, हेरिटेज वारसास्थळे, देशात सर्वाधिक संख्येने असलेले गडकिल्ले, जलदुर्ग अशी विविध आकर्षक पर्यटनस्थळे आहेत.

## पर्यटनातून संधी

पर्यटन हा जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आपल्या देशातीलही काही राज्ये पर्यटनावर अवलंबून आहेत. पर्यटनामधून रोजगाराच्या विपुल संधी उपलब्ध होतात. एक पर्यटक साधारण २० जणांना रोजगार देतो. पर्यटनस्थळी आलेला पर्यटक हा फिरण्यासाठी वाहनाचा वापर करतो, त्याद्वारे वाहन चालक, मालक आणि वाहतुकीशी संबंधित पेट्रोलपंप इत्यादी ठिकाणी व्यवसायाला आणि रोजगाराला चालना मिळते. पर्यटक एखाद्या लॉज किंवा हॉटेलमध्ये मुक्काम करतो. त्याचबरोबर तो रेस्टॉरंटमध्ये खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतो. या माध्यमातून संबंधित सर्व क्षेत्रातील लोकांना व्यवसाय आणि रोजगार मिळतो. यामध्ये भाजीपाला, अन्नपदार्थांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यापासून ते पर्यटकाला सेवा देणाऱ्या वेटरपर्यंत अशा विविध घटकांचा समावेश होतो. पर्यटक स्थानिक पातळीवरील विविध वस्तूंचे शॉपिंग करतो. यामुळेही बाजारपेठेतील व्यवसायाला तसेच त्या वस्तू उत्पादन करणारे कारखाने, कारागीर यांच्या व्यवसायाला आणि रोजगार निर्मितीला चालना मिळते. पर्यटकांची ने-आण करणाऱ्या पर्यटन कंपन्या, टूर ॲण्ड ट्रॅव्हल ऑपरेटर हे तर प्रत्यक्ष पर्यटनावर अवलंबून असणारेच व्यवसाय आहेत. अशा पद्धतीने पर्यटनवाढीतून त्या त्या परिसराची व्यवसायवृद्धी आणि रोजगारामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करता येते. त्यामुळेच अनेक देश आणि राज्ये पर्यटकांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करत असतात.



## नव्या पर्यटनस्थळांची निर्मिती

आपल्या राज्यात पर्यटनसमृद्धी असली तरी सर्व ठिकाणी पर्यटकांचा वावर दिसत नाही. त्यामुळे नवनवीन पर्यटनस्थळे विकसित करून त्या ठिकाणी रोजगाराच्या आणि व्यवसायवृद्धीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनामार्फत व्यापक प्रयत्न करण्यात येत आहेत. या अनुषंगाने राज्य शासनाने नुकतीच कृषी पर्यटन धोरणाला मान्यता दिली आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना एक पूरक उत्पादन साधन उपलब्ध होत आहे. अनेक शेतकरी आपल्या शेतामध्ये पर्यटकांना निमंत्रित करून त्यांना कृषी पर्यटन आणि ग्राम पर्यटनाचा आनंद मिळवून देत आहेत. शहरातील धकाधकीच्या जीवनाला कंटाळलेले शहरी नागरिकही कृषी

## पर्यटकांशी सौजन्यशील वागणूक अत्यावश्यक

बऱ्याच ठिकाणी पर्यटकांना काही वेळा अनुचित प्रकाराला सामोरे जावे लागते. विशेषतः युरोप, अमेरीका किंवा आफ्रिकन खंडातून आलेल्या विदेशी पर्यटकांना तसेच आपल्याच देशातील मणिपूर, मिझोराम आदी ईशान्येकडील राज्यातील पर्यटकांना काही प्रसंगी अनुचित प्रकाराला सामोरे जावे लागल्याचे आढळते. त्यामुळे राज्याची तसेच देशाची प्रतिमा खराब होते. त्यामुळे पर्यटकांशी नेहमीच आदरातिथ्य भावाने वागले पाहिजे. 'अतिथी देवो भवं' ही आपली संस्कृती आहे. त्यामुळे देश-विदेशातून येणाऱ्या अतिथींचे चांगले स्वागत करणे हे आपले कर्तव्य ठरते. आपली संस्कृती, आपल्या परंपरा, वैविध्याने नटलेला आपला देश, आपले राज्य हे पर्यटकांपर्यंत चांगल्या पद्धतीने पोहोचवणे, पर्यटकांना सुखद अनुभव मिळवून देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य ठरते. येणारा प्रत्येक पर्यटक हा आपल्यातील अनेकांना चांगला व्यवसाय आणि रोजगार मिळवून देणार असतो, याचे कायम भान ठेवून पर्यटकांसमवेत आदराने वागले पाहीजे, त्यांचा चांगला पाहुणचार केला पाहीजे.

आपल्या राज्यातील लाखो लोक पर्यटन आणि आदरातिथ्य व्यवसायावर अवलंबून आहेत. शिवाय तितकेच लोक अप्रत्यक्षपणे पर्यटनाशी संबंधित उपव्यवसायावर अवलंबून आहेत. महाराष्ट्रात या क्षेत्राला वाढीसाठी अजूनही खूप मोठ्या प्रमाणात वाव आहे. राज्यातील मराठवाडा, खानदेश, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण अशा सर्वच ठिकाणी आणि सर्वच जिल्ह्यांमध्ये पर्यटनाची वेगवेगळी आकर्षणस्थळे आहेत. त्या ठिकाणी पर्यटनाला चालना देऊन, चांगल्या दर्जाच्या पर्यटनसुविधा उभ्या करून पर्यटकांना आदराची आणि सौजन्याची वागणूक देऊन त्यांना आपल्याकडे आकर्षित करून त्या माध्यमातून स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार, स्वयंरोजगार आणि व्यवसाय वृद्धीची संधी उपलब्ध होऊ शकते. सर्वांनी पर्यटन व्यवसायाकडे या अंगाने पाहणे ही काळाची गरज आहे. आता तर कोरोनोत्तर काळात पर्यटनाला मोठा उठाव मिळणार असून त्यादृष्टीने सर्वांनी याकडे एक संधी म्हणून पाहणे गरजेचे आहे.

आणि ग्रामीण पर्यटनाला पसंती देत आहेत. राज्याच्या विविध भागात आंबा महोत्सव, काजू महोत्सव, संत्रा महोत्सव, हुरडा महोत्सव, स्ट्रॉबेरी महोत्सव, द्राक्षे महोत्सव यासारख्या कृषी पर्यटन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहेत. काही शेतकऱ्यांनी शेतामध्येच निवासाची व्यवस्था उपलब्ध करून त्यामाध्यमातून पर्यटकांना अनुभवजन्य पर्यटनाचा आनंद मिळवून देण्यात येत आहे. बैलगाडी सफारी, विहिरीत पोहणे, चुलीवरची भाकरी, झाडावर चढणे अशा छोट्या-छोट्या गोष्टींनाही नागरी भागातील पर्यटक पसंती देत आहेत. नागरी भागाची ही गरज पाहता कृषी पर्यटनाला महाराष्ट्रात मोठा वाव आहे. शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांनी कृषी पर्यटनाचे व्यवस्थित मार्केटिंग आणि व्यवस्थापन करून शहरी पर्यटकांसाठी चांगल्या सोयी-सुविधा उपलब्ध करून ही संधी साधली पाहिजे. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था आणि त्या भागात रोजगार निर्मितीला मोठ्या प्रमाणात चालना मिळू शकते. आपल्या राज्यातील जवळपास सर्वच भागात कृषी पर्यटनाला मोठा वाव आहे.

## संस्कृतीची देवाणघेवाण

कोकणामध्ये अनेक लोकांनी आपल्या घराच्या बाजूला किंवा पहिल्या माळ्यावर पर्यटकांसाठी निवासाची व्यवस्था उपलब्ध करून होम स्टे पर्यटनाला चालना दिली आहे. न्याहरी आणि निवासाची सोय मिळत असल्याने पर्यटकांनाही स्थानिक संस्कृती आणि खाद्यपदार्थांचा आस्वाद घेता येत आहे. कोकणामध्ये होमस्टे पर्यटनातून अनेक लोकांना आणि विशेषतः महिलांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाने होम स्टे पर्यटनाला चालना देण्यासाठी एअर बीएनबीसारख्या नामवंत होम स्टे पर्यटन कंपन्यांबरोबर सामंजस्य करार केले आहेत.

राज्य शासनाने बीच शॅक धोरण मंजूर केले आहे. त्यानुसार कोकणातील आठ समुद्रकिनाऱ्यांवर बीच शॅकना मान्यता देण्यात आली आहे. या ठिकाणी ८० टक्के रोजगार हे स्थानिकांना मिळतील. या माध्यमातूनही भविष्यात रोजगाराच्या मोठ्या संधी कोकणामध्ये उपलब्ध होणार आहेत.

राज्य शासनाने आदरातिथ्य क्षेत्राला उद्योगाचा दर्जा दिल्याने अनेक हॉटेल, रेस्टॉरंट आणि आदरातिथ्य क्षेत्रातील व्यावसायिक महाराष्ट्रामध्ये व्यवसाय करण्यास उत्सुकता दाखवत आहेत. ताज हॉटेलसारखी नामवंत कंपनी सिंधुदुर्गमध्ये गुंतवणूक करत आहे. अशा पद्धतीने विविध पर्यटनस्थळांवर पर्यटकांना सुविधा उपलब्ध करून देणारे पंचतारांकित हॉटेल, दर्जेदार रेस्टॉरंट निर्माण झाल्यास त्या माध्यमातून स्थानिकांना मोठ्या प्रमाणात स्वयंरोजगार, रोजगार मिळू शकतो. एक हॉटेल किंवा एक रेस्टॉरंट अनेकांना रोजगार देऊ शकतो. रोजगार निर्मितीच्या अनुषंगाने आदरातिथ्य व्यवसाय फार महत्त्वाचा मानला जातो.

धार्मिक तथा अध्यात्मिक स्थळे, तीर्थक्षेत्रे यांच्या ठिकाणीही महाराष्ट्रात पर्यटनाला मोठा वाव आहे. अशा ठिकाणी पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यावर भर देण्यात येत आहे, देशात गडकिल्ल्यांची सर्वाधिक संख्या महाराष्ट्रात आहे. शिवाय जलदुर्ग हे फक्त महाराष्ट्रातच आहेत. ही ठिकाणे पर्यटकांची मोठी आकर्षण केंद्रे आहेत. या ठिकाणीही व्यवसाय वृद्धी आणि रोजगार निर्मितीला चालना देण्यात येत आहे.

केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या पर्यटन संचालनालयामार्फत राज्यात ऑनलाईन पद्धतीने पर्यटन मार्गदर्शक तथा गाईडच्या प्रशिक्षणासाठी कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या माध्यमातून आतापर्यंत ७०० हून अधिक युवक-युवतींना गाईडचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. राज्यातील प्रमुख पर्यटनस्थळांवर अशा पद्धतीने अधिकृत गाईड निर्माण करण्यासाठी पर्यटन संचालनालय उपक्रम राबवत आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

# इलेक्ट्रिक वाहन धोरण

**पर्यावरणाची काळजी ही आता काळाजी गरज बनली आहे. महाराष्ट्र राज्य शासनाने यासाठी विविध पावले टाकली असून आता कार्बन फूटप्रिंट कमी करण्यासाठी इलेक्ट्रीक वाहनांचा वापर वाढावा यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण जाहीर केले आहे. पर्यावरणासाठी आणि वापरकर्त्यांसाठी दोघांसाठी हे लाभाचे धोरण आहे. असे धोरण करून महाराष्ट्राने पर्यावरणाच्या संरक्षणात एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.**

**ब्रिजकिशोर झंवर**

फयान, तौक्ते, निसर्ग या नावांची चर्चा आजकाल सर्वांच्या तोंडी असते. हवेचे व ध्वनीचे वाढते प्रदूषण, मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड आदींमुळे निसर्गाचा समतोल बिघडू लागला आहे. जागतिक तापमानात सतत वेगाने होणारी वाढ, वेळी-अवेळी पडणारा पाऊस, दडी मारून बसलेली थंडी असे प्रतिकूल चक्र जगभर निदर्शनास येत आहे.

वातावरणीय बदलामुळे होत असलेले हे दुष्परिणाम भविष्यात अधिक गंभीर होत जातील. ते कमी करण्यासाठी गेली दीड वर्षे राज्य शासनाच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागासह इतर सर्वच विभाग हा विषय गंभीरपणे हाताळत आहेत. किनारपट्टीची धूप थांबवणारी ९८०० हेक्टर कांदळवनं ही भारतीय वन कायद्यात आणली गेली आहेत. ८०८ एकरचे आरेचे जंगल वाचवण्यात यश आले आहे. सांगलीमधील ४०० वर्षे जुने झाड केंद्राच्या मदतीने शासनाने वाचवले. राज्यात नवीन जलाशये तयार केली आहेत.

पर्यावरण रक्षणासाठी ग्रामीण आणि शहरी भागातही लक्ष देणे गरजेचे आहे. यासाठी पंचमहाभूतांपैकी प्रत्येकावर शासनाने काही ना काही काम केले आहे. या वर्षी विभागीय आणि जिल्हा प्रशासनाच्या पातळीवर 'माझी वसुंधरा अभियान' राबवण्यात आले. मुंबईसह राज्यात साधारणपणे २१ लाख झाडे लावली गेली. २०३० पर्यंत कार्बन न्यूट्रल पुणे करण्याचा प्रयत्न सुरू आहे. पाणी वाचवण्यासाठी महाराष्ट्र जेवढे पाणी एका दिवसात वापरते तेवढे पाणी रेन वॉटर हॉर्वेस्टिंग ॲण्ड पर्क्युलेशन पीटस्‌द्वारे वाचवण्यात यश आले आहे. एलईडी लाईटस्, सोलर पॅनल, रूफ टॉप सोलर पॅनलचा वापर वाढवण्यात आला आहे.

हे करताना जगभरात आता जो ट्रेण्ड सुरू आहे तो म्हणजे इलेक्ट्रिक वाहनांचा वापर. यासाठी शासनाने उत्पादक, वापरकर्ता



आणि पर्यावरण रक्षण या सर्वांचा विचार करून सुधारित इलेक्ट्रिक वाहन धोरण आणले आहे. वातावरणीय बदल थांबवण्यासाठी जगभरात पुढील ३-४ वर्षात जी क्रांती होणार आहे, त्यात महाराष्ट्र म्हणून आपण कुठेही मागे पडणार नाही, यासाठी हे पाऊल महत्त्वाचे आहे.

## महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१

### दृष्टिक्षेप (व्हिजन)

- महाराष्ट्रात प्रदूषणरहित वाहनांचा अंगीकार करणे.
- महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रिक वाहनांच्या वापरात देशात अग्रेसर बनवणे.
- महाराष्ट्र राज्याचे अग्रेसर स्थान भारतातील वाहन उत्पादनात कायम राखणे.
- इलेक्ट्रिक वाहन आणि वाहन घटक (Vehicle Parts) याकरिता जागतिक पातळीवर एक प्रमुख उत्पादक आणि गुंतवणूक केंद्रस्थान म्हणून उदयास येणे.

### अभियान (मिशन)

- मागणीविषयक प्रोत्साहनाद्वारे महाराष्ट्रात इलेक्ट्रिक वाहनांची खरेदी आणि वापर वाढवून राज्याच्या वाहतूक परिस्थितीत अनुकूल बदल घडवून आणणे.
- उत्पादकांसाठीच्या प्रोत्साहनाद्वारे राज्यात गुंतवणूक आकर्षित करून, इलेक्ट्रीक वाहन निर्मितीचे कारखाने तसेच ॲडव्हान्स केमिस्ट्री बॅटरी सेल (ACC) आणि इलेक्ट्रिक वाहन रिसायक्लिंग कारखाने राज्यात स्थापित करून उत्पादनास प्रोत्साहन देणे.

### धोरणाची उद्दिष्टे (ऑब्जेक्टिव्हज)

- सन २०२५ पर्यंत नवीन वाहन नोंदणीत १० टक्के हिस्सा बॅटरी इलेक्ट्रिक वाहनांचा असेल, अशा रीतीने वाहनांचा वापर वाढवणे.
- मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक या सहा प्रमुख शहर समुहांमध्ये किमान २५ टक्के सार्वजनिक वाहतूक वाहने ही बॅटरी इलेक्ट्रिक वाहन प्रकारातील असावीत. तसेच एसटी महामंडळाच्या एकूण ताफ्यापैकी १५ टक्के इलेक्ट्रिक बसेस असाव्यात.
- सहा प्रमुख शहर समूहांमधील ताफा परिचालक, ताफा समूहक (Ola, Uber, Amazon, Flipkart, Swiggy etc.) यांच्या एकूण वाहनांपैकी २५ टक्के वाहने ही इलेक्ट्रिक असावीत.
- महाराष्ट्राला भारतातील इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षमतेच्या बाबतीत सर्वोच्च उत्पादक राज्य करणे.
- राज्यात ॲडव्हान्स केमिस्ट्री सेल (ACC) बॅटरी उत्पादनासाठी किमान एक गिगा फॅक्टरी स्थापित करणे.
- राज्यात इलेक्ट्रिक वाहने आणि त्यांचे घटक यासाठी संशोधन आणि विकास तसेच कौशल्य विकास यांचे नियोजन करणे ही या धोरणाची उद्दिष्टे आहेत.



**आदित्य ठाकरे**
पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री

### पर्यावरण संवर्धन

जगभर वातावरणीय बदल होत आहे. वातावरणातील या बदलाचे गंभीर परिणाम आपण सर्वचजण अनुभवत आहोत. उष्णतेमधील वाढ, वारंवार येणारी चक्रीवादळे, अतिवृष्टी तर कधी दुष्काळ अशा आपत्तींचा आपल्याला सामना करावा लागत आहे. हजारो कोटी रुपये नुकसानभरपाईसाठी खर्च करावे लागत आहेत. याची कारणे वेगवेगळी असली तरीही याचे मूळ हे वातावरणीय बदलांमध्येच आहे, हे निश्चित. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण-२०२१ च्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक पाऊल टाकले आहे, यासाठी पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागाने पुढाकार घेतला आहे.

### धोरण लक्ष्यांक (टारगेट्स)

- मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक ही प्रमुख शहरे आणि चार प्रमुख महामार्ग (मुंबई-पुणे, मुंबई-नाशिक, पुणे-नाशिक, मुंबई-नागपूर) यावर इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग व्यवस्था (२५००) उपलब्ध करून देणे.
- एप्रिल २०२२ पासून सर्व नवीन शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत व शासनाच्या निधीमधून खरेदी करण्यात येणारी वाहने ही बॅटरी इलेक्ट्रिक वाहने असतील.

### प्रस्तावित धोरण प्रारूप

- प्रस्तावित धोरणाचा कार्यकाळ- २०२१ ते २०२५ असा असेल.
- या धोरणात मागणीविषयक, चार्जिंग सुविधांची निर्मिती आणि उत्पादन क्षेत्र अशी तीन प्रकारची प्रोत्साहने दिली जातील.
- या अतिरिक्त बिगर-वित्तीय प्रोत्साहने व कौशल्य विकास उपक्रम प्रस्तावित आहे, ज्याअन्वये महाराष्ट्र राज्य हे ईव्हीसंबंधी देशात अग्रेसर होईल.
- तसेच या धोरणासाठीची समर्पित निधी तरतूद व अंमलबजावणी यंत्रणा प्रस्तावित केलेल्या आहेत.

### मागणीविषयक प्रोत्साहने

**मूलभूत मागणी प्रोत्साहने :**

**अ) वाहन बॅटरी क्षमतेनुसार वाहन खरेदीसाठी प्रतिवाहन अतिरिक्त प्रोत्साहन** ५००० रुपये /kWh.

१) प्रथम नोंदणी होणाऱ्या १,००,००० दुचाकी वाहनांसाठी कमाल रुपये १०,००० प्रतिवाहन, २) प्रथम नोंदणी होणाऱ्या २५,००० तीन चाकी वाहनांसाठी कमाल रुपये ३०,००० प्रतिवाहन, ३) प्रथम नोंदणी होणाऱ्या २०,००० चार चाकी वाहनांसाठी कमाल रुपये १,५०,००० प्रतिवाहन प्रोत्साहन दिले जाईल.




**ब) त्वरित नोंदणी सूट** : ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत नोंदणी होणाऱ्या दुचाकी आणि तीनचाकी वाहनांसाठी रुपये ५०००/- kWH 'त्वरित नोंदणी' अतिरिक्त प्रोत्साहन. महत्तम त्वरित नोंदणी सूट ही रुपये एक लाख प्रतिवाहन इतकी मर्यादित असेल.

**क) वाहन मोडीत काढण्यासाठीचे प्रोत्साहन** : वाहन मोडीत काढण्यासाठी (स्क्रॅपेज धोरणानुसार) प्रतिवाहनास जास्तीत जास्त रुपये २५,०००/- पर्यंत प्रोत्साहन.

**ड) दुचाकी आणि तीनचाकी वाहनांसाठी आश्वासित बायबॅक आणि बॅटरी हमी प्रोत्साहन.**

**इ) इतर मागणीविषयक प्रोत्साहने** : सर्व इलेक्ट्रिक वाहनासाठी, मोटर वाहन कर आणि नोंदणी शुल्कामध्ये १०० टक्के माफी.

## ईव्ही चार्जिंग पायाभूत सुविधांच्या विकासासाठी प्रोत्साहने

- राज्यात व्यापक प्रमाणात पायाभूत ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारणीसाठी/ स्थापित करण्यासाठी १५ हजार मंदगती चार्जिंग स्टेशनकरिता प्रतिचार्जिंग स्टेशन रुपये १० हजार म्हणजेच १५ कोटी रुपये, तर मध्यम/ वेगवान गतीच्या ५०० चार्जिंग स्टेशनकरिता प्रतिचार्जिंग स्टेशन रुपये पाच लाख म्हणजे २५ कोटी रुपये महत्तम प्रोत्साहन दिले जाईल.
- ईव्ही चार्जिंग स्टेशनला सोयीसुविधा म्हणून मान्यता देऊन स्थानिक स्वराज संस्थांनी शहरांच्या विकास योजनांमध्ये ईव्ही चार्जिंग स्टेशनसाठी जागा राखीव ठेवण्याचे प्रस्तावित आहे.
- निवासी मालकांना त्यांच्या आवारात खासगी चार्जिंग स्टेशन स्थापित करण्यासाठी मालमत्ता करात सूट देण्यास शहरी स्थानिक संस्था प्रोत्साहित करतील.
- महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ / सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी विविध महामार्गांवर चार्जिंग स्टेशनसाठी राखीव जागा ठेवाव्यात.

## मालमत्ता करात सूट

इलेक्ट्रिक वाहनांकरिता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थांतील नागरिक अथवा गृहनिर्माण संस्थांना हे धोरण लागू असेपर्यंत त्यांच्या मालमत्ता करात सूट देण्याचा निर्णय नगरविकास विभागाने घेतला आहे. यामध्ये

- स्वत:च्या वाहनाकरिता चार्जिंग स्टेशन उभारून त्यातून इतर वाहनधारकांना सुविधा उपलब्ध केल्यास मालमत्ता करात दोन टक्के सूट.
- गृहनिर्माण संस्थांमध्ये सामायिक सुविधांतर्गत सदस्यांना चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास पाच टक्के इतक्या कमाल मर्यादेपर्यंत सूट. तर,
- गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्या मालकीच्या जागेत व्यापारी तत्त्वावर इलेक्ट्रिक वाहन चार्जिंगची सुविधा मूळ पार्किंग वगळता अन्य मोकळ्या जागेत केल्यास त्या जागेकरिता व्यापारी दराने मालमत्ता कराची आकारणी न करता ती घरगुती दराने करावी, अशा सवलती देण्यात येतील.

  तथापि, हे करत असताना इतर रहदारीस अडथळा होणार नाही, याची दक्षता मालमत्ता धारकाने घ्यायची आहे.

### ईव्ही उत्पादन क्षेत्र प्रोत्साहने

- महाराष्ट्र शासनाने इलेक्ट्रिक वाहन संबंधित उत्पादन आणि संशोधन व विकास केंद्रे (विविध वाहन घटक उत्पादन, वाहन जुळणी, बॅटरी जुळणी, बॅटरी सेल उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स भाग उत्पादन आणि इलेक्ट्रिक वाहन बॅटरीचा पुनर्वापर इत्यादी) स्थापित करण्यासाठी तसेच यासंदर्भात गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.
- राज्यातील ईव्ही उत्पादन प्रकल्पाचे स्थान विचारात न घेता विशाल प्रकल्पाच्या 'डी+' प्रवर्गाखालील/इतर प्रवर्गातील श्रेणीतील सर्व लाभ या उद्योगांना देण्यात येतील.
- ही प्रोत्साहने शासन निर्णयाच्या तारखेपासून लागू होतील.

### नवतंत्रज्ञान प्रशिक्षण व रोजगार निर्मिती

शासन संबंधित / इच्छुक वाहन उत्पादक, सेवा प्रदाताच्या भागीदारीत इलेक्ट्रिक वाहनाविषयी आणि शैक्षणिक संस्था यांच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांचे आरेखन व विविध औद्योगिक संस्थांमधून कुशल मनुष्यबळाची निर्मिती केली जाईल. या संदर्भात उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग तसेच कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत विस्तृत योजना तयार केली जाईल. महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटींतर्गत इलेक्ट्रिक वाहन नवउद्योजकांना उत्तेजन दिले जाईल.

### धोरण अंमलबजावणी आणि आर्थिक तरतूद

- राज्य शासनाची मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील एक सुकाणू समिती (Steering Committee) धोरणाची प्रगती, धोरणाच्या अंमलबजावणीतील मुख्य व्यत्यय दूर करणे आणि गरजेनुसार त्यात सुधारणा करण्याच्या संदर्भात मार्गदर्शन करेल.
- महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रिक वाहन उपविभाग हा सुकाणू समितीला साहाय्य करेल. या विभागात तज्ज्ञ व व्यावसायिकांचा समावेश असेल आणि तो इलेक्ट्रिक वाहन धोरणाचे दैनंदिन परिचालन आणि संनियंत्रण करेल. हा उपविभाग पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागात निर्माण केला जाईल.



- धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पुढील चार वर्षात अंदाजे ९३० कोटी रुपये महत्तम खर्च अपेक्षित असून मागील धोरणाचा अनुभव तसेच सद्य:स्थितीतील इलेक्ट्रिक वाहनांची विक्री विचारात घेता अंमलबजावणी करताना अंदाजे ३७२ कोटी रुपये एवढा खर्च टप्प्याटप्प्याने पुढील चार वर्षात होण्याची शक्यता आहे.

नुकतेच ७४ व्या बेस्ट दिनाचे औचित्य साधून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते आणि पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत मुंबईतील सार्वजनिक वाहतूक सेवा देणाऱ्या बेस्टच्या ताफ्यात प्रदूषण न करणाऱ्या २४ पर्यावरणपूरक गाड्यांचा समावेश करण्यात आला. सध्या बेस्टकडे ३८६ इलेक्ट्रिक बसेस आहेत, तर नुकतीच १९०० इलेक्ट्रिक बसेससाठी बेस्टने निविदा काढली आहे. 'आंतरराष्ट्रीय इलेक्ट्रिक वाहनदिना'निमित्त मुंबई महानगरपालिकेनेही आपल्या ताफ्यात प्रतिकूल वायूंचे उत्सर्जन न करणाऱ्या पाच वाहनांचा समावेश करून मार्गदर्शक संदेश दिला आहे.

निती आयोगासमवेत नुकत्याच मुंबईत झालेल्या बैठकीत निती आयोगाने राज्याच्या इलेक्ट्रिक वाहन धोरणाचे कौतुक केले. महाराष्ट्राने भविष्याचा वेध घेऊन इलेक्ट्रिक वाहन धोरण आणून चांगले पाऊल टाकले अशा शब्दात मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ कांत यांनी प्रशंसा केली. या वाहनांचा उपयोग आणि चार्जिंग स्थानके वाढवण्याच्या त्यांच्या सूचनेनुसार विभागाची कार्यवाही सुरू आहे. सार्वजनिक वाहतुकीसाठी यापुढे इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देण्याचे धोरण आहे. त्यानुसार मंत्री आदित्य ठाकरे यांनी नुकतीच पर्यावरण विभागासह शासकीय आणि निमशासकीय पातळीवर सार्वजनिक वाहतूक चालवणाऱ्या संस्था तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत चर्चा केली आहे. १५व्या वित्त आयोगाने राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत हवेचा दर्जा सुधारण्यासाठी अनुदानाचे वाटप केले आहे, त्यानुसार इलेक्ट्रिक वाहनांचा अंगीकार हा हवेचा दर्जा सुधारण्यासाठी सहायक होऊ शकतो. या अनुषंगाने लवकरच राज्यातील सार्वजनिक वाहतुकीची वाहने ही इलेक्ट्रिक वाहने असतील याचा विचार करून कालबद्ध नियोजन केले जात आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

# पाऊल पडते पुढे



**उद्धव बाळासाहेब ठाकरे**
मुख्यमंत्री

**कोरोनाशी आपली झुंज चालू आहे. त्यासाठीच्या उपाययोजनांवर राज्य शासनाने अधिक काम केले आहे किंबहुना ते चालूच आहे. कोविडच्या संभाव्य तिसऱ्या लाटेला रोखण्याच्या उपाययोजनांबाबत कोविड राज्य कृतिदलाने नुकतीच 'माझा डॉक्टर' ही ऑनलाईन वैद्यकीय परिषद घेतली. लसीकरणात आपण आघाडीवर आहे. राज्याच्या काही भागात अतिवृष्टीमुळे खूप मोठे नुकसान झाले आहे. शासन योग्य ती मदत करत आहे. या परिस्थितीतही मोठ्या जिद्दीने आणि धैर्याने शासन सर्व संकटावर मात करत पुढचे पाऊल टाकत आहे. वेळोवेळी घेतलेले निर्णय, प्रकल्पांचा शुभारंभ अशा अनेक बाबींचा थोडक्यात आढावा...**

## लसीकरण वाहनांचे हस्तांतरण

मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलाच्या प्रांगणात विदर्भ सहायता सोसायटी आणि महापारेषण यांच्या संयुक्त विद्यमाने सद्‌भावना जीवनरथ दोनशे लसीकरण वाहनांचे हस्तांतरण मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. महापारेषण कंपनीतर्फे लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबवण्यासाठी २५ कोटी रुपयांचा सीएसआर निधी विदर्भ सहायता सोसायटीला उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निधीतून विदर्भातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना दोनशे लसीकरण वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या लसीकरण वाहनांचे हस्तांतरण महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी ऊर्जामंत्री तथा पालकमंत्री डॉ. नितीन राऊत, पशुसंवर्धन मंत्री सुनील केदार, महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री राजेश टोपे, कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक, गृह राज्यमंत्री शंभूराज देसाई, रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे उपस्थित होते.

## नवीन इंटरसेप्टर वाहने

राज्यातील परिवहन विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांना वायुवेग पथकांसाठी अत्याधुनिक अशा ७६ वाहनांचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते एमएमआरडीए मैदान, वांद्रे-कुर्ला संकुल येथे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास परिवहन मंत्री ॲड. अनिल परब, परिवहन राज्यमंत्री सतेज उर्फ बंटी डी. पाटील, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, परिवहन आयुक्त अविनाश ढाकणे आदी उपस्थित होते.



वायुवेग पथक वाहनांचे लोकार्पण करून हिरवा झेंडा दाखवताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे.

**वायुवेग पथक व वाहनांविषयी :** राज्यामध्ये वाहन तपासणीसाठी परिवहन विभागाची एकूण ९२ वायुवेग पथके आहेत. राज्य रस्ता सुरक्षा निधीतून महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीची स्कॉर्पिओ एस - ५ या मॉडेलची ७६ वाहने खरेदी केली आहेत. या वाहनांमध्ये रस्ता सुरक्षेच्या दृष्टिकोनातून प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी स्पीड गन, ब्रेथ ॲनालायझर, व टिंट मीटर उपकरणे, इंटिग्रेटेड कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

## अडीच हजार पुस्तके भेट

चिपळूणमधील लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिराच्या ग्रंथसंपदेचे महापुरामुळे नुकसान झाले होते. या वाचनालयासाठी महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाने अडीच हजार ग्रंथसंपदा भेट दिली आहे. ही ग्रंथसंपदा घेऊन जाणाऱ्या वाहनाला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते रवाना करण्यात आले.

वर्षा शासकीय निवासस्थानी प्रांगणात झालेल्या कार्यक्रमास मराठी भाषा विभागाचे मंत्री सुभाष देसाई, विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे तसेच राज्य मराठी विकास

## पुस्तक प्रकाशन



निवृत्त विभागीय आयुक्त तसेच मुख्यमंत्र्यांचे सल्लागार डॉ. दिपक म्हैसेकर यांनी कोरोना काळातील सर्व वाटचालीचे संकलन करून लिहिलेल्या 'कोविडमुक्तीचा मार्ग' या पुस्तकाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

गेले दीड-पावणेदोन वर्षांपासून आपण सर्वजण कोविडचा मुकाबला करतो आहोत. या सगळ्या प्रवासात आपण वेगवेगळ्या समस्यांना तोंड दिले, वेगवेगळी आव्हाने स्वीकारली, अनेक पावले उचलली. आज दुसऱ्या लाटेचा मुकाबला करत असताना तिसऱ्या संभाव्य लाटेची पण शक्यता आहे, अशा वेळी आपल्या सर्व अनुभवांचे संकलन आवश्यक आहे. जेणेकरून पुढच्या येणाऱ्या पिढीला आपण या संकटाचा मुकाबला कसा केला त्याविषयी विस्तृत माहिती मिळू शकेल. या पुस्तकाच्या माध्यमातून आपल्या सगळ्यांना कोरोनाविषयक कामासाठी पुढील चांगली दिशा मिळेल, अशी आशादेखील मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली.

संस्थेचे संचालक संजय पाटील, मराठी भाषा विभागाचे सहसचिव मिलिंद गवादे, साहित्य व सांस्कृतिक मंडळाच्या सचिव मीनाक्षी पाटील आदी उपस्थित होते.

## इंपिरिकल डेटा : एकमताने सहमती

ओबीसींना राजकीय आरक्षण मिळण्याच्या दृष्टीने राजकीय मागासलेपण स्पष्ट करणारा इंपिरिकल डेटा लवकरात लवकर तयार करावा, यासंबंधीचे निर्देश राज्य मागासवर्ग आयोगास देण्यात यावेत यावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत एकमताने सहमती देण्यात आली.

ओबीसींच्या राजकीय आरक्षणासंदर्भात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथिगृहात सर्वपक्षीय बैठक झाली. बैठकीस महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री जयंत पाटील, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार, परिवहन मंत्री ॲड. अनिल परब, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, खासदार इम्तियाज जलील, आमदार नाना पटोले, कपिल पाटील यांच्यासह सर्वपक्षीय नेते सर्वश्री विनायक मेटे, जोगेंद्र कवाडे, शैलेंद्र कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## 'माझा डॉक्टर' वैद्यकीय परिषद

कोविडच्या संभाव्य तिसऱ्या लाटेला रोखण्याच्या उपाययोजनांबाबत कोविड राज्य कृतिदलाने आयोजित केलेल्या 'माझा डॉक्टर' या ऑनलाईन वैद्यकीय परिषदेचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या परिषदेस सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री राजेश टोपे, वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख, मुख्य सचिव सीताराम कुंटे, आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव प्रदीप व्यास, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव सौरभ विजय, राज्य कोविड कृतिदलाचे अध्यक्ष डॉ. संजय ओक, सदस्य, डॉ. शशांक जोशी, डॉ. राहुल पंडित, डॉ. अजित देसाई, बालकांसाठीच्या राज्य कृतिदलाचे अध्यक्ष डॉ. सुहास प्रभू, अमेरिकेतील डॉ. मेहुल मेहता यांच्यासह राज्यभरातील डॉक्टर्स, नागरिक आणि या क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## शेतकरी शिष्टमंडळासमवेत बैठक

राज्यात अतिवृष्टीमुळे फटका बसलेल्या पूरग्रस्त शेतकऱ्यांना २०१९ च्या निकषाप्रमाणे मदत देण्याचा निर्णय यापूर्वीच घेतला आहे. त्याची अंमलबजावणी तसेच केंद्र शासनाकडून पूरग्रस्तांना देण्यात येणाऱ्या एनडीआरएफच्या मदत निकषात वाढ करण्यात यावी, यासाठी विविध पातळ्यांवरून पाठपुरावा सुरू आहे. याशिवाय पूरपरिस्थिती निर्माण होऊ नये. त्याबाबत कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबतही तज्ज्ञांशी आणि यंत्रणांशी समन्वय साधण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले. पूरग्रस्त शेतकरी, बाधितांना पुन्हा उभे करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

सह्याद्री राज्य अतिथिगृह येथे मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळासमवेत बैठक झाली. या वेळी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे, खासदार अनिल देसाई, खासदार धैर्यशील माने, मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, प्रधान सचिव विकास खारगे, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता आदी उपस्थित होते.

## नीती आयोगाकडून कौतुक

महाराष्ट्राला देशात क्रमांक एकवर आणण्यासाठी नीती आयोगाशी उत्तम समन्वय ठेऊन पावले उचलली जातील, असा विश्वास देऊन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी, राज्याच्या महत्त्वाच्या प्रलंबित प्रश्नांमध्ये केंद्राचे अधिक सहकार्य मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली. जीएसटी परतावा, प्रधानमंत्री पीक विमा योजना, कांजूर मार्ग मेट्रो डेपो, धारावी पुनर्विकासासाठी रेल्वेची जमीन मिळणे, दिघी बंदर विकास, संरक्षण खात्याशी संबंधित जमीन विकासाचे मुद्दे अशा ४१ विषयांवर सह्याद्री अतिथिगृह येथे नीती आयोगाशी विस्तृत चर्चा करण्यात आली.

महत्त्वाचे म्हणजे आयोगाच्या सदस्यांनी या विषयांना तातडीने मार्गी लावण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल, याबाबत आश्वस्त केले. या वेळी नीती आयोगाने इलेक्ट्रिक वाहन धोरण आणि कोविड संसर्ग रोखण्यात महाराष्ट्राने केलेल्या प्रयत्नांची प्रशंसाही केली.

बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांचीही उपस्थिती होती. प्रारंभी नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार, सदस्य रमेश चंद, मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ कांत यांनी उद्योग, कृषी, सिंचन, पायाभूत सुविधा, आरोग्य, सामाजिक योजना या क्षेत्रांत महाराष्ट्राच्या गतिमान विकासासंदर्भात सूचना मांडल्या.

## कार्यबल गट : शिफारशींचे सादरीकरण

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात अभ्यास करून राज्य शासनास अहवाल सादर करण्यासाठी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या कार्यबल गटाच्या शिफारशी आणि सूचनांची लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनामार्फत कार्यवाही करण्यात येईल, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले. शैक्षणिकदृष्ट्या राज्याचा सर्वांगीण विकास करणे आणि या क्षेत्रात राज्याला अग्रेसर ठेवण्यासाठी कार्यबल गटाच्या शिफारशीनुसार सर्वतोपरी उपाययोजना करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

कार्यबल गटाने तयार केलेल्या अहवालाबाबत मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी माहिती देण्यात आली. या वेळी समिती सदस्यांच्या वतीने मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांना अहवालाची प्रत सुपुर्द करण्यात आली. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, खासदार संजय राऊत, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, प्रधान सचिव विकास खारगे, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, कार्यबल गटाचे सदस्य विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात, डॉ. निरंजन हिरानंदानी, डॉ. विजय खोले, ॲड. हर्षद भडभडे, तंत्रशिक्षण संचालक डॉ. अभय वाघ यांच्यासह दूरदृश्य प्रणालीद्वारे कार्यबल गटाचे अध्यक्ष डॉ. माशेलकर उपस्थित होते.

## मराठवाड्याचा कायापालट घडवणार

शिक्षण, आरोग्य, परिवहन, नगरविकास, पायाभूत सुविधा, कृषी अशा विविध क्षेत्रात मराठवाड्याचा आमूलाग्र कायापालट घडवणारे अनेक महत्त्वाचे निर्णय राज्यातील विद्यमान सरकारने घेतले आहेत. त्यांची कालबद्ध अंमलबजावणी करून येथील विकासाची प्रक्रिया अधिक गतिमान केली जाईल, असा निर्धार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनी व्यक्त केला.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त औरंगाबाद येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण महानगरपालिकेच्या सिद्धार्थ उद्यानातील स्मृतिस्तंभाजवळ मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या हस्ते झाले. या वेळी जनतेला संबोधित करताना ते बोलत होते. या कार्यक्रमास केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, उद्योग मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुभाष देसाई, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे, महसूल राज्यमंत्री अब्दुल सत्तार, खासदार सय्यद इम्तियाज जलील, खासदार अनिल देसाई, आमदार अंबादास दानवे, हरिभाऊ बागडे, अतुल सावे, संजय शिरसाट, प्रशांत बंब, मनीषा कायंदे, प्रदीप जैस्वाल, उदयसिंह राजपूत, माजी खासदार चंद्रकांत खैरे उपस्थित होते.

## एसटी महामंडळाला ५०० कोटी

एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर आवश्यक बाबींसाठी ५०० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्यानंतर हा निधी तातडीने वितरित करण्यात आला आहे. चालू आर्थिक वर्षासाठी १४५० कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी ८३८ कोटी रुपयांचा निधी एसटीला आधीच वितरित केला असून उर्वरित ६१२ कोटींपैकी ५०० कोटी रुपये तातडीने एसटी महामंडळाला देण्यात यावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. त्यानंतर तातडीने हा निधी वितरित करण्यात आला. उपमुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार निधी वितरित झाल्याने एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन तसेच महामंडळाचे आर्थिक प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.



**अजित पवार**
उपमुख्यमंत्री

## सामाजिक सुरक्षितता योजनांचा लाभ

महाराष्ट्रातील साखर उद्योग हा प्रमुख उद्योग असून राज्यातील साखर कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या स्थलांतरित ऊसतोडणी कामगारांना सामाजिक सुरक्षितता योजनांचे लाभ देण्यासाठी राज्य शासनाच्या सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. तसेच राज्यातील स्थलांतरित ऊस तोडणी कामगारांच्या जिल्हानिहाय संख्येचे प्रमाण लक्षात घेऊन त्यांच्या पाल्यांसाठी वसतिगृहांची उभारणी करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या. त्याचप्रमाणे राज्यातील स्थलांतरित ऊस तोडणी कामगार, मुकादम आणि वाहतूक कामगारांची नोंदणी करून त्यांना ओळखपत्र देण्याचा निर्णय या वेळी घेण्यात आला.

सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांच्या मागणीप्रमाणे ऊसतोडणी कामगारांच्या प्रश्नांसाठी तसेच कै. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ तातडीने कार्यान्वित करण्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील,

महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री राजेश टोपे, कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक, ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, कृषिमंत्री दादाजी भुसे, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे, राष्ट्रीय साखर संघाचे अध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर उपस्थित होते.

## वसतिगृहासाठी धनादेश प्रदान

राज्यातील दुर्बल, वंचित, उपेक्षित बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्याला आजवर लाभलेल्या प्रत्येक नेतृत्वाने प्रयत्न केले आहेत. ही परंपरा महाराष्ट्रात यापुढेही अबाधित राहील, जपली जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

सह्याद्री अतिथिगृह येथे कुणबी समाजोन्नती संघ, मुंबई यांच्या मुलुंड येथील कुणबी विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीसाठी ५ कोटी रुपयांच्या धनादेश वाटपाचा कार्यक्रम उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी बाबाजी जाधव, कुणबी समाजोन्नती संघाचे अध्यक्ष भूषण बरे, संदीप रायपुरे, संघाचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

## दुहेरी मालमत्ता करातून सुटका

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांना दुहेरी मालमत्ता कराच्या जाचातून सोडवण्यासाठी सिडको प्राधिकरणाकडून पुरवल्या जाणाऱ्या नागरी सेवा पुढील दोन महिन्यात पनवेल महानगरपालिकेला हस्तांतरित करण्याचे निर्देश नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. त्यानंतर फक्त महापालिकेला कर आकारणीचे अधिकार मिळणार असल्याने दुहेरी कराचा मुद्दा कायमस्वरूपी निकाली निघेल, असेही श्री. शिंदे यांनी स्पष्ट केले. सध्या आकारण्यात आलेल्या दुहेरी मालमत्ता कराचा प्रश्न सकारात्मकरीत्या सोडवण्याची तयारीही त्यांनी या वेळी दर्शवली.

सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित बैठकीला रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु. आदिती तटकरे, आमदार बळीराम पाटील, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी आणि महेश पाठक, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, बबन पाटील आणि पनवेलमधील रहिवासी उपस्थित होते.



**एकनाथ शिंदे**
नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री

## घरपोच सातबारा मोहीम

महसूल विभागाने नागरिकांना संगणकीकृत सातबारा नव्या स्वरूपात उपलब्ध करून दिला, आता २ ऑक्टोबर अर्थात गांधी जयंतीपासून या सुधारित सातबारा उताऱ्याची पहिली प्रत थेट खातेदाराच्या हातात देण्याचा क्रांतिकारी निर्णय घेण्यात येत असल्याची घोषणा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली.



**बाळासाहेब थोरात**
महसूल मंत्री

राज्याच्या महसूल विभागाने ई-पीक पाहणी, संगणकीकृत सातबारा, ऑनलाईन फेरफार, जलदगतीने जमिनींची मोजणी, सामूहिक गावठाण मोजणी असे अनेक अभिनव उपक्रम हाती घेतले आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून महसूल विभागाने सातबारा उताऱ्यात नावीन्यपूर्ण बदल केले आहेत. तो सातबारा उतारा ऑनलाईनही उपलब्ध करून देण्यात आला. हा नव्या स्वरूपातील सातबारा उतारा शेतकऱ्यांना समजण्यास सोपा आणि बिनचूकही आहे. खातेदारांना सातबारा उताऱ्याचे हे आधुनिक स्वरूप माहीत व्हावे, यासाठी हा सातबारा उतारा थेट खातेदारांना घरपोच दिला जाणार आहे. खातेउताराचीही पहिली प्रत घरपोच आणि मोफत दिली जाणार आहे. महसूल विभागातील कोतवाल, तलाठी त्यासाठी विशेष मोहीम गांधी जयंती अर्थात २ ऑक्टोबरपासून सुरू करणार आहेत. खातेदारांना थेट मोफत आणि घरपोच उतारा देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य ठरले आहे.

## राज्यात महा गुंतवणूक

राज्याच्या उद्योग क्षेत्रात दिवसेंदिवस गुंतवणुकीचा ओघ वाढत असून नामांकित जेएसडब्ल्यू कंपनीने राज्य



**सुभाष देसाई**
उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री

शासनासोबत सुमारे ३५,५०० कोटी रुपयांच्या गुंतवणूक करारावर स्वाक्षऱ्या केल्या. नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यात सुमारे दीड हजार मेगा वॅट क्षमतेचा हायड्रो पॉवर प्रकल्प सुरू केला जाणार आहे. भिवली धरणावर हा प्रकल्प असेल. यासाठी सुमारे साडेपाच हजार कोटींची गुंतवणूक केली जाणार आहे. यातून पाच हजार जणांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या रोजगार मिळणार आहे.

कोल्हापूर, सोलापूर, उस्मानाबाद, सातारा जिल्ह्यात ५ हजार मेगा वॅट क्षमतेचा पवन उर्जा प्रकल्प सुरू करणार आहे. १८७९ हेक्टर जागेवर हा प्रकल्प असेल. यामध्ये सुमारे ३० हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे.

या करारांनुसार जेएसडब्ल्यू कंपनी हायड्रो व पवन उर्जा क्षेत्रात काम करणार आहे. उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या मंत्रालयातील दालनात सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या वेळी उद्योग विभागाचे अपर मुख्य सचिव बलदेव सिंह, विकास आयुक्त हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. अन्बलगन तसेच जेएसडब्ल्यू कंपनीचे सहसंचालक प्रशांत जैन, बिझनेस हेड अभय याज्ञिक, प्रवीण पुरी आदी उपस्थित होते.

## रत्नागिरीत रुग्णालयासाठी जागा

रत्नागिरी जिल्ह्याच्या राजापूर तालुक्यातील मौजे वाटूळ येथे सुपर मल्टिस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीची ५ एकर जागा महसूल आणि वनविभागास हस्तांतरित करण्यात आली आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी दिली.

राजापूर तालुक्यातील मौजे वाटूळ येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून सुपर मल्टिस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यात येणार आहे. त्यासाठी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ ला लागून असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. सार्वजनिक बांधकाम विभागासह आरोग्य, महसूल आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार या रुग्णालयासाठी गट नं. ८६६ मधील ५ एकर जागा आरोग्य विभागास हस्तांतरित करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार ही जागा महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे रत्नागिरी जिल्ह्याच्या राजापूर तालुक्यातील मौजे वाटूळ येथे



**अशोक चव्हाण**
सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

सुपर मल्टिस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. उपचाराच्या आधुनिक सेवासुविधा उपलब्ध असलेले हे रूग्णालय रत्नागिरी जिल्ह्याच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकटी देणार आहे. शिवाय हे रुग्णालय मुंबई-गोवा या वर्दळीच्या राष्ट्रीय महामार्गालगत असल्याने अपघातग्रस्तांनाही वेळीच उपचार उपलब्ध करून देणे शक्य होऊ शकेल.

## धान खरेदीचे व्यवस्थापन

धान खरेदी केंद्राची संख्या या हंगामात वाढवून धानखरेदी वेळेवर करा. धान खरेदी व धानभरडाई प्रक्रियेबाबत अंदाजित वेळापत्रक तयार करून वेळापत्रकाप्रमाणेच प्रक्रिया पार पडेल अशी खबरदारी सर्व यंत्रणांनी घ्यावी, असे निर्देश अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिले.

पणन हंगाम २०२०-२१ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान व भरड धान्य खरेदी पूर्व नियोजनाची बैठक मंत्रालयातील परिषद सभागृहात घेतली. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या बैठकीला अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणचे सचिव विजय वाघमारे, महाराष्ट्र राज्य सहकारी व पणन महासंघ लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक सुधाकर तेलंग, सर्व विभागांचे पुरवठा उपायुक्त तसेच दूरदृश्यप्रणालीद्वारे जिल्हा पुरवठा अधिकारी उपस्थित होते.

## रास्त भाव धान्य दुकाने सुरू

राज्यातील कोरोना या आजारामुळे निर्माण झालेली परिस्थिती तसेच जुलै व ऑगस्टमध्ये राज्यात झालेली अतिवृष्टी लक्षात घेता आता शहरी भागातही नवीन रास्त भाव धान्य दुकाने सुरू करण्यात येणार आहेत. हा निर्णय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नाने घेण्यात आला आहे.



**छगन भुजबळ**
अन्न, नागरी पुरवठा व
ग्राहक संरक्षण मंत्री

राज्य शासनाकडून स्वस्त धान्य दुकानदारांच्या उत्पन्नात वाढ करण्याकरिता रास्त भाव दुकानांची पुनर्रचना करण्याबाबतची कार्यवाही यापूर्वी करण्यात आली होती; मात्र या कार्यवाहीला लागणारा कालावधी लक्षात घेता सन २०१८ मध्ये शहरी भागात नवीन दुकाने वितरणाच्या जाहीरनाम्यास स्थगिती देण्यात आली होती ही स्थगिती आता उठवण्यात आली आहे त्यामुळे शहरी भागातही आता स्वस्त भाव धान्य दुकाने सुरू होणार आहेत.

## सर्वतोपरी सहकार्य

मुंबईतील दि चिल्ड्रन्स एड सोसायटीच्या कार्यकारी समितीची बैठक गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील आणि महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालय येथे झाली. या बैठकीस महिला व बालविकास आयुक्त राहुल मोरे, कार्यकारी समिती सदस्य मिलिंद तुळसकर, महिला व बालविकास अधिकारी शोभा

शेलार, मुख्य कार्यकारी अधिकारी विजय क्षीरसागर उपस्थित होते.

बालकामगार, अनाथ, आपद्ग्रस्त आणि वंचित मुलांसाठी कार्यरत 'दि चिल्ड्रन्स एड सोसायटी' मुंबईला गृह विभागामार्फत सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे गृहमंत्री श्री. वळसे-पाटील यांनी सांगितले.

बाल न्याय अधिनियम २०१५ अंतर्गत बालगृहाच्या नूतनीकरणाच्या प्रारूप आराखड्यास बैठकीत तत्त्वतः मान्यता देण्यात आली. तसेच प्रारूप आराखडा



**दिलीप वळसे-पाटील**
गृहमंत्री

अंतिम मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. संस्थेच्या जागावरील अतिक्रमणाबाबत उच्च न्यायालयात दाखल विविध याचिकांवर कामकाज करण्यासाठी संस्थेच्या वतीने विशेष वकील नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. संस्थेचा मागील वर्षाचा जमाखर्च अहवाल सादर करण्याचे निर्देशही श्री. वळसे-पाटील यांनी या वेळी दिले.

## पारितोषिक वितरण

शांघाय येथे पुढील वर्षी होणाऱ्या जागतिक कौशल्य स्पर्धेच्या पूर्वतयारीसाठी राज्यात आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य स्पर्धेचा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मंत्री नवाब मलिक यांच्या उपस्थितीत समारोप झाला. या स्पर्धेत राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील २६३ युवक-युवतींनी सहभाग घेतला होता. त्यातील १३२ युवक-युवतींना सुवर्ण, रजत आणि कांस्य पदकाद्वारे मंत्री नवाब मलिक यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सुवर्णपदक विजेत्यासाठी दहा हजार रुपये, रजत पदक विजेत्यासाठी सात हजार रुपये तर कांस्य पदक विजेत्यासाठी पाच हजार रुपये पुरस्काराची रक्कमही देण्यात आली. आता गांधीनगर येथे होणाऱ्या झोनल स्पर्धेत आणि त्यानंतर बेंगलोर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत



**नवाब मलिक**
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता,
अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री

सहभागी होण्याची संधी या युवक-युवतींना मिळणार आहे. राष्ट्रीय स्पर्धेतील विजेते स्पर्धक पुढील वर्षी शांघाय (चीन) येथे होणाऱ्या जागतिक कौशल्य स्पर्धेत सहभाग घेऊ शकतील.

## सामंजस्य करार

राज्यातील तीन लाख युवक-युवतींना पुढील तीन वर्षाच्या कालावधीत बँकिंग, फायनान्स सर्व्हिसेस, इन्शुरन्स या विषयातील प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मंत्री नवाब मलिक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी आणि केंद्र शासनाच्या द इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाऊंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. जीएसटी, आयकर आदींविषयक सेवा पुरवठ्याची गरज वाढलेली असताना राज्यातील युवक-युवतींना मिळणारे हे प्रशिक्षण लाभदायक ठरेल. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल, असे कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक यांनी या वेळी सांगितले.

## अन्न सुरक्षा सप्ताह

अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत राबवण्यात येत असलेल्या योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचावी, यासाठी जनजागृतीचे उपक्रम राबवून 'अन्न सुरक्षा सप्ताह' राबवण्याचे विभागाने नियोजन करावे, असे निर्देश अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी दिले.

मंत्रालयातील दालनात अन्न व औषध प्रशासन विभागातर्फे राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या जनजागृतीबाबतच्या



**डॉ. राजेंद्र शिंगणे**
अन्न व औषध प्रशासन मंत्री

नियोजनासंदर्भात अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले. या वेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव सौरभ विजय, अन्न व औषध प्रशासनचे आयुक्त परिमल सिंह, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (माहिती/प्रशासन) गणेश रामदासी यांसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## माथाडी सल्लागार समितीची बैठक

महाराष्ट्र राज्य माथाडी सल्लागार समितीची ८३ वी बैठक मंत्रालयात कामगारमंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीस सल्लागार समितीचे सदस्य आमदार भरतशेट गोगावले, शशिकांत शिंदे, श्रीनिवास वनगा आणि माजी आमदार नरेंद्र पाटील, महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव, कामगार आयुक्त सुरेश जाधव यांच्यासह विविध आस्थापनांच्या



**हसन मुश्रीफ**
ग्रामविकास, कामगार मंत्री

मालकांचे आणि कामगारांचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य तसेच विविध माथाडी मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

असंघटित कामगार असलेल्या विविध माथाडी मंडळांमध्ये रिक्त पदे मोठ्या प्रमाणात असून ही पदे भरण्यासाठी आवश्यक आकृतिबंध, सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आले आहेत. याबाबतची भरतीप्रक्रिया सुरू करण्याची कार्यवाही करतानाच या भरतीमध्ये माथाडी कामगारांच्या मुलांना प्राधान्य देण्याचे निर्देश कामगारमंत्री हसन मुश्रीफ यांनी या वेळी दिले.

## अमृतमहोत्सवानिमित्त विविध सवलती

अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांसाठी सर्वसाधारण कार्यपद्धती निश्चित करण्याला ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी मंजुरी दिली. राज्यात अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प राबवू इच्छिणाऱ्या कंपन्यांना ऑनलाईन वेब पोर्टलच्या माध्यमातून अर्ज करण्याची आणि त्या अर्जावर कालबद्ध प्रक्रिया करण्याची यंत्रणा तत्काळ उभारण्याचे निर्देशही डॉ. राऊत यांनी दिले आहेत.

अपारंपरिक ऊर्जा धोरणाच्या



**डॉ. नितीन राऊत**
ऊर्जा मंत्री

अंमलबजावणीसाठी महाऊर्जा (मेडा) ला नोडल एजंसी नियुक्त करण्यात आले आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त राज्यात अपारंपरिक ऊर्जेच्या प्रसारावर भर देण्याचे राज्य शासनाने ठरवले आहे. या धोरणाची वेगवान अंमलबजावणी व्हावी आणि या क्षेत्रात गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या कंपन्यांना जमीन व आवश्यक इतर मान्यता लवकरात लवकर मिळाव्यात, यासाठी एक कार्यपद्धती तयार करण्यात आली आहे. या कार्यपद्धतीला ऊर्जामंत्री डॉ. राऊत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुकाणू समितीच्या बैठकीत मान्यता दिली.

या संदर्भात वीज कंपनीच्या एचएसबीसी बिल्डिंग मुंबई येथील कार्यालयात डॉ. राऊत यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, महानिर्मिती कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजय खंदारे, महाऊर्जाचे महासंचालक सुभाष डुंबरे, महावितरणचे संचालक (प्रकल्प) भालचंद्र खंडाईत, संचालक (वाणिज्य) सतीश चव्हाण, मराविमं सुत्रधारी कंपनीचे सल्लागार उत्तम झाल्टे आदी अधिकारी या वेळी उपस्थित होते.

## शालेय अभ्यासक्रमात कृषी विषय

कृषी या विषयाचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद यांनी संयुक्तपणे अभ्यासक्रम तयार करावा, असा निर्णय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड आणि कृषिमंत्री दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

कृषी विषयाचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्याच्या विषयावर शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांच्या मंत्रालयातील दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. कृषिमंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम यांच्यासह शालेय शिक्षण विभागाच्या अपर मुख्य सचिव वंदना कृष्णा, कृषी विभागाचे सचिव एकनाथ डवले यांच्यासह समग्र शिक्षणचे राज्य प्रकल्प संचालक राहुल द्विवेदी, कृषी परिषदेचे



**प्रा. वर्षा गायकवाड**
शालेय शिक्षण मंत्री

महासंचालक विश्वजित माने आदी वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

शालेय अभ्यासक्रमात कृषी विषयाचा समावेश करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद यांनी संयुक्तपणे अभ्यासक्रम तयार करावा, त्यावर सातत्याने विचारविनिमय करून सर्वंकष घटकांचा त्यात समावेश करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

## विक्रमी अधिमूल्य महसूल जमा

राज्य शासनाच्या २० ऑगस्ट २०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये अत्यल्प, अल्प व मध्यम उत्पन्न गटातील संस्थांकरिता अधिमूल्य आकारणीमध्ये अनुक्रमे ५०% व



**डॉ. जितेंद्र आव्हाड**
गृहनिर्माण मंत्री

२५% ची घट व विकास उपकर (७%) मध्ये पूर्णतः सुट १९ ऑगस्ट २०२१ पर्यंत लागू केली होती. तसेच १४ जानेवारी २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत प्रत्यक्ष जमा करण्यात येणाऱ्या अधिमूल्य रकमेवर ५०% एवढी सूट लागू केलेली आहे. या दोन्ही शासन निर्णयामुळे संस्थांना मंडळाकडे भरणा

करावयाच्या अधिमूल्यामध्ये निव्वळ ७५% इतकी सूट व विकास उपकरात पूर्ण सूट मिळत आहे. त्या अनुषंगाने या संस्थांकडून मुंबई मंडळाकडे विक्रमी महसूल जमा असून गृहनिर्माण विभागाने गेल्या दीड वर्षात घेतलेल्या निर्णयांचे हे फलित आहे, अशी माहिती गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी दिली.

पुढील २-३ वर्षांमध्ये साधारणतः २५ हजार घरे उपलब्ध होणार असल्यामुळे बांधकाम उद्योगातील विविध घटकांना रोजगार उपलब्ध होईल. इमारतींमधील मूळ सभासदांना १०० ते १५० फूट अधिकच्या चटई क्षेत्रफळाची घरे प्राप्त होत असल्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावेल.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या सद्यःस्थितीबद्दलही गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी या वेळी माहिती दिली. सन २०१९-२० या वर्षात ८ हजार ६०२ सदनिका, सन २०२०-२१ मध्ये १३ हजार ८७५ सदनिका, तर एप्रिल २०२१ नंतर आजपर्यंत ५ हजार ६८५ सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे व ९२ हजार लोकांना याचा फायदा झालेला आहे.

## खेळाडूंचे अभिनंदन

किरगिझस्तान येथे आयोजित गामा आशिया चॅम्पियनशिप मिक्स मार्शल आर्ट स्पर्धेत भारताने तिसरा क्रमांक पटकावल्याबद्दल मंत्रालयात खेळाडूंसाठी अभिनंदन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

जिंकण्याची जिद्द निर्माण करण्यासाठी तसेच प्रगतीच्या मार्गावर चालण्याकरिता क्रीडा संस्कृती महत्त्वाची असून ती सर्वांना जोपासावी, असे खेळाडूंचे कौतुक करताना क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार यांनी सांगितले.

किरगिझस्तान येथे २८ व २९ ऑगस्ट २०२१ रोजी आयोजित गामा आशिया चॅम्पियनशिप मिक्स मार्शल आर्ट स्पर्धेत भारताने अभिमानस्पद कामगिरी करून या स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकवला असून एकूण २२ पदके जिंकले आहेत. त्यामध्ये ४ सुवर्ण, ७ सिल्व्हर, ११ब्राँझ पदकांचा समावेश आहे.



**सुनील केदार**
पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री

## बाधित जिल्ह्यांचा आढावा

राज्यातील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या जिल्ह्यांचा आढावा आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे घेतला. या वेळी मदत व पुनर्वसनचे प्रधान सचिव असीम गुप्ता यांच्याबरोबरच राज्यातील सर्व जिल्ह्यांचे विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी या वेळी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.



**विजय वडेट्टीवार**
आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री

राज्यात जुलै व ऑगस्ट महिन्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली आहे शेती पिकांसोबतच इतर बाबींचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे, हे लक्षात घेता स्थानिक प्रशासनाने काटेकोरपणे पंचनामे करावेत, कोणताही नुकसानग्रस्त मदतीपासून वंचित राहू नये याची खबरदारी प्रशासनाने घ्यावी, अशा सूचना आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी केल्या.

## योजना युद्धपातळीवर राबवणार

राज्यातील भटके विमुक्तांच्या प्रश्नांबाबत मंत्रालयात केंद्रीय भटक्या विमुक्त कल्याणकारी बोर्डाचे अध्यक्ष दादा इदाते यांच्या अध्यक्षतेखाली आणि बहुजन कल्याण विभाग, खार जमीन विकास आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांच्या उपस्थित बैठक झाली. या बैठकीला सचिव इंद्रा मालो, भटक्या विमुक्त कल्याणकारी बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सी.एस.वर्मा, डॉ. मनीष गवई, राजेंद्र भोसले यांसह इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील भटक्या विमुक्त समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी महत्त्वूपर्ण योजना प्राधान्याने राबवाव्यात, या समाजाचे सामाजिक आर्थिक सर्वेक्षण तातडीने करावे, या समाजाच्या विकासासाठी जिल्हास्तरीय समितीची स्थापना करावी, अशा सूचना केंद्रीय भटक्या विमुक्त कल्याणकारी बोर्डाचे अध्यक्ष भिकु (दादा) इदाते यांनी केल्या. भटक्या विमुक्तांच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेत असल्याची माहिती या वेळी मंत्री श्री. वडेट्टीवार यांनी दिली.

## वरळी किल्ला व परिसराचा विकास

वरळी किल्ला व परिसर विकास पुरातत्व संचालनालय आणि बृहन्मुंबई महानगरपालिका संयुक्तरीत्या करणार असल्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांनी सांगितले.

वरळी किल्ला संवर्धन व परिसर विकासासंदर्भातील बैठक सह्याद्री



**अमित देशमुख**
वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री

अतिथिगृह येथे सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे, पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री संजय बनसोडे, सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचिव विलास थोरात, पुरातत्त्व संचालनालयाचे संचालक तेजस गर्गे यांच्यासह बृहन्मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त हर्षद काळे, सहायक आयुक्त शरद उघडे उपस्थित होते.

वरळी किल्ला व परिसर विकासासाठी पुढील १० वर्षे बृहन्मुंबई महानगरपालिका सांस्कृतिक कार्य विभागासोबत काम करणार आहे. वरळी किल्ल्याला ऐतिहासिक महत्त्व असून हा किल्ला महाराष्ट्र शासनाने राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केला आहे, असे सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. देशमुख यांनी सांगितले.

## विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

राज्यातील विद्यार्थ्यांना विविध विभागाच्यावतीने शिष्यवृत्ती, शैक्षणिक शुल्क देण्यात येते परंतु विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यात तांत्रिक अडचणी येतात. त्या तातडीने दूर करून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरित करण्यात यावी, असे आदेश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिले.



**उदय सामंत**
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

मंत्रालयात विद्यार्थ्यांच्या प्रलंबित शिष्यवृत्तीसंदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव आभा शुक्ला, उच्च शिक्षण विभागाचे संचालक धनराज माने, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. अभय वाघ, माहिती तंत्रज्ञान विभागाचे व्यवस्थापकीय संचालक प्रसाद कोलथे, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## संशोधकांशी संवाद

कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी आयआयटी, मुंबई येथे भेट दिली. त्यांनी आयआयटीच्या रुरल टेक्नॉलॉजी ॲक्शन ग्रुप, सितारा ग्रुपच्या प्राध्यापक, संशोधक



**दादाजी भुसे**
कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री

यांच्याशी संवाद साधला. या ग्रुपच्या साहाय्याने शेती तंत्रज्ञानावर केल्या जात असलेल्या संशोधनाची माहिती घेतली, प्रकल्पांना भेट दिली. या वेळी कृषी विभागाचे सचिव एकनाथ डवले, कृषी आयुक्त धीरज कुमार, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) संचालक इंद्रा मालो, आयआयटीचे संचालक डॉ. सुभाषिश चौधरी, प्रा. आनंद राव आदी उपस्थित होते. अल्पभूधारक शेतकऱ्यांना उपयुक्त ठरतील, असे तंत्रज्ञान आणि यंत्रसामग्री विकसित करण्यावर आयआयटीच्या संशोधकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन कृषिमंत्री श्री. भुसे यांनी यावेळी केले.

## रब्बी हंगामाबाबत आढावा

रब्बी हंगाम २०२१ राज्यस्तरीय नियोजन व आढावा बैठक कृषी आयुक्तालय, पुणे येथे घेण्यात आली. या वेळी फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे, कृषी राज्यमंत्री विश्वजीत कदम, कृषी आयुक्त धीरज कुमार, सचिव एकनाथ डवले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी ज्ञानदेव बोटे, कृषी विभागाचे संचालक व मंत्रालयीन अधिकारी, सहसंचालक व कृषी विद्यापीठांचे संशोधन संचालक, ठाणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर, नागपूर व अमरावती जिल्ह्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, आत्माचे प्रकल्प संचालक व कृषी आयुक्तालयातील अधिकारी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या अर्थकारणामध्ये रब्बी पिकांचे महत्त्व आहे. त्या अनुषंगाने चालू वर्षासाठी ६० लाख हेक्टर क्षेत्रावर रब्बी हंगामाचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी लागणारी बियाणे व खते मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती या वेळी कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी दिली.

## भूजल माहिती केंद्र

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून उभारण्यात येत असलेल्या भूजल माहिती व तंत्रज्ञान केंद्राचे भूमिपूजन पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा निर्मलाताई पानसरे दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते, तर भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, सार्वजनिक



**गुलाबराव पाटील**
पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री

बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता अतुल चव्हाण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता सुभाष भुजबळ यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## जलजीवन मिशनचा आढावा

राज्यातील जलजीवन मिशन अंमलबजावणीचा आढावा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना व घरगुती नळ जोडणीची कामे कालमर्यादेत पूर्ण करावी. जलजीवन मिशन अंतर्गत सुधारणात्मक पुनर्जोडणीची कामे मार्च २०२२ अखेरपर्यंत तसेच नवीन योजनांची कार्यवाही ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत पूर्ण करण्याच्या दृष्टीने कालबद्ध कार्यक्रम आखावा. या वर्षीचे निर्धारित उद्दिष्ट वेळेत पूर्ण करावे. सर्व मुख्य अभियंत्यांनी जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या दोन्ही यंत्रणांच्या नियमित बैठका घेऊन कामांची प्रगती राखावी, असे निर्देशही मंत्री श्री. पाटील यांनी दिले.

## अनुदान तातडीने द्यावे

भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड आणि 'मागेल त्याला शेततळे' या योजनेंतर्गत प्रलंबित असलेले अनुदान शेतकऱ्यांना तातडीने वितरित करण्यासंदर्भात कारवाई करण्याच्या सूचना फलोत्पादन विभागाच्या आढावा बैठकीत फलोत्पादन मंत्री संदीपानराव भुमरे यांनी दिल्या. या वेळी फलोत्पादन विभागाचे सचिव एकनाथ डवले, कृषी आयुक्त धिरज कुमार, फलोत्पादन संचालक डॉ.के.पी. मोते, कृषी व फलोत्पादन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



**संदीपानराव भुमरे**
फलोत्पादन मंत्री

स्ट्रॉबेरी फळाच्या उत्पादनाचा महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत समावेश करता येतो का, याबाबत अहवाल सादर करावा. फळबाग लागवडीसाठी शेतकऱ्यांना कलम रोपांची उपलब्धता करून देण्यासाठी असलेल्या संपूर्ण १४३ शासकीय रोपवाटिका पूर्ण क्षमतेने सुरू राहण्यासंदर्भात कारवाई करावी. रोपवाटिकांवर नवीन व सुधारित वाणांच्या विविध फळाझाडांच्या मातृवृक्षांची लागवड करावी. रायगड जिल्ह्यातील सुपारीस विशेष बाब म्हणून व मातृवृक्ष म्हणून मान्यता देण्यासंदर्भात सकारात्मक कारवाई करावी, अशा सूचना मंत्री श्री.भुमरे यांनी दिल्या. फळबाग, ठिबक सिंचन, शेततळे, राष्ट्रकृषी विकास योजना अशा विविध बाबींच्या कामाचा आढावा या वेळी त्यांनी घेतला.

## 'मिशन वात्सल्य'

कोविड काळामध्ये ग्रामीण भागातील तसेच उपेक्षित वंचित घटकातील अनेक महिलांना अकाली वैधव्य आले. त्यामुळे त्यांच्या जगण्याचाच प्रश्न निर्माण झाला



**ॲड. यशोमती ठाकूर**
महिला व बालविकास मंत्री

अशा काळात या महिलांचा जीवनस्तर उंचावण्यासाठी 'मिशन वात्सल्य' मोहिमेच्या अंतर्गत मदत केली जात असल्याची माहिती महिला आणि बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी दिली आहे.

राज्यात गेल्या दीड वर्षात ग्रामीण भागामध्ये कोविडमुळे कर्ता पुरुष गमावल्याने अनेक महिलांना वैधव्याला सामोरे जावे लागले आहे.

कोविड- १९ मुळे मार्च २०२० नंतर विधवा झालेल्या महिलांची संख्या १५ हजाराहून अधिक आहे. त्यापैकी जिल्हा कृती दलाकडे यादी तयार असलेल्या महिलांची संख्या १४ हजार ६६१ आहे. अशा महिलांना मदत करण्यासाठी तसेच त्यांना लागणारी प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी १८ विविध सेवा देण्याचा प्रयत्न महिला आणि बालविकास विभागामार्फत सुरू आहे. यामध्ये संजय गांधी निराधार योजनेपासून अनेक योजनांचा समावेश आहे.

मुख्य म्हणजे ग्रामीण भागातील या महिलांसाठी घरकूल योजनेतही कशा पद्धतीने लाभ देता येईल, याबाबत या 'वात्सल्य मिशन' अंतर्गत काम सुरू असल्याचेही ॲड. ठाकूर यांनी सांगितले.

## विकासकामांचा आढावा

मृद् व जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांनी मंत्रालयात महाड विधानसभा मतदारसंघातील कामांच्या आढावा घेतला.



**शंकरराव गडाख**
मृद् व जलसंधारण मंत्री

या वेळी आमदार महेंद्र थोरवे, मृद् व जलसंधारण विभागाचे अपर मुख्य सचिव नंदकुमार यांच्यासह मृद् व जलसंधारण विभागाचे वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

महाड तालुक्यात एकूण १ लघु पाटबंधारे योजना व अकरा सिमेंट कॉंक्रिट बंधारे कार्यान्वित आहेत. या योजना महामंडळांतर्गत असून पैकी एक लघु

पाटबंधारे पूर्ण झालेले आहेत व ११ योजनांची कामे प्रगतिपथावर आहेत. या योजनांमुळे स्थानिक शेतीसाठी व उन्हाळ्यात लोकांकरिता पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे. महाड तालुक्यातील ११ सिमेंट काँक्रिट बंधाऱ्याचे काम प्रगतिपथावर असून पूर्ण झाल्यानंतर ४८५ द.ल.घ.मी. पाणीसाठा होणार आहे व ६५ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे, तसेच जिते बंधाऱ्याचे काम पूर्ण झाले असून हा बंधारा ग्रामपंचायतीस हस्तांतरित करण्यात आलेला आहे, असे त्यांनी या वेळी सांगितले. महाड विधानसभा मतदारसंघातील प्रगतिपथावरील जलसंधारण विभागांतर्गत येणाऱ्या प्रकल्पांची कामे कालमर्यादेत पूर्ण करा, अशा सूचना मृद् व जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांनी दिल्या.

## बार्टीला निधी वितरित

बार्टीमार्फत राबवण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा आदींसाठी ९० कोटी रुपये तसेच महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक देखभाल समितीसाठी दीड कोटी असे एकूण ९१.५० कोटी रुपये स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे वितरित करण्यात आले आहेत.



**धनंजय मुंडे**
सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) ला ९१.५० कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला असून, बार्टीमार्फत राबवण्यात येणाऱ्या कोणत्याही योजनेला निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले आहे.

## सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा शुभारंभ

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री आदित्य ठाकरे यांच्या हस्ते आणि पर्यावरण राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला.

सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या या कार्यक्रमास पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष आबासाहेब जऱ्हाड, सदस्य सचिव अशोक शिनगारे, साहाय्यक सचिव (तांत्रिक) पुंडलिक मिराशे आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ट्विटर हॅन्डल आणि इन्स्टाग्राम हे @mpcb_official तर फेसबूक MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD या नावाने कार्यरत झाले आहे.

## अभ्यासक्रमास सहमती

देशात आणि जगात जे सर्वोत्तम असेल त्या पद्धतीचे शिक्षण मुंबईतील विद्यार्थ्यांना मोफत उपलब्ध करून देण्याचा मुंबई महानगरपालिकेचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन पर्यावरण मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे यांनी केले. भविष्यात राज्य शासनामार्फत राज्यातील विद्यार्थ्यांना असे शिक्षण मिळावे, यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



**आदित्य ठाकरे**
पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री

मुंबई महानगरपालिकेच्या पब्लिक स्कुलमध्ये आंतरराष्ट्रीय बोर्डाचा शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी केंब्रिज विद्यापीठाचे सहकार्य मिळण्यासंदर्भात सह्याद्री अतिथिगृह येथे सहमतीचा करार झाला.

या वेळी मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, महापालिकेच्या शिक्षण समिती सभापती संध्या दोशी, अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी, सह आयुक्त अजित कुंभार, केम्ब्रिज दक्षिण आशियाचे विभागीय संचालक महेश श्रीवास्तव, शिक्षणतज्ज्ञ फ्रान्सिस जोसेफ, केम्ब्रिज विद्यापीठ प्रेस हेड अजय प्रताप सिंग, महानगरपालिकेचे शिक्षण अधिकारी राजू तडवी आदी या वेळी उपस्थित होते. या वेळी महानगरपालिका आणि केंब्रिज विद्यापीठामध्ये सहमतीच्या करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

## तज्ज्ञांच्या अभ्यासगटाची स्थापना

राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये आणखी चांगल्या पद्धतीचे शिक्षण मिळावे याकरिता महसूल व ग्रामविकास राज्यमंत्री



**अब्दुल सत्तार**
महसूल व ग्रामविकास राज्यमंत्री

अब्दुल सत्तार प्रयत्न करत आहेत. याचाच एक भाग म्हणून दिल्ली निगमच्या शाळांच्या धर्तीवर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे, यासंदर्भात त्यांनी ग्रामविकास विभागाला प्रस्ताव पाठवला होता. त्यानंतर ग्रामविकास विभागाने यासाठी सात तज्ज्ञांच्या अभ्यासगटांची स्थापना केली असून दिल्लीच्या शैक्षणिक कार्यपद्धतीवर ते अभ्यास करणार आहेत. आजच्या स्पर्धात्मक युगात ग्रामीण भागातील

विद्यार्थ्यांनाही प्रगत तंत्रज्ञानासह जगातील सर्व अत्याधुनिक शिक्षण मिळणे गरजेचे आहे. दिल्ली निगमच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी काळानुरूप मोठ्या प्रमाणावर बदल व सुधारणा झाल्या आहेत. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिकविण्याकरिता वापरण्यात येणारे तंत्रज्ञान, विद्यार्थी व शिक्षकांकरिता असणाऱ्या सुविधा, विद्यार्थ्यांचे आचार-विचार व शिस्त, शिक्षकांची शिकवण्याची कार्यपद्धती याचा सखोल अभ्यास तज्ज्ञ मंडळी करणार असून त्याचा अहवाल राज्य सरकारला सादर करतील.

## विशेष मोहिमेद्वारे भरती प्रक्रिया

स्वातंत्र्यसैनिकांच्या पाल्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाच्या परिपत्रकानुसार विशेष मोहीम राबवावी तसेच स्वातंत्र्यसैनिकांच्या प्रलंबित निवृत्तिवेतनाबाबत राजस्थान सरकारच्या धर्तीवर प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश सामान्य प्रशासन विभागाचे राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. यासंदर्भात मंत्रालयात राज्यमंत्री श्री.भरणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.



**दत्तात्रय भरणे**
सामान्य प्रशासन विभाग, राज्यमंत्री

स्वातंत्र्यसैनिक व त्यांचे नामनिर्देशित पाल्य यांना शासकीय सेवेत घेण्याबाबत शासनाच्या ४ मार्च १९९१ च्या परिपत्रकानुसार यापूर्वी ज्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी ही भरतीप्रक्रिया राबवली त्यानुसार नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना वेतनवाढ व पुढील पदोन्नती देण्यात यावी. येत्या दोन महिन्यात सर्व जिल्ह्यांतील स्वातंत्र्यसैनिकांची अद्ययावत माहिती प्राप्त करून घ्यावी, ही माहिती देण्यास विलंब करणाऱ्यांवर कारवाईचे निर्देशही राज्यमंत्री श्री. भरणे यांनी दिले.

या वेळी आमदार प्रकाश आबिटकर, सामान्य प्रशासन विभागाच्या प्रधान सचिव सीमा व्यास, उपसचिव सं.के.गुप्ते, महाराष्ट्र राज्य स्वातंत्र्यसैनिक तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष वसंतराव देशमुख व अन्य सदस्य उपस्थित होते.

## राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तरतूद

कोविड-१९ च्या संभाव्य तिसऱ्या लाटेचा मुकाबला करण्यासाठी राज्य शासन सज्ज असून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत केंद्र आणि राज्य शासनाने १३६७.६६ कोटी रुपयांची भरीव तरतूद केली आहे. कोविड प्रतिबंधासाठी करण्यात आलेल्या या विशेष तरतुदीमुळे अत्यावश्यक गोष्टींसाठी विविध उपाययोजना आखण्यात येणार आहेत, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री राजेंद्र पाटील-यड्रावकर यांनी दिली.

कोविड-१९ च्या संभाव्य लाटेचा प्रतिबंध करण्यासाठी आणि कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत १३६७.६६ कोटी रुपयांची भरीव तरतूद केंद्र व राज्य शासनाने केलेली आहे. यात केंद्राचा हिस्सा ८२०.७७ कोटी रुपये, तर राज्य शासनाचा हिस्सा ५४७.१८ कोटी रुपयांचा समावेश आहे. कुशल-अकुशल मनुष्यबळ, अत्यावश्यक औषधे, यंत्रसामग्री, कोविड चाचणीसाठी आवश्यक किट्स, लहान मुले व नवजात शिशुंसाठी अतिदक्षता कक्षाची स्थापना, ऑक्सिजनची मुबलक उपलब्धता, ऑक्सिजनच्या खाटा सज्ज ठेवण्याबरोबरच टेलिमेडिसीनची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.



**राजेंद्र पाटील-यड्रावकर**
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, राज्यमंत्री

लहान मुले, नवजात शिशूंसाठी राज्यातील जिल्हा रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न असलेल्या २१ रुग्णालयांत ३२ खाटांचे अतिदक्षता कक्ष उभारण्यात येत आहेत. राज्यामध्ये संभाव्य तिसऱ्या लाटेचा विचार करून पहिल्या दोन लाटांमध्ये जे अनुभव आले किंवा ज्याप्रमाणे उपाययोजना केल्या त्यापेक्षा अधिकच्या उपाययोजना राज्य शासन करत आहे.

**टीम लोकराज्य**



**भरारी प्रकाशनातर्फे 'समाजभुषण' या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच मंत्रालयात उद्योग व मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे सचिव तथा महासंचालक डॉ. दिलीप पांढरपट्टे, संचालक गणेश रामदासी, दयानंद कांबळे, उपसंचालक गोविंद अहंकारी, लेखक तथा निवृत्त संचालक देवेंद्र भुजबळ, अलका भुजबळ यांच्यासह प्रकाशक श्रीमती लता गुठे उपस्थित होत्या.**

# मंत्रिमंडळात ठरले

**राज्य मंत्रिमंडळाच्या २६ ऑगस्ट २०२१ आणि १, ८, १५ व २२ सप्टेंबर २०२१ रोजीच्या बैठकीत सामान्य प्रशासन, सार्वजनिक आरोग्य, वित्त, उच्च व तंत्रशिक्षण, विधि व न्याय, उद्योग, पर्यावरण व वातावरणीय बदल, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, सांस्कृतिक कार्य, शालेय शिक्षण, ऊर्जा, गृहनिर्माण, ग्रामविकास, महसूल आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, जलसंपदा, नगरविकास, सहकार, अल्पसंख्याक विकास आदी विभागाचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती..**



## बहुसदस्यीय प्रभाग पद्धती

राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदांमध्ये बहुसदस्यीय प्रभागाची तरतूद पुन्हा लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या संदर्भातील अध्यादेश प्रख्यापित करण्यासाठी राज्यपालांच्या स्वाक्षरीसाठी पाठवण्यात येईल.

## मागास प्रवर्गासाठीचे आरक्षण

नागरी स्थानिक संस्थामध्ये नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठीचे आरक्षण २७ टक्क्यांपर्यंत ठेवण्यास आणि एकूण आरक्षणाचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा अधिक होणार नाही अशी सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. त्याप्रमाणे अध्यादेश प्रख्यापित करण्यासाठी राज्यपालांकडे पाठवण्यात येईल.

## अर्जुना मध्यम पाटबंधारे प्रकल्प



रत्नागिरी जिल्ह्याच्या राजापूर तालुक्यातील मौजे करक येथील अर्जुना मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या १००८ कोटी ९६ लाख रुपये किंमतीच्या पाचव्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. अर्जुना नदीवर उभारण्यात आलेले हे धरण मातीचे असून ते कोकण पाटबंधारे विकास महामंडळ ठाणे अंतर्गत कोकण प्रदेश या प्रदेशांतर्गत आहे. या प्रकल्पामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यामधील १२ गावांतील ४७३३ व लांजा तालुक्यामधील ६ गावांतील १४३८ हेक्टर क्षेत्र असे मिळून १८ गावांतील ६१७१ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. अर्जुना मध्यम प्रकल्प हा प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेंतर्गत समाविष्ट असून नियोजनानुसार प्रकल्पाची कामे मार्च-२०२२ अखेर पूर्ण करावयाची आहेत.

## वार्षिक सर्वसाधारण सभेस मुदतवाढ

राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यास ३१ मार्च २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. या संदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमात सुधारणा करण्यासाठी अध्यादेश प्रख्यापित करण्यासाठी राज्यपालांकडे पाठवण्यात येईल.

## पणन महासंघाच्या कर्जास हमी

महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाद्वारे हंगाम २०२०-२१ मध्ये किमान आधारभूत दराने खरेदी करण्यात आलेल्या कापसाचे चुकारे शेतकऱ्यांना वेळेत अदा करण्यासाठी युको बँकेकडून ६ टक्के व्याजदराने कापूस पणन महासंघाने घेतलेल्या रुपये ६०० कोटी कर्जास शासन हमी देण्याचा निर्णय घेण्यात आला. याबरोबरच ६०० कोटी शासन हमीवर कापूस पणन महासंघास राज्य शासनास अदा करावे लागणारे हमीशुल्क माफ करण्यासदेखील मान्यता देण्यात आली.



## भरतीपूर्व परीक्षा प्रशिक्षण

अल्पसंख्याक उमेदवारांना निवासी पोलीस शिपाई भरतीपूर्व परीक्षा प्रशिक्षण देण्यासाठी योजनेत बदल करून प्रशिक्षणाचा दर्जा सुधारण्याचा निर्णय घेण्यात आला. योजनेच्या निकष व स्वरूपात आणि अटी व शर्तीमध्ये बदल करून तीन महिन्यांच्या कालावधीचे निवासी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्याबाबतची योजना यापुढे राबवण्यात येणार आहे.

## विकास आराखड्यामध्ये फेरबदल

भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका मंजूर सुधारित विकास आराखड्यामधील खेळाच्या मैदानावरील आरक्षणाच्या हद्दीमधील चूक दुरुस्ती करण्याच्या फेरबदल प्रस्तावास मान्यता देण्यात आली. मंजूर फेरबदल प्रस्तावानुसार आरक्षण क्र. ६२ खेळाचे मैदान या आरक्षणामधील विद्यमान अधिकृत इमारतीनी व्याप्त क्षेत्र आरक्षणामधून वगळून रहिवास वापर विभागात अंतर्भूत करण्यात आलेले आहे.

## साखर संग्रहालय उभारणार

महाराष्ट्राचे साखर उद्योगातील स्थान विचारात घेता जागतिक दर्जाचे साखर संग्रहालय पुणे येथे उभारण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. पुणे यथील साखर संकुलातील जागेत साखर संग्रहालय उभारण्यात येईल. साखर संग्रहालयास प्रशासकीय मान्यता देणे, संग्रहालयाचे डिझाईन अंतिम करणे, निधी उपलब्ध



करून देणे, संग्रहालयाच्या बांधकामविषयक कामकाजाचा आढावा घेणे, यासाठी उपमुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय नियामक समिती तसेच सहकार मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली साखर संग्रहालयाच्या प्रत्यक्ष उभारणी कामकाजावर देखरेखीसाठी कार्यकारी समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.

## सुधारणा प्रस्ताव पुनर्विचारासाठी सादर

मागासवर्गीय जागांचे एकत्रित आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही, तसेच नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी जास्तीत जास्त २७ टक्क्यांपर्यंत आरक्षण ठेवण्याबाबत न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून राज्यपालांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने हा प्रस्ताव पुनर्विचारासाठी परत सादर करण्यास मान्यता दिली. ग्रामविकास विभागाने सादर केलेल्या या विषयावरील मंत्रिमंडळ टिपणीतील प्रस्तावाच्या अनुषंगाने चर्चा होऊन मंत्रिमंडळाने निर्णय घेतले.

## अल्पमुदत कर्जास शासनाची थकहमी

गाळप हंगाम २०२१-२२ करिता राज्यातील दोन सहकारी साखर कारखान्यांच्या २८ कोटी रुपये इतक्या अल्पमुदत कर्जास शासन थकहमी देण्याचा निर्णय घेण्यात आला. राजगड सहकारी साखर कारखाना लि.,ता.भोर, जि. पुणे व सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखाना लि. चंद्रभागानगर, ता.पंढरपूर, जि. सोलापूर या दोन सहकारी साखर कारखान्यांना अनुक्रमे रक्कम दहा कोटी रुपये व अठरा कोटी रुपये अशा २८ कोटी रुपये अल्पमुदत कर्जास थकहमी देण्यात येईल. यासाठी काही अटी टाकण्यात आल्या आहेत.

## मागासवर्गीय जागांचे एकत्रित आरक्षण

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी जास्तीत जास्त २७ टक्के आरक्षण ठेवून, ओबींसीसह एकूण मागासवर्गीय जागांपैकी एकत्रित आरक्षण ५० टक्क्यांहून जास्त होणार नाही, अशी सुधारणा करून अध्यादेश काढण्याचा निर्णय घेण्यात आला. या अधिनियमात सुधारणा करण्याचा ग्रामविकास विभागाने प्रस्ताव आणला. या प्रस्तावाच्या अनुषंगाने चर्चा होऊन मंत्रिमंडळाने खालीलप्रमाणे अध्यादेश काढण्याचा निर्णय घेतला आहे.

## आदिवासीबहुल जिल्ह्यातील आरक्षण

अनुसूचित जमातीची लोकसंख्या अधिक असलेल्या ८ जिल्ह्यांमध्ये गट-क व गट-ड संवर्गातील सरळसेवेच्या भरतीसाठी सुधारित आरक्षण निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला. पालघर, नाशिक, धुळे, नंदूरबार, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, रायगड या ८ जिल्ह्यांमधील आरक्षण जिल्हा व प्रवर्गनिहाय पुढीलप्रमाणे - पालघर, नाशिक, धुळे, नंदूरबार या ४ जिल्ह्यांमध्ये अनु.जाती १० टक्के, अनु.जमाती २२ टक्के, विजा-अ ३ टक्के, भज-ब २.५ टक्के, भज-क ३.५ टक्के, भज-ड २ टक्के, विमाप्र २ टक्के, इमाव १५ टक्के, ईडब्ल्यूएस १० टक्के आणि खुला ३० टक्के.



यवतमाळ जिल्ह्यामध्ये अनु.जाती १२ टक्के, अनु.जमाती १४ टक्के, विजा-अ ३ टक्के, भज-ब २.५ टक्के, भज-क ३.५ टक्के, भज-ड २ टक्के, विमाप्र २ टक्के, इमाव १७ टक्के, ईडब्ल्यूएस १० टक्के आणि खुला ३४ टक्के.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये अनु. जाती १३ टक्के, अनु.जमाती १५ टक्के, विजा-अ ३ टक्के, भज-ब २.५ टक्के, भज-क ३.५ टक्के, भज-ड २ टक्के, विमाप्र २ टक्के, इमाव १९ टक्के, ईडब्ल्यूएस १० टक्के आणि खुला ३० टक्के.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये अनु.जाती १२ टक्के, अनु.जमाती २४ टक्के, विजा-अ ३ टक्के, भज-ब २.५ टक्के, भज-क ३.५ टक्के, भज-ड २ टक्के, विमाप्र २ टक्के, इमाव १७ टक्के, ईडब्ल्यूएस १० टक्के आणि खुला २४ टक्के.

रायगड जिल्ह्यामध्ये अनु.जाती १२ टक्के, अनु.जमाती ९ टक्के, विजा-अ ३ टक्के, भज-ब २.५ टक्के, भज-क ३.५ टक्के, भज-ड २ टक्के, विमाप्र २ टक्के, इमाव १९ टक्के, ईडब्ल्यूएस १० टक्के आणि खुला ३७ टक्के.

## मुद्रांक शुल्क माफ

सातारा जिल्ह्यातील गोंदवले बुद्रुक (ता. माण) येथील सातारा मेष पालन व लोकर प्रक्रिया सहकारी संस्थेच्या जमीन खरेदी व्यवहारातील मुद्रांक शुल्क माफ

करण्याचा निर्णय घेण्यात आला. सातारा मेष पालन व लोकर प्रक्रिया सहकारी संस्थेच्या आणि संबंधित मूळ शेतमालक यांच्या दरम्यान होणाऱ्या जमीन हस्तांतरणासाठी व्यवहार होणार आहे. या व्यवहारातील मुद्रांक अधिनियमानुसार द्यावे लागणारे सुमारे ६ लाख ६६ हजार ४७४ रुपयांचे मुद्रांक शुल्क तसेच या व्यवहारासाठी नोंदणी नियमानुसार द्यावे लागणारे शुल्कही माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## कोकणासाठी आपत्ती व्यवस्थापन

कोकणामध्ये कोकण आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रम राबवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. तौक्ते चक्रीवादळामुळे किनारपट्टीवरील जिल्ह्यात झालेले नुकसान विचारात घेऊन 'कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्प' या नावाने कोकणासाठी हा विशेष कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत सुमारे ३ हजार २०० कोटी पैकी २ हजार कोटी रुपये राज्य आपत्ती सौम्यीकरण निधीतून खर्च करण्यास आणि उर्वरित १२०० कोटी रुपये पुढील ४ वर्षात (सन २०२२-२५) राज्याच्या निधीतून उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.

या प्रकल्पात क्षमता बांधणी आणि पूर्वतयारी तसेच सौम्यीकरण निधीचा योग्य व सर्वसमावेशक वापरासाठी ४ वर्षासाठी बृहत आराखडा तयार करण्यात येणार आहे. व त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रकल्प संनियंत्रण गट व सल्लागारांची नियुक्ती करण्यात येईल. त्यासाठी होणारा खर्च क्षमता बांधणी व पूर्वतयारीसाठी उपलब्ध निधीच्या ७ टक्के मर्यादेत व सौम्यीकरणासाठी उपलब्ध निधीच्या ३ टक्के मर्यादेत राज्य योजनेमधून विभागास मंजूर होणाऱ्या तरतुदीतून खर्च करण्यास मान्यताही देण्यात आली.

## सुधारित प्रशासकीय मान्यता

अमरावती जिल्ह्यातील पेढी बॅरेज या उपसा सिंचन योजनेच्या ३६१ कोटी ६१ लाख रुपयांच्या खर्चास प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. हा प्रकल्प विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अंतर्गत टेंभा गावाजवळून वाहणाऱ्या पेढी नदीवर बांधण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे अमरावती तालुक्यातील ७ गावातील २ हजार २३२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या प्रकल्पाचा लाभ कृषी सिंचनासह पिण्यासाठी पाणीपुरवठा व मत्स्यव्यवसाय यासाठी होणार आहे.

## महानिर्मिती : सौर ऊर्जा प्रकल्प

महानिर्मिती कंपनीच्या राज्यातील विविध जागांवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. तसेच महानिर्मितीकडून भागभांडवल उपलब्ध करून देण्यासही मान्यता दिली. १८७ मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पांसाठी तसेच ३९० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी दोन स्वतंत्र प्रस्तांवाना मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

## म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास

मुंबईतील गोरेगाव येथील मोतीलाल नगर येथील म्हाडा वसाहतींचा विशेष बाब म्हणून पुनर्विकास करण्यास मान्यता देण्यात आली. म्हाडाच्या गोरेगाव (प.) येथील मोतीलाल नगर १, २ व ३ येथे सुमारे ५० हेक्टर एवढ्या जागेवर गाळ्यांची अंदाजित संख्या ३७०० व झोपड्यांची संख्या अंदाजे १६०० अशी एकत्रित ५३०० इतकी आहे. मोतीलाल नगर वसलेल्या जागेचे एकूण क्षेत्रफळ लक्षात घेता, गाळ्यांची घनता १०६ गाळे प्रती हेक्टर आहे. ही घनता बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ च्या विनियम ३० (बी) नुसार ४५० गाळे प्रती हेक्टरपेक्षा फारच कमी आहे. त्यामुळे प्रत्यक्षात तेथे पुनर्विकासास मुबलक जागा उपलब्ध आहे. शिवाय, सध्या तेथे अस्तित्वात असलेल्या रहिवाशांना त्यांनी धारण केलेल्या गाळ्यांच्या क्षेत्रफळापेक्षा मुबलक मोकळी जागा वापरण्यास उपलब्ध आहे. उच्च न्यायालयाच्या १७ ऑक्टोबर २०१३ रोजीच्या आदेशानुसार हा प्रकल्प म्हाडा स्वत: पूर्ण करणार आहे. तथापि, म्हाडाला हा प्रकल्प राबवणे सद्य:परिस्थितीत शक्य नसल्याने एजन्सीची नियुक्ती करून अप्रत्यक्षपणे म्हाडाला प्रकल्प राबवावा लागणार आहे. त्याकरिता काही अटींसह म्हाडातर्फे कच्ची पूर्वतयारी म्हणून करण्याकरिता पावले उचलली जाणार आहेत.

## राज्य वातावरणीय बदल परिषद

इंटरगव्हर्नमेंटल पॅनल ऑन क्लायमेट चेंज (आयपीसीसी) या संयुक्त राष्ट्राच्या संस्थेने वातावरणीय बदलाच्या अनुषंगाने सादर केलेल्या अहवालाबाबत पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने सादरीकरण करून महाराष्ट्रामध्ये या वातावरण बदलाचे किती गंभीर परिणाम होतील, याविषयी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत माहिती दिली. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहअध्यक्षतेखाली राज्य वातावरणीय बदल परिषदेची स्थापना करण्याचे देखील ठरले.

## खासगी गुंतवणुकीद्वारे रुग्णालये



सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या (पीपीपी) माध्यमातून राज्यात नवीन वैद्यकीय महाविद्यालये आणि अतिविशेषोपचार रुग्णालये स्थापन करून वैद्यकीय सुविधात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. या धोरणाची अंमलबजावणी पथदर्शी प्रकल्पाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेच्या मदतीने करण्यात येईल.

## अमृतमहोत्सव : विविध समित्या

राज्यात भारतीय स्वातंत्र्याचा

अमृतमहोत्सव आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली. १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत हा अमृतमहोत्सव राज्यात आयोजित करण्यात येईल. यासाठी विविध समित्यादेखील स्थापन करण्यात येत आहेत. या संदर्भात सांस्कृतिक कार्य विभागाने सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

या महोत्सवाची आखणी, नियोजन व प्रभावी अंमलबजावणी याकरिता राज्यस्तरीय समिती, कोअर समिती, अंमलबजावणी समिती, जिल्हास्तर समिती, पंचायत व ग्रामस्तर समिती अशा विविध समित्या स्थापन करण्यात येतील.




सांस्कृतिक कार्य विभाग हा या महोत्सवाचे समन्वयन करेल. या विभागाच्या आधिपत्याखाली एकछत्र योजना तयार करण्यात येऊन विविध विभागांकडून प्रस्ताव प्राप्त करून घेण्यात येतील व त्यास मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील अंमलबजावणी समिती मंजुरी देईल.

## राज्यात ४८८ आदर्श शाळा

शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी राज्यातील ४८८ शासकीय शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

शाळांमधील भौतिक सुविधांचा तसेच शैक्षणिक गुणवत्तेचा विकास करून आदर्श शाळांची निर्मिती केली जाईल. भौतिक सुविधांच्या विकासामध्ये स्वतंत्र शौचालये, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सुस्थितीत असलेले वर्ग, आकर्षक इमारत, क्रिडांगण, क्रीडा साहित्य, आसीटी लॅब, सायन्स लॅब, ग्रंथालय यासारख्या सुविधांचा समावेश राहील, तर शैक्षणिक गुणवत्तेमध्ये



विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी उत्तम शैक्षणिक पोषक वातावरण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. पाठ्यपुस्तकांच्या पलिकडे जाऊन शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवतील, याकडे लक्ष देण्यात येईल. शाळेच्या ग्रंथालयामध्ये पूरक वाचनाची पुस्तके आणि संदर्भ ग्रंथ, इनसायक्लोपिडिया उपलब्ध असतील. स्वअध्ययनासोबतच गट अध्ययनासारखे रचनात्मक पद्धतीचे शैक्षणिक कार्यक्रमही याअंतर्गत राबवले जातील.

आदर्श शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये २१व्या शतकातील कौशल्यांचा विकास होईल, याकडे विशेषत्वाने लक्ष दिले जाईल. यामध्ये नवनिर्मितीला चालना देणारे, समिक्षात्मक विचार, वैज्ञानिक प्रवृत्ती - संविधानिक मूल्ये अंगी बाणवणारे, सोबत काम करण्याचे कौशल्य तसेच संभाषण कौशल्य या सारखी अन्य कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचे प्रयत्न जाणीवपूर्वक करण्यात येतील. मंजूरी देण्यात आलेल्या ४८८ आदर्श शाळांच्या विकासासाठी ४९४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

## विज्ञान अविष्कार नगरी

पुण्यालगतच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात भारतरत्न राजीव गांधी विज्ञान अविष्कार नगरी उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे, भविष्यातील वैज्ञानिक घडवणे, यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात ८ एकर जागा उपलब्ध असून त्यापैकी एक एकर जागेत यापूर्वी तेथे विभागीय पातळीचे विज्ञान केंद्र उभारण्यात आले आहे, तर उर्वरित ७ एकर क्षेत्रफळावर जागतिक दर्जाची, विज्ञानातील विविध संकल्पनांवर आधारित भारतरत्न राजीव गांधी विज्ञान अविष्कार नगरी पुढील पाच वर्षात उभारण्यात येईल. केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत यासाठी १९१ कोटीच्या खर्चास मान्यता देण्यात आली.

## अनुकंपा धोरण

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना फार मोठा दिलासा दिला आहे. सध्या शासकीय सेवेतील एखाद्या गट-क किंवा गट-ड कर्मचाऱ्याचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबातील पात्र सदस्याला अनुकंपा तत्त्वावर शासकीय सेवेत नियुक्ती देण्यात येते. राज्य मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे की, गट-अ आणि गट-ब मधील अधिकाऱ्यांच्या बाबतीतदेखील हे अनुकंपा धोरण लागू करावे.



कोविड परिस्थितीत अनेक अधिकाऱ्यांचे निधन झाले असून अधिकारी संघटनांची देखील हे अनुकंपा धोरण लागू करण्याची मागणी होती. मुख्यमंत्र्यांनी या मागणीप्रमाणे कार्यवाही करण्याची सूचना केली होती. त्या अनुषंगाने या संदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत मांडण्यात आला.

या निर्णयामुळे राज्यातील अधिकाऱ्यांच्या निधनामुळे ओढवणाऱ्या आर्थिक आपत्तीतून त्यांच्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. गट-अ किंवा गट-ब मधील अधिकाऱ्याचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबातील पात्र सदस्यास गट-क किंवा गट-ड मध्ये अनुकंपा तत्त्वावर

नियुक्ती देण्यात येईल. याशिवाय अनुकंपा नियुक्तीसाठीचे विविध आदेश एकत्रित करून महाराष्ट्र राज्य शासन अनुकंपा नियुक्ती नियम २०२१ तयार करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामुळे अनुकंपा संदर्भातील प्रशासकीय अडचणी दूर होतील.

## निधी वितरणात सुसूत्रता

केंद्र पुरस्कृत योजनांच्या निधी वितरण, विनियोग व्यवस्थापनात सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने नोडल एजन्सी तसेच अंमलबजावणी याबाबत प्रशासकीय विभागांना बँक खाती उघडण्यासाठी सुधारित सूचना देण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्र शासनाच्या सूचनांनुसार प्रत्येक विभागाला प्रत्येक केंद्र पुरस्कृत योजनेसाठी एक सिंगल नोडल एजन्सी निश्चित करणे गरजेचे आहे व या एजन्सीने एक सिंगल नोडल बँक खाते उघडणे गरजेचे आहे. राज्य शासनाचे धोरण केंद्र शासनाच्या सूचनांशी सुसंगत करण्याच्या दृष्टिने विभागांच्या सिंगल नोडल एजन्सींना स्टेट बँक ऑफ इंडिया, राष्ट्रीयकृत बँका, आयसीआयसीआय बँक व एचडीएफसी बँक बँकांत खाते उघडण्यास मान्यता देण्यात आली.



## शैक्षणिक संस्थांची परवानगी : मुदतवाढ

तंत्रशिक्षणाच्या नवीन शैक्षणिक संस्थांच्या परवानगीसाठी आता १५ सप्टेंबर २०२१ पूर्वी अर्ज करता येतील. या दृष्टीने महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ अधिनियम १९९७ मधील विविध कलमांमध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

## आशा स्वयंसेविकांच्या मोबदल्यात वाढ

आशा स्वयंसेविकांना राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या दरमहा मोबदल्यात एक हजार रुपये, तर गटप्रवर्तकांच्या मोबदल्यात दरमहा १२०० रुपयांची वाढ करण्यास मान्यता दिली. कोरोना महामारी सुरू असेपर्यंत आशा स्वयंसेविका व आशा गटप्रर्वतक यांना दरमहा ५०० रुपये कोविडभत्ता राज्य शासनाच्या निधीतून अदा करण्यास मान्यता देण्यात आली. प्रस्तावित वाढ जुलै २०२१ या महिन्यापासून देण्यात येईल. यासाठी होणाऱ्या अंदाजे १३५ कोटी ६० लाख रुपयांच्या वार्षिक तरतुदीस मान्यता देण्यात आली.

## उद्योगांना सुधारित प्रोत्साहने

कृषीवर आधारित अन्नप्रक्रिया उद्योगांना सामूहिक प्रोत्साहन योजना २०१९ अंतर्गत सुधारित प्रोत्साहने देण्याचा निर्णय घेण्यात आला.

कृषी व अन्न प्रक्रियेवर आधारित उद्योग घटकांना ३१ ऑगस्ट २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार लाभ देण्यासाठी मोठ्या प्रकल्पांसाठीचा गुंतवणूक कालावधी हा ३१ ऑगस्ट २०२० रोजीचा शासन निर्गमित झाल्याच्या दिनांकापूर्वीचे ४ वर्षे म्हणजेच ३१ ऑगस्ट २०१६ पासून पुढील कालावधीतील घटक मागणी करेल, त्या कोणत्याही ४ वर्षे कालावधीतील घटकाची गुंतवणूक ग्राह्य धरण्यासाठी सामूहिक प्रोत्साहन योजना २०१९ मधील परिच्छेद क्र. २.९ मध्ये गुंतवणूक कालावधीसाठी विहित करण्यात आलेल्या तरतुदीतून सूट देण्यास मान्यता देण्यात आली.

कृषी व अन्न प्रक्रियेवर आधारित उद्योग घटकांना ३१ ऑगस्ट २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले अनुज्ञेय लाभ देण्यासाठी विशाल प्रकल्पांसाठीचा गुंतवणूक कालावधी हा ३१ ऑगस्ट २०२० रोजीचा शासन निर्गमित झाल्याच्या दिनांकापूर्वीचे ५ वर्षे म्हणजेच ३१ ऑगस्ट २०१५ पासून पुढील कालावधीतील घटक मागणी करेल त्या कोणत्याही ५ वर्षे कालावधीतील घटकाची गुंतवणूक ग्राह्य धरण्यासाठी सामूहिक प्रोत्साहन योजना २०१९ मधील परिच्छेद क्र. २.९ मध्ये गुंतवणूक कालावधीसाठी विहित करण्यात आलेल्या तरतुदीतून सूट देण्यास मान्यता देण्यात आली.

कृषी व अन्न प्रक्रियेवर आधारित उद्योग घटकांना लाभ देण्याबाबतच्या योजनेची अंमलबजावणी करण्यासंदर्भात ३१ ऑगस्ट २०२० रोजीचा शासन निर्णय तसेच १६ सप्टेंबर २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींचा अर्थ निश्चित करून प्रसंगानुरूप व प्रकरणपरत्वे शिफारस करण्याचे अधिकार १६ सप्टेंबर २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. १० अन्वये राज्यस्तरीय समितीस देण्यात आले आहेत. या समितीच्या शिफारसींवर उद्योगमंत्र्यांनी दिलेल्या निर्णयानुसार प्रकरणपरत्वे कार्यवाही करण्यात येईल.

## न्यायाधीशांना सुधारित वेतनश्रेणी

कुटुंब न्यायालयातील न्यायाधीशांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यास आज मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. शेट्टी आयोगाच्या शिफारशीनुसार १ जुलै १९९६ पासून व मा. न्या. पद्मनाभन समितीच्या शिफारशीनुसार कुटुंब न्यायालयातील सरळसेवेने नियुक्त झालेल्या न्यायाधीशांना, जिल्हा न्यायाधीश (प्रथम प्रवेश) तसेच सरळसेवेने नियुक्त झालेल्या



जिल्हा न्यायाधीश निवड श्रेणी व जिल्हा न्यायाधीश (उच्च समयश्रेणी) या वेतन श्रेणी लागू करण्यास मंजुरी देण्यात आली.

**टिप** : मंत्रिमंडळातील निर्णयांच्या अधिक माहितीसाठी www.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

**टीम लोकराज्य**

# लसीकरणाचा विक्रम

**कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाची संभाव्य तिसरी लाट रोखण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक ती सर्व तयारी पूर्ण केली आहे. आरोग्य सुविधांमध्ये वाढ करतानाच या संभाव्य लाटेची दाहकता कमी करण्यासाठी शासनाने लसीकरण मोहिमेला गती दिली आहे, कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिमेत २७ सप्टेंबरपर्यंत सुमारे ७ कोटी ९३ लाखांपेक्षा अधिक नागरिकांना लस देण्यात आली आहे. सर्वाधिक २ कोटी ३२ लाखांपेक्षा अधिक नागरिकांना लसीची दुसरी मात्रा देऊन महाराष्ट्राने देशात विक्रम केला आहे.**

**किशोर गांगुर्डे**

कोविड-१९च्या सद्यःस्थितीनुसार राज्यात एकूण ६५ लाख ४१ हजार ७६२ रुग्ण होते. त्यापैकी ६३ लाख ६२ हजार २४८ रुग्ण बरे झाले. रुग्ण बरे होण्याचे राज्यातील प्रमाण ९७.२६ टक्के असून राज्याचा मृत्युदर २.१२ टक्के इतका आहे. ३० नोव्हेंबर २०२० च्या स्थितीची आणि २८ सप्टेंबर २०२१ च्या स्थितीची तुलना केली तर आपल्याला दिसते की, कोविडच्या दैनंदिन रुग्णवाढीचा दर ०.३१ टक्क्यांवरून आता २७ सप्टेंबर रोजी ०.०४ टक्क्यांवर आला आहे. रुग्ण दुपटीचा कालावधीदेखील २२१.४१ दिवसांवरून १८३६.१३ दिवसांवर गेला आहे, तर रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९२.३९ टक्क्यांवरून ९७.२६ टक्के झाले आहे. त्याशिवाय प्रति दशलक्ष चाचण्यांच्या संख्येतही वाढ करण्यात आली असून ८१ हजार ६६१ वरून ४ लाख ५२ हजार ७८६ वर ही संख्या गेली आहे. राज्यात आतापर्यंत ५ कोटी ८२ लाख ८६ हजार ३६ लोकांच्या चाचण्या करण्यात आल्या आहेत.



### सक्रिय रुग्ण

देशात सध्या केरळनंतर महाराष्ट्रात सक्रिय रुग्णांची संख्या जास्त असून २७ सप्टेंबरच्या अहवालानुसार राज्यात ३७ हजार ४३ सक्रिय रुग्ण आहेत. राज्यातील पुणे, ठाणे, अहमदनगर, मुंबई, सातारा या पाच जिल्ह्यांतच सक्रिय रुग्णांची टक्केवारी ७५.२९ टक्के आहे. विशेष बाब म्हणजे राज्यात १०० पेक्षा कमी सक्रिय रुग्ण असलेल्या जिल्ह्यांची संख्या मोठी आहे. त्यात (कंसात सक्रीय रुग्णांची संख्या) धुळे (२), भंडारा (२), नंदुरबार (३), यवतमाळ (५), गोंदिया (५), जळगाव (६), वर्धा (६), वाशिम (७), नांदेड (९), बुलडाणा (१५), हिंगोली (१८), गडचिरोली (१९), अकोला (२९), जालना (४४), परभणी (६१), चंद्रपूर (८८), अमरावती (१००) या जिल्ह्यांचा समावेश आहे.

### सक्रिय रुग्णांचा तपशील (२६ सप्टेंबर २०२१)

- एकूण सक्रिय रुग्ण : ३७,८६०
- रुग्णालयात भरती असलेले रुग्ण : १७,४५२ (सक्रिय रुग्णांच्या ४६.१%)
- लक्षणविरहित किंवा सौम्य लक्षणे असलेले रुग्ण : २०,४०८ (सक्रिय रुग्णांच्या ५३.९%)
- गंभीर रुग्ण : ६,११० (सक्रिय रुग्णांच्या १६.१४%)
- आयसीयूमधील रुग्ण : २,३६६ (सक्रिय रुग्णांच्या ६.२५%), त्यापैकी,
  १) व्हेंटिलेटरवरील रुग्ण: १,००६ (सक्रिय रुग्णांच्या २.६६%)
  २) ऑक्सिजनवरील रुग्ण : १,३६० (सक्रिय रुग्णांच्या ३.५९%)

राज्याचा रुग्णवाढीचा साप्ताहिक सरासरी दर ०.०३७ टक्के असला तरी राज्याच्या सरासरीपेक्षा रुग्णवाढीचा अधिक दर काही जिल्ह्यांचा असून त्यात अहमदनगर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सातारा, रायगड, उस्मानाबाद, मुंबई, पुणे, सांगली, ठाणे, पालघर या जिल्ह्यांचा समावेश होतो. त्याशिवाय राज्यात प्रति दशलक्ष लोकसंख्येप्रमाणे ४ लाख ५२ हजार चाचण्या करण्यात आल्या असून

राज्याच्या सरासरीपेक्षा अधिक चाचण्या मुंबई, सांगली, सिंधुदुर्ग, ठाणे, सातारा, सोलापूर, पुणे, नागपूर, अहमदनगर, रत्नागिरी या जिल्ह्यांत करण्यात आल्या आहेत. २१ ते २७ सप्टेंबर या कालावधीत २२ हजार २५९ एकूण नवीन रुग्ण आढळले असून, यापैकी १५ हजार ८९१ रुग्ण अहमदनगर, पुणे, मुंबई, ठाणे, सोलापूर या पाच जिल्ह्यांतील आहेत. त्याशिवाय इतर जिल्ह्यांतील नवीन रुग्णांची संख्या केवळ ६ हजार ३६८ इतकी आहे.

### उपाययोजना

कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेचा अनुभव लक्षात घेऊन राज्य शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन विभाग यांनी आवश्यक ती सर्व खबरदारी घेतली आहे. कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या आहेत.

केंद्र सरकारने निश्चित करून दिलेल्या उपचार मानकानुसार औषधांचा पुरेसा साठा ठेवण्यासाठी आरोग्य, वैद्यकीय शिक्षण विभाग आणि हाफकिनला सूचना दिल्या असून कोविड चाचण्यांची क्षमता प्रतिदिन ३ लाखांवर गेली आहे, त्यात आरटीपीसीआर दोन लाख, तर एक लाख अँटिजेन चाचण्यांचा समावेश आहे. या चाचण्यांसाठी ४१० शासकीय आणि २०२ खासगी प्रयोगशाळा कार्यान्वित आहेत. शासनाने कोविड रुग्णांच्या उपचारासाठी समर्पित कोविड रुग्णालये (डीसीएच), समर्पित कोविड आरोग्य केंद्रे (डीसीएचसी) आणि कोविड केअर केंद्र (सीसीसी) च्या एकूण ६ हजार ४५४ सुविधा राज्यात उपलब्ध केल्या आहेत. आयसीयू वगळून ४ लाख ३८ हजार आयसोलेशन खाटा, कोविड रुग्णांसाठी ३ लाख ४४ हजार आयसोलेशन खाटा, संशयित रुग्णांसाठी ९४०९६ आयसोलेशन खाटा सज्ज करण्यात आल्या आहेत. राज्यात १ लाख २७ हजार ४४५ ऑक्सिजन संलग्न रुग्ण शय्या, ३७ हजारपेक्षा अधिक आयसीयू शय्या आणि १४ हजार ४९७ व्हेंटिलेटर्सची सुविधा राज्यात उपलब्ध करण्यात आली आहे. डॉक्टर्स आणि आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी १५ लाख ९० हजारपेक्षा अधिक पीपीई कीट आणि २७ लाख ८५ हजार एन-९५ मास्कची उपलब्धता करून देण्यात आली आहे.

### दुसऱ्या मात्रेत महाराष्ट्र प्रथम

महाराष्ट्रात आजपर्यंत एकूण ७ कोटी ९३ लाख ७९ हजार ३८० लसींच्या मात्रा देण्यात आल्या असून, त्यात सर्वाधिक २ कोटी ३२ लाख ९ हजार ८१६ जणांना दुसऱ्या लसीची मात्रा देऊन त्यांना पूर्णपणे सुरक्षित करण्यात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे.

**लसीकरण सद्य:स्थिती (२७ सप्टेंबर)**

| | पहिला डोस | दुसरा डोस |
|---|---|---|
| **आरोग्य कर्मचारी** | १२,९३,४३२ | १०,७१,९४४ |
| **फ्रंटलाईन कर्मचारी** | २१,४३,५४२ | १७,३१,३०१ |
| **४५ + वयोगटातील लाभार्थी** | २,३९,६३,००२ | १,३९,४२,६११ |
| **१८ ते ४४ वयोगटातील लाभार्थी** | २,८७,६९,५८८ | ६४,६३,९६० |
| **एकूण** | ५,६१,६९,५६४ | २,३२,०९,८१६ |
| **एकूण पहिला व दुसरा डोस** | ७,९३,७९,३८० | |

### लसीकरणासाठी अविरत परिश्रम

एकीकडे संभाव्य लाटेचा मुकाबला करताना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करतानाच राज्य शासनाने लसीकरणावर विशेष भर दिला आहे. जून महिन्यात ३ लाख ३२ हजार, जुलै महिन्यात ३ लाख ९१ हजार, ऑगस्ट महिन्यात ४ लाख ६७ हजार सरासरी दैनंदिन लसींच्या मात्रा देण्यात आल्या. तेच प्रमाण सप्टेंबर महिन्यात वाढले असून १ ते २७ सप्टेंबर दरम्यान सरासरी रोज ७ लाख ५२ हजार जणांना लसीकरण करण्यात आले.




राज्यात कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरणाला वेग आला असून आरोग्य विभागाची यंत्रणा लसीकरण मोहीम यशस्वी करण्यासाठी युद्धपातळीवर परिश्रम घेऊन लसीकरणाचे नवे विक्रम करत आहे. ८ सप्टेंबर रोजी १५ लाख, १८ सप्टेंबर रोजी १३ लाख ८७ हजार, १७ सप्टेंबर रोजी १२ लाख ५६ हजार, ४ सप्टेंबर रोजी १२ लाख २७ हजार आणि २२ सप्टेंबर रोजी ११ लाख ८ हजारपेक्षा अधिक लोकांचे सर्वाधिक दैनंदिन लसीकरण करून नवे विक्रम या मोहिमेने नोंदवले आहेत. लसीकरण कार्यक्रमातील हे आजपर्यंतचे सर्वाधिक लसीकरण असून, आरोग्य यंत्रणेतील सर्व घटक यासाठी परिश्रम घेत आहेत त्याचेच हे परिणाम आहेत, असे सार्वजनिक आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. प्रदीप व्यास यांनी सांगितले.

अठरापेक्षा अधिक वयाच्या लोकसंख्येपैकी कमीत कमी एक डोस दिला गेलेल्या लोकांचे प्रमाण ६१.४३ टक्के असून १८ ते ४४ वयोगटातील लोकसंख्येपैकी कमीत कमी एक डोस दिला गेलेल्या लोकांचे प्रमाण ५१.०६ टक्के आहे, तर ४५ पेक्षा अधिक वयाच्या कमीत कमी एक डोस दिला गेलेल्या लोकांचे प्रमाण ६८.२९ टक्के आहे. खासगी क्षेत्रात देखील राज्यात १.१५ कोटी पेक्षा अधिक लसींचे डोस देण्यात आलेले आहेत.

## मुख्यमंत्री, आरोग्यमंत्र्यांकडून कौतुक

दरम्यान, लसीकरण मोहिमेला राज्यात गती देण्यासाठी आरोग्य यंत्रणा घेत असलेल्या परिश्रमांबद्दल मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी आरोग्य विभागाच्या डॉक्टर्स आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

## जबाबदारीने वागावे : मुख्यमंत्री

कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेला रोखून विषाणूंविरुद्धचे हे युद्ध जिंकण्यासाठी आणि कोरोनाच्या संकटातून पूर्णपणे बाहेर येण्यासाठी राज्य शासनाने वेगाने आरोग्य सुविधांमध्ये वाढ केलेली आहे, असे असले तरी ऑक्सिजनची मर्यादा लक्षात घेता सर्वांनीच जबाबदारीने वागण्याचे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी 'माझा डॉक्टर' ऑनलाईन वैद्यकीय परिषदेत केले.

कोविडच्या संभाव्य तिसऱ्या लाटेला रोखण्याच्या उपाययोजनांबाबत कोविड राज्य कृतिदलाने आयोजित केलेल्या 'माझा डॉक्टर' या ऑनलाईन वैद्यकीय परिषदेचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. आरोग्य सुविधा मग ते ऑक्सिजन, रुग्णशय्या, औषधे, व्हेंटिलेटर्स असो की, अन्य इलेक्ट्रिक यंत्रसामग्री या सगळ्याच गोष्टी सतत वापरात असल्याने त्यांची काळजी घेणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे सर्व रुग्णालयांनी या गोष्टींचे ऑडिट करून घेण्याचे आवाहनही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले. महाराष्ट्राने ज्या वेगाने आरोग्य सुविधांमध्ये वाढ केली तेवढी क्वचितच एखाद्या राज्याने केली असावी. पण आजही ऑक्सिजनची आपल्याकडे कमी आहे. आपण रोज तीन हजार मे.टन ऑक्सिजन निर्मितीचे उद्दिष्ट ठेवले आहे. पण या क्षमतेपर्यंत पोहोचण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. पहिल्या लाटेपेक्षा कोरोनाची दुसरी लाट आपल्यासाठी अधिक अडचणीची ठरली. आपली ऑक्सिजनची गरज अचानक वाढली. राज्याचे ऑक्सिजनचे उत्पादन दररोज १२०० ते १३०० मे.टन असून ही गरज मागच्यावेळी १७०० ते १८०० मे.टन एवढी वाढली. इतर राज्यातून हजारो कि.मी. वरून ऑक्सिजन आणावा लागला, त्यातून आपण ऑक्सिजनची गरज भागवली. पण त्या राज्यात कोरोना रुग्णसंख्या वाढल्यास आपल्याला त्या राज्यातून ऑक्सिजन मिळत नाही, तो ऑक्सिजन ते राज्य त्यांच्या राज्यातील रुग्णांसाठी वापरतात ही वस्तुस्थिती आहे, अशावेळी आपल्या ऑक्सिजनच्या क्षमतेतच उपाययोजना करण्याची गरज आहे.

आज १४०० मे.टन ऑक्सिजनचे उत्पादन राज्यात होत आहे. त्यात स्टिल आणि लघू उद्योगासाठी ऑक्सिजन वापरतात. औषध क्षेत्रात, लस तयार करण्यासाठी ऑक्सिजनची गरज असते.



मागच्यावेळी सर्वच आपण ऑक्सिजन मेडिकल कारणासाठी वापरला म्हणजे इतर गोष्टींसाठी लागणारा ऑक्सिजन आपण बंद केला. आजही १४०० मे.टन ऑक्सिजनपैकी ३०० ते ३५० मे. टन ऑक्सिजन आपण रुग्णांसाठी वापरत आहोत. इतर राज्यातून ऑक्सिजन आणण्याची वेळ येऊ नये, हा आपला प्रयत्न असल्याचेही मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी या परिषदेत सांगितले.

'माझे कुटुंब माझी जबाबदारी' ही जशी महत्त्वाची गोष्ट आहे तशीच 'माझे गाव, माझी जबाबदारी' ही गोष्टदेखील महत्त्वाची आहे, ही बाब लक्षात घेऊन गाव कोरोनामुक्त करण्याचे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी या परिषदेच्या माध्यमातून केले. या परिषदेत टास्क फोर्सचे डॉ. संजय ओक, डॉ. शशांक जोशी, डॉ. राहुल पंडित, डॉ. अजित देसाई, डॉ. सुहास प्रभु, अमेरिकेतील डॉ. मेहुल मेहता यांनी कोविडच्या संदर्भात नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिली. कोविडपासून संरक्षण करण्यासाठी मास्क हा उत्तम पर्याय असून त्याच्याबरोबरच कोविड प्रतिबंधक नियमांचे पालन करण्याची सर्वांचीच जबाबदारी आहे, आजार होऊन उपचार करण्यापेक्षा हा संसर्ग होऊच नये, यासाठी पुरेशी दक्षता घेण्याची गरज या तज्ज्ञांनी अधोरेखित केली.

विभागीय संपर्क अधिकारी




# प्रबोधन

## शताब्दी वर्ष

महाराष्ट्राच्या वैचारिक चळवळीचा व पुरोगामी परंपरेचा वारसा पुढे नेण्यासाठी
प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांनी सुरू केलेल्या ‘प्रबोधन’ या पाक्षिकाचे
१६ ऑक्टोबर २०२० ते १५ ऑक्टोबर २०२१ हे ‘शताब्दी वर्ष’ आहे. त्यानिमित्ताने हा विशेष विभाग..

# जोखडमुक्त समाजासाठी


महाराष्ट्राला आत्मभान देणारे क्रांतिकारक विचारवंत केशव सीताराम ठाकरे यांनी प्रबोधन नियतकालिकेच्या माध्यमातून महाराष्ट्र जागा करण्याचे काम केले. तरुणांमध्ये आत्मभान निर्माण करताना नवा विचार दिला. महाराष्ट्राच्या आजच्या उभारणीमध्ये प्रबोधनकार ठाकरे यांचे विचार आणि कर्तृत्व महत्त्वाचे आहे. अनिष्ट प्रथांच्या जोखडातून समाज मुक्त करण्यासाठी आणि आपले विचार महाराष्ट्रातील सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी निर्माण केलेल्या प्रबोधन नियतकालिकेच्या स्थापनेचे हे शताब्दी वर्ष आहे, त्यानिमित्ताने....

**महावीर मुळे**

'प्रबोधन' नियतकालिकाचे हे शताब्दी वर्ष आहे. 'प्रबोधन'चे शताब्दी वर्ष संपूर्ण महाराष्ट्रात विविध कार्यक्रम आणि नावीन्यपूर्ण उपक्रमांनी साजरे होत आहे. प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे हे २०व्या शतकातील एक कर्ते सुधारक, पुरोगामी महाराष्ट्राच्या जडण-घडणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. ते महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रातील एक आक्रमक सुधारक, प्रभावी वक्ते, पत्रकार, व्यंगचित्रकार, साहित्यिक, तैलचित्रकार, इतिहास संशोधक ते एक विलक्षण मनस्वी, लढाऊ, बहुआयामी सुधारक व्यक्तिमत्त्व म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत.

## अंधश्रद्धेवर प्रहार

प्रबोधनकारपूर्व महाराष्ट्राची सामाजिक, धार्मिक, राजकीय परिस्थिती गोंधळाची होती. पेशवाईचा अस्त होऊन इंग्रजांनी आपले प्रशासन स्थिरस्थावर केले होते. तत्कालीन समाजजीवनावर धार्मिक आचार विचाराचा फारच प्रभाव होता. तत्कालीन उच्चवर्गीयांनी धार्मिकतेत वर्चस्व निर्माण करून कर्मकांड, व्रतवैकल्ये यांना जाणीवपूर्वक महत्त्व देऊन भोजन, दानधर्माचे महत्त्व वाढवले होते. यातूनच ऐतखाऊ, आळशी पुरोहितवर्गाची मक्तेदारी वाढली होती. बुद्धिप्रामाण्यापेक्षा अंधश्रद्धा, रूढी, परंपरांना महत्त्व प्राप्त झाले होते. त्या काळी समाजात अनेक अनिष्ट चालीरिती होत्या. जसे हुंडाबळी, केशवपन, अस्पृश्यता, बालविवाह, सावकारी. त्या काळी बहुजन समाज हा अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मठ वर्णरूढी परंपरा आणि जातिपातीच्या चक्रव्यूहात अडकला होता. त्या काळातील प्रशासनही याच उच्चवर्णीयांच्या ताब्यात होते. अशा सामाजिक परिस्थितीमध्ये महात्मा फुले यांनी केलेल्या समाजक्रांतीच्या कार्याने पुरोगामी महाराष्ट्र घडला. त्यांच्या कार्याने



प्रबोधनकार ठाकरे


महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात विशेषत: महिला, दिनदलित आणि शेतकरी शोषित समाज घटकांच्या उद्धाराचे एक नवीन तत्त्वज्ञान उदयाला आले. म्हणून त्यांना सामाजिक समतेचे शिल्पकार असे म्हणतात. त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून बहुजन समाजाचे प्रबोधन केले. पुढे छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात सत्यशोधक चळवळीच्या कार्याला सक्रिय पाठिंबा दिला. त्यांच्या निष्ठावंत सत्यशोधक कार्यकर्त्यांनी ही चळवळ महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात नेली.

१९व्या शतकात सुधारकांचा एक वर्ग निर्माण झाला. त्यांनी महाराष्ट्रात सामाजिक विचारांना नवी दिशा दिली. त्यांनी सामाजिक क्रांतीचा पाया घातला. हजारो वर्षांच्या राक्षसी रूढींनी चिरडलेल्या बहुजनांच्या मुक्तीसाठी ऐतिहासिक कार्य केले. याच सुधारकवर्गाने जातिभेद, कर्मकांड, वर्णभेद, अस्पृश्यता, विषमता, दु:ख, दारिद्र्य, लाचारी, दैववादी, अनिष्टप्रथा याविरूद्ध लढा दिला. स्त्री शिक्षण, बालहत्या, बालविवाह, सती प्रथा, कुमारी-जरठ विवाह, विधवा, विवाह संमती वय, केशवपन, बहुपत्नीकत्व, देवदासी यांसारख्या अनेक समस्यांनी स्त्रियांची स्थिती अत्यंत करुणाजनक झाली होती. समाजसुधारकांनी पारंपरिक समाजव्यवस्थेला विरोध केला. समाजात समता, समभाव,

बंधुभाव निर्माण करण्यासाठी तसेच प्रगत आचारविचार आत्मसात करून प्रत्येकाला शिक्षण मिळावे, यासाठी जनजागृतीचे कार्य करू लागले होते. महाराष्ट्रात अशा सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय परिस्थितीच्या काळात थोर कृतिशील समाजसुधारक केशव सीताराम ठाकरे यांचा जन्म आजच्या रायगड जिल्ह्यातील पनवेल या गावी १७ सप्टेंबर १८८५ रोजी झाला.

## पुरोगामी विचारांचा वारसा घरातूनच

प्रबोधनकारांच्या पुरोगामी व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत त्यांच्या आजीचे (बय) योगदान फार मोठे आहे. त्यांनी ६० वर्षे मोफत प्रसूतीचे कार्य एक धर्मकार्य म्हणून केले. या कार्यासाठी त्यांना गावोगावी वाड्यावस्त्यांवर जावे लागे. गोरगरीब, दिनदलित, श्रीमंतांच्या घरीही जावे लागे. त्यामुळे त्यांचा लोकसंपर्क मोठा होता. त्या कुटुंबप्रमुख होत्या. आजींचा एक कडक दंडक होता. घरी आलेल्या लोकांना त्यांची जातपात विचारायची नाही. अस्पृश्यतेच्या रूढीबद्दल त्यांना मनस्वी




तिटकारा वाटे. आजीच्या या संस्काराचे प्रबोधनकारांच्या बालमनावर संस्कार झाले. त्यामुळेच बहुजन समाजाच्या जनसेवेचे व्रतही आजीकडून त्यांना मिळालेली देणगी होय. प्रबोधनकारांच्या कुटुंबावर नियतीने

## लोकशिक्षणावर भर

शहरी आणि ग्रामीण लोकांसमोर जाऊन त्यांच्याशी त्यांच्या भाषेत प्रभावी बोलण्यासाठी लोकजागृतीसाठी प्रभावी भाषणकला हवी, लोकशिक्षणासाठी लेखनकला हवी यासाठी त्यांनी खूप कष्ट करून आपला पाया मजबूत केला. समाज प्रबोधनाच्या कार्यात स्वत:ला झोकून देण्याचे मनोमन ठरवले. तशी त्यांची मानसिकता तयार होऊ लागली. स्वत:ची विवेकनिष्ठा तयार केली. प्रभावी साधनांची जुळवाजुळव मानसिक पातळीवर सुरू केली. मनाचा हा निर्णय होत असतानाच कुटुंबाच्या सुखाचा विचार, भौतिक सुखाचा त्याग करावा लागला. आयुष्यभर हलाखीच्या परिस्थितीला सामोरे जावे लागणार, अडीअडचणी आणि समस्यांची संगत कायमचीच असणार या सर्वांचा विचार करून समाजक्रांतीसाठी आचारक्रांतीचा मार्ग स्वीकारून समाज सुधारणांच्या कार्यात झोकून देऊन निर्धाराने ध्येयाकडेही वाटचाल करण्याची तयारी केली. याबरोबर कुटुंबाचा गाडाही चालवायचा होता. यासाठी ते कुटुंबाला फक्त पैसाअडका द्यावयाचे. बाकी सर्व घरच्यांनी बघायचे हाच निर्णय पक्का होऊन त्यांनी भावी वाटचालीस प्रारंभ केला.

प्रबोधनकारांच्या कृतिशील सामाजिक कार्याचा व्याप वाढत होता. त्यांच्या सामाजिक कार्याचे विधायक परिणाम प्रत्यक्षात दिसू लागले. या समाजउपयोगी चळवळीची दखल खरेतर तत्कालीन वृत्तपत्रे, मासिकांनी घ्यावयास हवी होती. हुंड्यासारख्या समाजविघातक समस्येमुळे कशा समस्या निर्माण होतात हे समाजाला समजले आणि उमलत्या तरूणांवर चांगला परिणाम होऊ लागला. अशा सामाजिक कार्याची प्रसिद्धी होणे अगत्याचे असते ती न झाल्याने स्वाध्याय आश्रमाच्या तरूणांनी प्रबोधनकारांच्या पुढे एक कल्पना मांडली की, आपल्या सामाजिक कार्याची माहिती सर्वदूर व्हावी, समाजजागृती हाच आपला एकमेव उद्देश आहे म्हणूनच आपल्या विचाराचे स्वत:चे काहीतरी माध्यम हवे ही अपेक्षा अनेकांनी व्यक्त केली.

अनेक आघात केले. त्यातच कुटुंबाची आर्थिक स्थितीही बेताची. घरातील कमवत्या वडिलांचा मृत्यू झाला. काही वर्षात आजोबांचे निधन झाले. हलाखीच्या स्थितीतील कुटुंबावर सतत आघात होत




गेल्याने प्रबोधनकारांच्या शिक्षणात अडथळे आले. शिक्षणाचे संस्कार होण्याच्या वयात त्यांना आपल्या कुटुंबासाठी विविध व्यवसाय करावे लागले. त्यासाठी त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर भटकंती केली. भटकंतीतही परिस्थितीशी झुंझावे लागले. सततच्या प्रवासात नवा प्रदेश, नवी माणसे, त्यांचे रीती-रिवाज तसेच तत्कालीन जीवघेण्या साथीचे आजार, दुष्काळ, समाजातील निरक्षरता अनुभवली. लोकांमधील अज्ञान, दैववाद, धर्मशास्त्राचा प्रभाव, कर्मकांड, जातिभेद, पंक्तिभेद, अस्पृश्यता यामुळे प्रगती न होता गुलामगिरीच्या जोखडात वर्षानुवर्षे खितपत पडलेल्या समाजाचे त्यांनी निरीक्षण केले. जे पाहिले, अनुभवले ते त्यांनी मनात साठवले. कुटुंबीयांच्या संस्काराबरोबर समाजातील सुधारकांचे संस्कार त्यांनी टिपकागदाने शाई टिपावी, त्याप्रमाणे आपल्या मनावर कायमस्वरूपाची टिपले. व्यवसायाच्या निमित्ताने प्रवासात विविध क्षेत्रातील लोकांशी त्यांना संवाद साधता आला. त्याचबरोबर महाराष्ट्रातील अनेक




गावातील असंख्य कुटुंबीयांशी स्नेह निर्माण होऊन तो कायमस्वरूपी टिकला.


व्यवसायाबरोबरच प्रबोधनकार वाचन, चिंतन, मनन करत होते. त्याचबरोबर इतिहास संशोधन, धर्मसुधारणा, समाजकारण याविषयासाठीचा अभ्यास करून विषयाची मांडणी कशी करावी, प्रभावी भाषणे कशी द्यावीत, माहितीचे विश्लेषण कसे करावे, संदर्भ कसे द्यावेत, परिस्थितीचे चिंतन कसे करावे, देश परदेशातील इतिहास, धर्मशास्त्र, विज्ञान आपल्या समाजासाठी कसे उपयुक्त ठरावे, यासाठी त्यांनी समाजसुधारकांची चरित्रे वाचली. शतकाची गुलामगिरी सोसलेल्या सामान्य माणसाच्या मनावर पुरोगामी विचाराचे संस्कार होण्यासाठी त्यांची मानसिकता कशी तयार करावी, याविषयी त्यांच्या मनात घालमेल सुरू झाली. पुस्तकी आणि सैद्धान्तिक विचारांपेक्षा प्रत्यक्ष लोकांमध्ये जाऊन सामाजिक क्रांतीची बीजे रुजवण्यासाठी स्वत:ची मानसिक तयारी त्यांनी केली.


## प्रबोधनाची पायाभरणी

प्रबोधनकारांच्या मनात खूप वर्षांपासूनची सूप्त अशी इच्छा होतीच वाचन, लेखन, भाषणामुळे त्यांचा या क्षेत्राशी लहानपणापासून संपर्क होता. विशेषतः त्यांना पत्रकारितेचे अंगभूत कौशल्य आणि समज होती. महाराष्ट्रातील आणि राज्याबाहेरील अनेक मोठमोठ्या वृत्तपत्राचे, मासिकांचे संपादक, मालक, वार्ताहर, लेखकाशी त्यांच्या ओळखी होत्या, स्नेहाचे संबंध होते. फक्त काळजी होती ती भांडवलाची आणि व्यवस्थापनाची. महाराष्ट्रात खरोखरीच समाजप्रबोधनाच्या उद्देशाने ज्यांनी ज्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रवेश केला त्यांच्या आर्थिक आणि व्यवस्थापनेच्या मर्यादेमुळे काही वर्षातच त्यांची वृत्तपत्रे बंद पडली. ज्या वृत्तपत्राचे मालक उद्योगपती आहेत त्यांची वृत्तपत्रे वर्षानुवर्षे चालू आहेत. पण त्यांचे उद्देश अनेक असतात, त्यामुळे समाजाच्या उद्धारात त्यांची दखल घेता येत नाही. या सर्व गोष्टी प्रबोधनकारांना चांगल्याच माहीत होत्या. तरीही त्यांचा पिंडच समाजहिताचा असल्याने यातील राजकारण किंवा आर्थिक मिळकतीचा विचार न करता १९२१ च्या सप्टेंबरमध्ये वृत्तपत्र काढण्याचे मनोमन निश्चित केले. यासाठी काही अडचणी होत्या.

प्रबोधनकार ब्रिटिश सरकारच्या कार्यालयात नोकरीस होते. सरकारी नोकरीत राहून सरकारी नोकरास पुस्तक लिहिणे, प्रकाशित करणे, वृत्तपत्र लेख लिहिणे व वृत्तपत्र चालवण्यास बंदी होती. तेव्हा वृत्तपत्र कसे सुरू करणार हा प्रश्न होता. बऱ्याच प्रयत्नांनी शासकीय पातळीवर चर्चा होऊन ब्रिटिश सरकारने त्यांना आपणास वृत्तपत्र चालू करण्यास परवानगी देत आहोत, मात्र एका अटीवर, अशा रीतीने पुन्हा कोणालाही परवानगी देण्यात येऊ नये, असे सांगितले. ब्रिटिश सरकारच्या अमलात वृत्तपत्राची परवानगी घेणारे प्रबोधनकार ठाकरे हेच एकमेव होते. रीतसर सर्व गोष्टींची पूर्तता झाल्यावर त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना कल्पना दिली. ते म्हणाले, 'यापूर्वी सामाजिक कार्यास वाहून घेतलेले एकमेव वृत्तपत्र 'सुधारक' होते ते आगरकर चालवत होते. त्यांचाच आदर्श समोर ठेऊन आपल्या पाक्षिकेचे नाव प्रबोधन ठेवावे असे मला वाटते.' असे म्हणताच सर्वांनी टाळ्या वाजवून अनुमोदनच दिले.

समाज जीवनाच्या विविध अंगात बदल घडवण्यासाठी, नव्या विचाराची पिढी घडवण्यासाठी, जातिभेद विरहित समाजमनाची जडणघडण करण्यासाठी, आणि प्रागतिक विचारसरणीची मानसिकता तयार करण्यासाठी तसेच समाजात समता, बंधूभाव निर्माण करण्यासाठी प्रगत आचारविचार आत्मसात होण्यासाठी बहुजन समाजाचे लोकशिक्षण व्हावे याच केवळ उद्देशाने तत्कालीन प्रवाहाविरूद्ध







पोहण्याचे बळ प्रबोधनकारांच्याकडे होते. त्याचबरोबर सनातन्यांवर कडक प्रहार करून समाजाच्या रोषास तोंड देण्याची त्यांची तयारीही होती. प्रबोधन प्रत्यक्षात साकारण्यासाठी काय काय करणे आवश्यक आहे, याचाच ते विचार करू लागले. इतर पाक्षिके आणि मासिकांच्या अभ्यासास सुरुवात केली. ती एवढ्यासाठीच की, आपला 'प्रबोधन' हा सर्वांपेक्षा आगळावेगळा सर्व महाराष्ट्रात पोहोचला पाहिजे, यासाठी विचार, चर्चा होऊ लागली. प्रबोधनच्या मुखपृष्ठापासून ते मलपृष्ठापर्यंत 'प्रबोधन'चे सांकेतिक चिन्ह काय असावे? प्रबोधनकार स्वतः चित्रकार तसेच जातिवंत कलाकार होते. संपादकीय, विचार करावयास लावणारे लेख, कविता, पत्रोत्तरे, वाचकांची दखल, दिर्घकथा, समाजसेवकांची चरित्रे, विनोद अशा साहित्याची रेलचेल असावी. 'प्रबोधन' चा मुख्य उद्देशच समाज जागृतीचा याच हेतूने प्रबोधनचे अंतरंग, बाह्यरंग तयार होऊ लागले. सर्वांनी आर्थिक मदत केली. तरुणांचे सहकार्य महाराष्ट्रातील मान्यवरांचे लेख, विक्री व्यवसायात एजंट महाराष्ट्रातील गावोगावी जाण्यासाठीची योजना या पद्धतीने प्रबोधनचा हा प्रकल्प सिद्ध झाला. पहिला अंक बाहेर पडण्यापूर्वी इतर वृत्तपत्रेही आणि मासिकातून जाहिराती केल्या. प्रबोधनकारांचा लोकसंग्रह मोठा होता. हाती घेतलेले काम जीव ओतून करण्याचा त्यांचा स्वभाव असल्याने सहकाऱ्यांच्या मदतीने प्रबोधनाची तयारी अंतिम टप्प्यात आली. अशा रीतीने सर्व तयारी झाल्यानंतर 'प्रबोधन' पाक्षिकेचे १६ ऑक्टोबर १९२१ ला प्रकाशित करण्याचे निश्चित ठरले. दर १५ दिवसांनी वितरण होत होते. यासाठी पोस्ट ऑफिसच त्यांच्या संस्थेच्या शेजारी आणले गेले. प्रबोधनकारांच्या लोकसंग्रहामुळे 'प्रबोधन'च्या अंकाची वाढ होत होती. लोकहितवादी पण स्वतंत्र मतवादी 'प्रबोधन' मासिक संपादक केशव सीताराम ठाकरे याच नावाने या पाक्षिकेची पुढे मासिकात रूपांतर झाले आणि 'प्रबोधन' हे मासिक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचले.

प्रबोधनकारांची रोखठोक, तिखट लेखणी आणि तत्कालीन तरुणवर्ग समाजसेवेच्या क्षेत्रात कसा येईल, याच उद्देशाने त्यांनी लेखणी आणि वाणी चालवली. ते अत्यंत स्पष्टवक्ते, आपल्या






लेखणीने आणि वाणीमुळे स्वतःची अशी प्रतिमा तयार केली. लहानपणापासून वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या या सर्वसामान्य केशवचे आपल्या स्वकर्तृत्वाने ते केशवराव झाले. पुढे महाराष्ट्रातील ते अग्रगण्य समाजसुधारक झाले. तेव्हा या बेडर, बुलंद, लेखनधुंद अव्वल अवलियास सारा महाराष्ट्र आदराने प्रबोधनकार म्हणू लागला.

प्रबोधनकारांनी 'लोकहितवादी' नावाचे पाक्षिक ३१ ऑगस्ट १९२७ मध्ये पुण्यात असताना सुरू केले होते. त्यांचे गुरू लोकहितवादी यांचे स्मरण कायम राहावे म्हणून ते चालू केले. तसेच आगरकरांचा सुधारणामताचा जीर्णोद्धार व्हावा हाही उद्देश हे पत्र सुरू करण्यामागे होता. 'प्रबोधन' हे मासिक १९२१ ते १९३० अखेर चालू होते तर 'लोकहितवादी' दोन वर्षात बंद झाले. यानंतर प्रबोधनकारांनी कधीही स्वतःचे पत्रक काढले नाही. मात्र त्यांनी 'नवाकाळ' 'जळगाव समाचार', 'मार्मिक', 'नवा मनू' अशा अनेक वृत्तपत्र मासिकांतून भरपूर लेखन केले आहे आणि ठाकरे यांच्या नावातील केसी हे नाव मागे पडून सर्व महाराष्ट्रभर प्रबोधनकार या नावानेच ते प्रसिद्ध झाले.

**लेखक 'प्रबोधन' नियतकालिकेचे संग्राहक आणि निवृत्त शिक्षक आहेत.**

# ‘प्रबोधन’ची संघर्षगाथा

**‘प्रबोधन’ हे फक्त एक नियतकालिक नव्हतं, तर तो केशव सीताराम ठाकरे या फाटक्या संपादकाच्या सत्याप्रती निष्ठेचा आणि सर्वसामान्यांविषयी कळकळीचा दस्तऐवज आहे. आज ‘प्रबोधन’ची शताब्दी साजरी करताना प्रबोधनमधल्या प्रबोधनकारांच्या विचारांचे मोल नव्याने समोर येत आहे. प्रबोधन नियतकालिकाच्या माध्यमातून अवघा महाराष्ट्र प्रबोधनाच्या महामार्गावर आणणाऱ्या प्रबोधनकार ठाकरे यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला.**


प्रबोधन

**सचिन परब**

प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे. महाराष्ट्राच्या इतिहास आणि भूगोलालाही वळण लावणारी थोर व्यक्तिमत्वं विसाव्या शतकात होऊन गेली, त्यातलं एक महत्त्वाचे नाव. महात्मा फुले यांच्या सत्यशोधनाचा विचार पुढे नेणारे आक्रमक विचारवंत, भिक्षुकशाहीचा कर्दनकाळ ठरलेले समाजसुधारक, हुंड्यासारख्या चालीरितींविरुद्ध उभे ठाकलेले सामाजिक कार्यकर्ते, मराठी पत्रकारितेला नवी दिशा देणारे संपादक, जातनिष्ठ इतिहासलेखनाचा फोलपणा दाखवून इतिहासाची नवी मांडणी करणारे इतिहासकार, महाराष्ट्रभर सातत्याने फिरून विद्रोहाची पेरणी करणारे ज्वलंत वक्ते, समाज सुधारणांना जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्वस्व पणाला लावणारे नाटककार, दिग्दर्शक आणि निर्मातेही, मोजक्याच पण ठसकेबाज भूमिका करणारे लक्षवेधी अभिनेते, सार्वजनिक नवरात्रौत्सवाचे संस्थापक, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांचे गुरुतुल्य मार्गदर्शक, संयुक्त महाराष्ट्र प्रत्यक्षात आणण्यासाठी वयाच्या सत्तरीत तुरुंगवास भोगणारे आंदोलनाचे नेते, गेल्या अर्धशतकापेक्षाही जास्त काळ महाराष्ट्राच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी असणाऱ्या ठाकरे कुटुंबाचे प्रेरणास्थान, याशिवाय लेखक, कवी, संगीतकार, सतारवादक, चित्रकार, छायाचित्रकार, शिक्षक, उद्योजक, विक्रेते, जनसंपर्क अधिकारी अशा विविध भूमिकांत वावरलेल्या अफाट बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे कर्तृत्व शब्दांत पकडणे कठीण आहे.

## सामाजिक घुसळणीचा भाग प्रबोधन

प्रबोधनकारांचा जन्म १७ सप्टेंबर १८८५ आणि मृत्यू २० नोव्हेंबर १९७३चा. त्यांना ८८ वर्षांचे दीर्घायुष्य लाभले. हा बहुरंगी माणूस एका आयुष्यात अनेक आयुष्य जगला. पण त्यात त्यांची ओळख बनले ते त्यांनी संपादित केलेले ‘प्रबोधन’ हे नियतकालिक. १६ ऑक्टोबर १९२१ ला ‘प्रबोधन’ नियतकालिकाचा पहिला अंक मुंबईहून प्रकाशित झाला. त्याला २०२१च्या २१ ऑक्टोबरला शंभर वर्ष होतील.

‘प्रबोधन’ नियतकालिकाने घडवलेली जागृती हा महाराष्ट्राच्या समाज प्रबोधनाच्या, समाजसुधारणेच्या आणि पत्रकारितेच्या इतिहासाचा फार महत्त्वाचा भाग आहे. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर गांधीयुगाला सामोरे कसे जावे, याविषयी महाराष्ट्र गोंधळलेला होता. त्याचबरोबर वेदोक्त प्रकरण आणि त्यातून निर्माण झालेला ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद टोकाला गेल्याने महाराष्ट्र हादरलेला होता. या पार्श्वभूमीवर ‘प्रबोधन’चा जन्म झाला. त्यानंतरच्या म्हणजे १९२०च्या दशकातल्या जवळपास नऊ वर्षांच्या महत्त्वाच्या नोंदी ‘प्रबोधन’मध्ये आहेत. किंबहुना ‘प्रबोधन’ हा या सगळ्या सामाजिक आणि राजकीय घुसळणीचा एक भाग आहे. पहिल्या महायुद्धानंतर अमेरिका आणि जपान यांचा महासत्ता म्हणून होणारा उदय, असहकार आंदोलन, मोपल्यांचा मलबार येथील हिंसाचार, खिलाफत चळवळ या राष्ट्रीय पातळीवरच्या घडामोडी, तसेच १९२३ च्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका, त्यामुळे ब्राह्मणेतर चळवळीतल्या हालचाली, ब्राह्मणी वर्चस्ववाद्यांच्या कारवाया, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले आणि लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यांमुळे झालेले वाद, मुळशी सत्याग्रह या महाराष्ट्रातल्या घडामोडींवर प्रबोधनकार ठाकरे यांच्यासारख्या महाराष्ट्रभर उत्तम जनसंपर्क असलेल्या अभ्यासू संपादकाने केलेली भाष्ये हा आज एक ऐतिहासिक दस्तऐवज आहे.

## कलमप्रभूला मुजरा


लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, इतिहासाचार्य राजवाडे अशा या काळातील व्यक्तिमत्त्वांशी संबंधित ऐतिहासिक नोंदीही या लेखांमध्ये वाचता येतात. शिवाय स्वतः प्रबोधनकार ठाकरे यांचे चरित्रही त्यांच्या साहित्यातून समोर येते

ते महत्त्वाचे आहे. १६ सप्टेंबर १९४५ मध्ये नवयुग साप्ताहिकातल्या लेखात आचार्य प्र. के. अत्रे सांगतात, ‘आजपर्यंत ठाकरे यांनी लिहिलेले सर्व प्रबोधक आणि तेजस्वी वाङ्मय एकत्रित करून ग्रंथरूपाने जर प्रकाशात आले, तर महाराष्ट्राची सामाजिक क्रांती घडवून आणण्याच्या कामी या बंडखोर ब्राह्मणेतराने एका कालखंडात केवढी तेजस्वी कामगिरी करून ठेवलेली आहे, हे महाराष्ट्राला कळून आल्यावाचून राहणार नाही. अशा मान्यतेचा आणि गौरवाचा मुजरा महाराष्ट्र या कलमप्रभूला मोठ्या आनंदाने करील!’ त्यापेक्षाही महाराष्ट्रातल्या सामाजिक संघर्षाचा तपशीलवार पट ‘प्रबोधन’मधून उभा राहतो, तो महत्त्वाचा आहे.

‘प्रबोधन’ने त्याच्या प्रकाशनकाळात महाराष्ट्रावर कसा प्रभाव टाकला, हे पुढे दिलेल्या समकालीन पत्रकारांचे उतारे वाचून कळू शकेल. १९३०च्या दरम्यान नागपूरहून ॲड. गोविंदराव प्रधान, शांतारामपंत देशपांडे आणि गोपाळराव दळवी मिळून ‘जनता’ नावाचे नियतकालिक काढत. या ‘जनता’ने ९ जानेवारी १९३०च्या अंकात ‘प्रबोधन’विषयी आपला अभिप्राय दिलेला आहे. प्रबोधनाने पाच वर्षात आपल्या निर्भीड व कल्पनारम्य लिखाणाने महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात खळबळ उडवून दिली. प्रबोधनकार ठाकरे यांचे लिखाण म्हणजे त्रस्त जीवांचे हाल पाहून भडभडून आलेल्या अंतःकरणाचे पडसाद आहेत. त्यांच्या लेखांतील प्रत्येक ओळींत व अक्षरांत धर्म व राजकारण ह्यांच्या नावाखाली छळवाद करणाऱ्या स्वार्थी सोद्यांचा निषेध दर्शवणारा जळजळीत संतापातिरेक दिसून येतो. मि. ठाकरे यांचे लिखाण म्हणजे डायनॅमिट. ते भटशाही, लाटशाही व भांडवलशाही यांच्या अभेद्य ठरलेल्या स्वार्थी तटांना आपल्या लेखणीच्या सुरुंगाने पार उडवून देते.’

## ‘प्रबोधन’चा प्रवास

‘प्रबोधन’चा पहिला अंक १६ ऑक्टोबर १९२१ ला प्रकाशित झाला. पहिली दोन वर्षं म्हणजे १९२१-१९२२ आणि १९२२-१९२३ या प्रकाशन वर्षांत ‘प्रबोधन’ मुंबईतून पाक्षिक म्हणून नियमित प्रकाशित झाले आहे. दोन्ही वर्षी दर महिन्याच्या १ आणि १६ तारखेला ‘प्रबोधन’ प्रकाशित होत असे. या दोन वर्षांचे मिळून ४८ अंक उपलब्ध आहेत. तिसऱ्या प्रकाशन वर्षात ‘प्रबोधन’ सातारा रोडहून प्रकाशित होऊ लागले. १९२३-१९२४ या प्रकाशन वर्षाचेही पाक्षिक म्हणून पहिले १८ अंक सलग निघाले आहेत. त्यानंतर ‘प्रबोधन’ दहा


प्रबोधन

महिने प्रकाशित होऊ शकले नव्हते. चौथ्या वर्षीपासून ‘प्रबोधन’ मासिक बनून पुण्याहून प्रकाशित होऊ लागले. चौथ्या वर्षात एप्रिल १९२५ पासून मे १९२६ या १४ महिन्यांत ‘प्रबोधन’चे १२ अंक प्रकाशित झाले. पाचव्या प्रकाशन वर्षातला पहिला अंक जुलै १९२६ चा आहे. तेव्हापासून नोव्हेंबर १९२७ पर्यंत दहा अंक प्रसिद्ध झाले आहेत. त्यानंतर तब्बल दोन वर्षांचा खंड आहे. ऑक्टोबर १९२९ मध्ये पाचव्या प्रकाशन वर्षांचा ११-१२ वा जोडअंक प्रकाशित झाला आहे. सहाव्या प्रकाशन वर्षात नोव्हेंबर १९२९ पासून मार्च १९३० पर्यंत सलग पाच अंक प्रकाशित झाले आहेत. त्यानंतर कोणतीही घोषणा न करता ‘प्रबोधन’ बंद पडले. अधिक नेमकेपणाने बोलायचे तर त्यानंतर ‘प्रबोधन’चा कोणताही अंक आज उपलब्ध नाही.

## तरुण वयातच संपादक

इंग्रजी शाळेत असतानाच प्रबोधनकारांनी इंग्रजीतून मराठीत अनुवाद केलेले दोन लेख करमणूक या आघाडीच्या साप्ताहिकात छापून आले होते. १७-१८ व्या वर्षी त्यांनी मुंबईच्या प्रसिद्ध तत्त्वविवेचक छापखान्यात असिस्टंट प्रूफरीडर म्हणून काम केले. नंतर ते अनेक नियतकालिकांत सातत्याने लिहीत होते. वयाच्या विशीत सांगलीकर नाटक मंडळीत असतानाच्या पंढरपूर आणि विजापूर अशा दोन शहरांतल्या मुक्कामांचे वर्णन त्यांनी केले आहे. त्या दोन्ही ठिकाणी अनोळखी असणारे त्यांचे चाहते वाचक त्यांना शोधत आल्याचे उल्लेख आहेत. जळगावात असताना प्रबोधचंद्रिका साप्ताहिकाचे संपादक नारायण नरसिंह उर्फ नानासाहेब फडणीसांनी ‘प्रबोधन’कारांमधला संपादक नेमका हेरला आणि त्यांना एक सारथी नावाचे मासिक सुरू करायला लावले. ते वर्षभर चालले. प्रबोधनकारांच्या नोंदीनुसार हे सगळे १९०६-०७ मध्ये घडत होते. याचा अर्थ प्रबोधनकार अवघ्या २१-२२व्या वर्षी संपादक बनले.

## कोदण्डाचा टणत्कार

इतिहासाचार्य वि. का. राजवाडेंनी भारत इतिहास संशोधन मंडळाच्या चौथ्या वर्षाच्या अहवालात ‘कायस्थदीप’ या पुस्तकावर एक २२ पानी लेख छापला. त्यात चांद्रसेनीय कायस्थ प्रभू म्हणजे सीकेपी समाजाची कुळी हीन असल्याचा आरोप केला. प्रबोधनकारांनी राजवाडेंचे संशोधन खोडून काढणारे पुस्तक लिहायचे ठरवले. त्याचं कारण ते सांगतात, ‘एका काळच्या सत्तामदाने शिरजोर झालेले ब्राह्मण पंडित, इतिहास संशोधनाच्या किंवा आणखी कसल्या तरी फिसाटाच्या पांघरुणाखाली कायस्थादी ब्राह्मणेतरांवर आणि अनेक चित्पावनेतर ब्राह्मणांवरही हल्ले चढवायला सवकलेले आहेत. त्यांचा एकदा कायमचा पुरा बंदोबस्त केलाच पाहिजे या हिरिरीने मी कोदण्डाचा टणत्कार हे पुस्तक लिहून प्रसिद्ध केले.’ कोदण्डाचा टणत्कार अर्थात भारत इतिहास संशोधन मंडळास उलट सलामी हे तडाखेबंद पुस्तक १७ नोव्हेंबर १९१८ला प्रकाशित झाले. या

## गरिबीत उडी घेणारा संपादक

याच काळात प्रबोधनकारांनी सरकारी नोकरी सोडली. त्यासाठी प्रबोधनकारांच्या आईचा विशेष आग्रह होता. त्या नेहमी सांगत की वेळ आली तर भीक माग पण इंग्रज सरकारची नोकरी करू नकोस. सरकारने परवानगी दिल्यामुळे 'प्रबोधन' सुरू ठेवण्यात तांत्रिकदृष्ट्या अडचण काहीच नव्हती. पण केवळ आपले विचार आणि कृती यात तफावत राहू नये, यासाठी २५० रुपये मासिक पगाराची नोकरी सोडून पुन्हा गरिबीत उडी घेणारा संपादक विरळाच.

'प्रबोधन'ला मिळणाऱ्या प्रतिसादामुळे त्यांना 'प्रबोधन'ची पाने आणि प्रती वाढवण्याची इच्छा होती. स्वतंत्र छापखाना नसल्यामुळे त्यांच्या या मनसुब्यात अडचणी येत होत्या. साताऱ्यातील उद्योजक धनजीशेठ कूपर यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांना 'प्रबोधन'कारांकडे पाठवले. साताऱ्याजवळच्या पाडळी या गावात छापखाना उभारण्याचा प्रस्ताव त्यांनी मांडला. त्यानुसार प्रबोधनकारांनी 'प्रबोधन'चा कारभार साताऱ्याला हलवण्याचा निर्णय घेतला. निवडणुकीच्या दरम्यान प्रबोधनकारांनी कूपर यांच्या गटातले भास्करराव जाधव यांच्याविरोधात भूमिका घेतली. तसंच त्यांनी 'अस्पृश्यांनो स्पृश्यांपासून सावधान' असे स्फुट प्रबोधनात लिहून बॉम्ब टाकला होता. परिणामी या दोघांच्या विरोधात कूपरने षड्यंत्र रचायला सुरुवात केली. त्यामुळे प्रबोधनकारांनी त्यात सगळा हिशेब देऊन कफल्लकपणे सातारा सोडला. 'प्रबोधन'प्रेमी रामचंद्र उर्फ बापूसाहेब चित्रे यांनी पुण्यात कर्जात बुडालेला एक छापखाना विकत घेतला होता. त्याचा व्यवहार करण्यासाठी छापखान्याचा मालक, ज्याचा उल्लेख प्रबोधनकार गायतोंड्या भट असा करतात, सातारा रोडला प्रबोधनकारांना भेटायला आला होता. तो आला त्याच दिवशी 'प्रबोधन'कारांच्या एका मुलीचे डायरियाने अचानक निधन झाले. तिचे अंत्यसंस्कार करत असतानाच घाईत असलेल्या छापखाना मालकाशी जड हृदयाने व्यवहाराच्या गोष्टीही करत होते. ते बघून प्रबोधनकारांच्या पत्नीने त्यांना सुनावलं, 'प्रबोधनापुढे पोटच्या गोळ्याची सुद्धा यांना तिडीक येत नाही.' तो उद्वेग स्वाभाविक असला तरी तो एका संपादकाच्या निष्ठेचा सन्मानही होता.

ग्रंथाच्या सहा हजार प्रती अवघ्या पंधरा दिवसात संपल्याचा दावा प्रबोधनकारांनी केला आहे. कारण प्रबोधनकारांचा हा प्रतिवाद फक्त सीकेपींचा उरलेला नव्हता, तर तो ब्राह्मणी संशोधकांच्या बदनामी मोहिमांमुळे अस्वस्थ असलेल्या सगळ्याच ब्राह्मणेतरांचा झाला होता. याच दरम्यान वेदोक्त प्रकरण गाजत होतं. जात वर्चस्ववादाचे हिडीस रूप महाराष्ट्र बघत होता. त्यातून 'प्रबोधन'कारांचेही विचारचक्र सुरू होती. त्यातून ते एका निष्कर्षापर्यंत पोचले, ब्राह्मणेतर समाजाची पहिली गरज ही भिक्षुकशाहीच्या सापळ्यातून मुक्तता ही आहे. दुसरीकडे छत्रपती शाहू महाराजांच्या प्रेरणेने सत्यशोधकी नियतकालिके सुरू करण्याचा धडाका सुरू होता. प्रबोधनकारांचा तर त्यांच्याशी आत्मीय स्नेह निर्माण झाला होता. त्यातून प्रबोधनकारांनी १९२१च्या सप्टेंबर महिन्यात स्वतःचं वृत्तपत्र काढण्याचा निर्णय घेतला.

## 'प्रबोधन'चे ध्येय

'प्रबोधन'च्या पहिल्या अंकात त्याची भूमिका स्पष्ट करणारे दोन लेख आहेत. पहिला 'प्रबोधन'चे ध्येय या नावाचा आहे. त्या लेखाचीच नाही, तर 'प्रबोधन'चीच सुरुवात वसंतविहारी यांच्या कवितेने होते. त्यामुळे या कवितेशिवाय 'प्रबोधन'वरचे कोणतेही लिखाण पूर्ण होऊ शकत नाही. या कवितेत 'प्रबोधन'च्या ध्येयाचे सार आले आहे.

***समाजकार्यी स्वधर्मतत्वी सदा शिलेदार।***
***प्रजापक्षनवमतसंवादी राजस सरदार।।***
***विशिष्टपंथप्रवर्तकांची व्यर्थ न करि पूजा।***
***व्यक्तीचा नच मिंधा,***
***बंदा सत्याच्या काजा।।***
***विश्व निर्मिले जयें दयाळें***
***त्या जगदीशाला।***
***भिऊनी केवळ, नच अन्याला,***
***लागे कार्याला।।***

'प्रबोधन'च्या कामासाठी प्रबोधनकारांनी दादरमधल्याच खांडके बिल्डिंगमध्ये एक ब्लॉक भाड्याने घेतला होता. तिथे अनेक तरुण 'प्रबोधन'कारांकडे ओढले गेले. अभ्यास करण्यासाठी ते दिवसभर तिथेच असत. त्यातून स्वाध्यायाश्रम नावाची संस्था सुरू झाली. या तरुणांनी हुंडा विध्वंसन संघ स्थापन करून मुंबईत एक वादळच निर्माण केले होते. या संघटनेने प्रामुख्याने सीकेपी समाजातली हुंडा घेऊन होणारी लग्नं उधळून लावली. हुंडा निषेधाची गाणी गात मोठ्या मिरवणुका काढल्या. गाढवाच्या वराती घेऊन लग्नाच्या ठिकाणी हल्लाबोल केला. १९२२ -२३च्या लग्नसराईत २०-२५ लग्नात हुंडा विध्वंसन संघाने धुमाकूळ घातला होता. या आंदोलनाला 'प्रबोधन'चा सक्रिय पाठिंबा होता. खरंतर 'प्रबोधन'च्याच नेतृत्वात हे सुरू होते. हुंडा विरोधामागचा विचार 'प्रबोधन'नेच समजावून सांगितला होता. हुंडा घेऊन लग्न करणाऱ्यांची नावे 'प्रबोधन'मध्येच प्रसिद्ध होत.

## विविध अडचणी

साताऱ्यातून प्रकाशित झालेल्या तिसऱ्या वर्षाच्या १७व्या अंकातच पुढचा अंक पुण्यातून प्रकाशित होणार असल्याची घोषणा झाली. त्यानुसार सदाशिव पेठेत घर आणि बुधवार पेठेत छापखाना असा संसार त्यांनी थाटला. पण पुण्यातल्या काही सनातनी ब्राह्मणांनी मूळ मालकाला छापखाना प्रबोधनकारांना न देण्यासाठी उचकवले. त्याला बळी पडून त्याने छापखान्याला टाळे लावले. सनातन्यांनी 'प्रबोधन'च्या नावाची पाटीही भररस्त्यात जाळली. वर पुण्यात 'प्रबोधन'ला जाळून खाक करू अशी शेखी मिरवली. त्यामुळे पुण्यातच 'प्रबोधन'चा छापखाना उभारण्याची प्रतिज्ञा प्रबोधनकारांनी केली. प्रबोधनकारांनी नव्या छापखान्यासाठी कर्ज आणि देणग्या मिळवल्या. त्यातून सदाशिव पेठेत छापखाना उभा करण्याची तयारी झाली. पण प्रबोधनकारांनी मुंबईतून विकत घेऊन पाठवलेले ट्रेडल मशीनचे चाक रेल्वेने पुण्यात पोहोचेपर्यंत तुटले. तरीही धीर न सोडता प्रबोधनकारांनी भांडवल उभे करण्यासाठी धावाधाव सुरूच ठेवली. त्यासाठी मुंबईत असताना धावपळीमुळे

ते आजारी पडले. त्यातून बाहेर यायला चार महिने लागले. अर्धी मशिनरी पुण्यात, उरलेली अर्धी मुंबईत दुरुस्त होतेय, कारागिरांचे पगार थकलेत, उपचारासाठीही पैसे नाहीत अशी भयंकर परिस्थिती होती. पण यातून बाहेर येत १९२५च्या जानेवारीत ते कसेबसे पुण्याला पोचले. पुन्हा ‘प्रबोधन’ उभे करण्याच्या प्रयत्नांना लागले. पुढच्या चार महिन्यांत मशीन सात वेळा तुटले. इतरही अडचणी येतच राहिल्या. या सगळ्या अडचणींतून मार्ग काढत ९ महिन्यांच्या खंडानंतर ‘प्रबोधन’ १९२५च्या एप्रिल महिन्यात पुन्हा एकदा सुरू झाला. ‘प्रबोधन’ला देवाज्ञा झाली अशी टीका करणाऱ्यांना ‘प्रबोधन’ने नव्याने सुरुवात करून उत्तर दिले. चौथ्या महिन्याचा पहिला अंक हा आता पाक्षिक नसून मासिक होता. पानांची संख्या ४० होती.

पुढे नोव्हेंबर १९२७ पर्यंत ३२ महिन्यांत मासिक ‘प्रबोधन’चे २२ अंक निघाले. त्याचसोबत प्रबोधनकारांनी ३१ ऑगस्ट १९२७ पासून लोकहितवादी हे नवीन साप्ताहिकही सुरू केले. त्याचा शेवटचा तेरावा अंक पुण्याहूनच डिसेंबर १९२७ला निघाल्याचा उल्लेख शनिमाहात्म्य या पुस्तकामध्ये आहे. म्हणजे जून १९२४ ला पुण्यात आल्यापासून नोव्हेंबरमध्ये मुंबईत परतेपर्यंत प्रबोधनकार अनंत अडचणींवर मात करत आणि सनातन्यांच्या नाकावर टिच्चून ‘प्रबोधन’ जगवत राहिले.

## पुण्यातील संघर्ष

प्रबोधनकार पुण्यात होते, त्या काळात ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद अगदी टोकाला पोहोचला होता. ब्राह्मणेतर पक्षाचे नेते केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर त्यांना भेटण्यासाठी जवळपास दररोज ‘प्रबोधन’ कचेरीत येत. शिवाय लोकमान्य टिळकांचे सुपुत्र रामभाऊ आणि श्रीधरपंत हेही असत. त्यामुळे या सगळ्याचे सूत्रधार प्रबोधनकारच असल्याचा समज पुण्यात पसरला होता. विशेषतः देशाचे दुष्मन हे पुस्तक प्रबोधनकारांनीच लिहिले असल्याचे अनेकांना वाटत होते. प्रबोधनकारांचा छापखाना अगदी ब्राह्मणी वस्तीमध्ये असल्याने त्यांना या सगळ्याचा त्रास भोगावा लागत असे. एका सभेवरून घरी जाणाऱ्या सनातन्यांनी ‘प्रबोधन’च्या छापखान्यावर जाऊन जवळपास दोन तास शिव्याशाप दिले. कारखान्याच्या नावाचा फलक खाली पाडला. त्यानंतर पुढच्याच आठवड्यात ते पर्वतीजवळ फिरायला गेले असताना तीन चार जणांनी लाठीहल्ला केला. पण प्रबोधनकारांनी वॉकिंग




स्टिकमधली गुप्ती बाहेर काढल्याने ते पळून गेले. खोटी निमंत्रणपत्रिका बनवून छापखान्याला पोलिसी प्रकरणात अडकवण्याचा प्रयत्नही केला गेला. गोडबोले नावाचा एक गुंड प्रबोधनकारांना भेटायला आला. छापखान्यातल्या कामगारांमुळे तो काही करू शकला नाही. पुढे पोलिसांना सांगून त्याचा बंदोबस्त करावा लागला. त्यांच्या लिखाणाला प्रक्षोभक ठरवून कोर्टात जाण्याचेही प्रयत्न केले. छापखान्यात आगीचा गोळा टाकून कागदाच्या थप्प्यांना आगही लावण्यात आली. शिवाय मेलेली कुजलेली कुत्री दारासमोर फेकण्यात आली. एकदा तर मेलेले गाढवही टाकण्यात आले. अनेकदा पैसे देऊनही छपाईसाठी चांगला कागद मिळूच दिला जात नसे. तसंच पुण्यातल्या ब्राह्मण एजंटांनी ‘प्रबोधन’वर बहिष्कारही घालून बघितला. ‘प्रबोधन’चे अंक विकलात तर केसरी, ज्ञानप्रकाशचे अंक मिळणार नाहीत, असा दबाव त्यांनी विक्रेत्यांवर आणला. पण ‘प्रबोधन’ छापखान्यातल्या कामगारांनी चौकाचौकांत विकून त्यावर मात केली. तसेच चांगले कमिशन दिल्याने विक्रेतेही नरम पडले. अनेकदा तर अंक वाचकांपर्यंत जाऊ नयेत, यासाठी एकगठ्ठा विकतही घेतले जात. या सगळ्या अडचणींवर मात करत प्रबोधनकार पुण्यात ‘प्रबोधन’ चालवत होते. एका मोठ्या जातीचा, सत्ताधाऱ्याचा किंवा चळवळीचाही थेट पाठिंबा नसताना पुण्यात भिक्षुकशाहीच्या विरोधात संघर्ष करणे महाकठीण होते. त्यासाठी प्रबोधनकारांसारखा वीर योद्धाच हवा होता. खुद्द सदाशिवपेठेत राहून ब्राह्मणेतरी विचारांचे ‘प्रबोधन’चे २२ आणि लोकहितवादीचे १३ अंक प्रकाशित करणे, यासाठीची हिंमत कळण्यासाठी तो काळ समजून घ्यावा लागेल.

‘प्रबोधन’ जवळपास दोन वर्षं बंद होते. त्यानंतर तो १९२९च्या दसऱ्याला पुन्हा सुरू झाला. तो क्रांन्त्यंक असे नाव होते. किल्ल्यातून बाहेर येणारा वाघ त्यावर दिसत होता. प्रबोधनकार नावाच्या वाघानेही नव्याने डरकाळी फोडली होती. नोव्हेंबर १९२९ पासून मार्च १९३० पर्यंत ‘प्रबोधन’चे पाच अंक निघालेले दिसतात. त्यानंतर ‘प्रबोधन’चा अंक सापडत नाही.

‘प्रबोधन’च्या शेवटच्या पर्वात म्हणजे नोव्हेंबर १९२७ ते मार्च १९३० यादरम्यान ‘प्रबोधन’चे फक्त सहाच अंक निघालेले आहेत. पण त्यात वेगळे प्रबोधनकार दिसतात. मार्च १९३०च्या शेवटच्या अंकात ते लिहितात, ‘प्रबोधन निरीश्वरवादी आहे. त्याचे सत्यशोधन सत्यशोधक समाजाच्याही पुढे गेलेले आहे. देव मानवात दलाल नको, या काथ्याकुटापेक्षा देवालाच उखडला तर दलाल उरतोच कोठे?’ इथे ‘प्रबोधन’च्या लिखाणाचं एक वर्तुळ पूर्ण होते.

लेखक ज्येष्ठ पत्रकार असून prabodhankar.org या संकेतस्थळाचे संपादक आहेत.

# प्रबोधनाच्या वाटा...

**महाराष्ट्राला प्रबोधनाचा मोठा वारसा मिळाला आहे. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, प्रबोधनकार ठाकरे यांनी महाराष्ट्राची जडण-घडण करताना महाराष्ट्राला दिशा दिली. आज त्याच दिशेने महाराष्ट्र पुढे चालला आहे. महाराष्ट्रातील प्रबोधनाची ही वाटचाल एका ज्योतीने दुसरी ज्योत पेटवावी आणि त्यातून संपूर्ण समाज उजळून यावा यासारखीच आहे.**

**विजय चोरमारे**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या महाराष्ट्राच्या वाटचालीला आधुनिक काळात काळानुरूप दिशा दिली, ती महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी. फुले-शाहू-आंबेडकर-महर्षी शिंदे हे महाराष्ट्राच्या प्रबोधनपर्वाचे वाटाडे ठरतात. यांच्या खांद्यावर आधुनिक महाराष्ट्र उभा आहे. जोतिराव फुले यांनी ज्या काही आधुनिक समाजाच्या विषमताविरहित संकल्पना मांडल्या. त्यातील



**राजर्षी शाहू महाराज**


अनेक संकल्पनांची राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात अंमलबजावणी केली. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनीही तोच प्रेरणास्रोत मानून जातिनिर्मूलनाचे काम पुढे नेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेत त्यांचा अंतर्भाव करून संपूर्ण देशाला पुरोगामी दिशा देण्याचा प्रयत्न केला. अर्थात काळाचे चक्र उलटे फिरवणाऱ्या, काळासोबत बदल स्वीकारत पुढे जाणारे चाक रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्ती समाजात कार्यरत असतात. प्रत्येक काळात त्या असतात. त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात होत्या. महात्मा जोतिराव फुले यांच्या काळात होत्या. राजर्षी शाहू महाराजांच्या काळात होत्या आणि आजच्या काळातही आहेत.

महात्मा जोतिराव फुले यांच्या कामासंदर्भात खूप काही सांगता येते. त्यांच्या कामातील माणसाप्रतिची कमालीची करुणा आणि तळमळ लक्षात येण्यासाठी एकदोन उदाहरणे पुरेशी ठरतात. जोतिरावांच्या काळात बालवयात विधवा झालेल्या स्त्रियांच्यावर पुरुषांकडून अत्याचार होत असत. बहुतेक वेळा हे पुरुष त्यांच्या घरातलेच असत. बाहेर समाजात प्रतिष्ठित, धर्मोपदेशक वगैरे म्हणून मिरवणारे हे लोक आपल्याच घरातल्या अकाली वैधव्याची कुऱ्हाड कोसळलेल्या सुना, भावजयी वगैरे असाहाय्य तरुणींचा गैरफायदा घेत. अत्याचाराचे गंभीर परिणाम स्त्रियांना भोगावे लागत. घरातल्या कर्त्या पुरुषाने गरोदरपण लादलेल्या या विधवा स्त्रीपुढे दोनच मार्ग असत, एक भ्रूणहत्या आणि दुसरा आत्महत्या. खरेतर ज्यांनी जोतिराव आणि सावित्रीबाईंना त्रास दिला, त्यांच्या शिक्षण कार्यात अडथळे आणले त्याच लोकांच्या घरातल्या या स्त्रिया होत्या. परंतु या असाहाय्य स्त्रियांची वेदना जोतिराव-सावित्रीबाईंच्यापर्यंत पोहोचली तेव्हा त्यांनी १८६३ मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. त्यांच्या या कार्यामुळे अनेक तरुण विधवांच्या आत्महत्या, तसेच भ्रूणहत्या रोखल्या गेल्या. विधवांना नको असलेल्या बाळाचा सांभाळ स्वतः सावित्रीबाईंनी केला.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

विधवा स्त्रियांचे केशवपन ही त्या काळातील एक घोर अनिष्ट प्रथा होती. सावित्रीबाईंना या प्रथेबद्दल संताप होता. डोक्याचे केस गमावल्यामुळे विद्रूप बनावे लागणाऱ्या आपल्या भगिनींप्रति कमालीची करुणा वाटत होती. त्यामुळे या प्रथेविरूद्ध काही करण्यासाठी त्यांनी जोतिरावांकडे आग्रह धरला. त्यातून मार्ग काढण्यासाठी जोतिरावांनी नाभिकांचे संघटन केले. त्यांचे प्रबोधन केले आणि केशवपन प्रथेविरुद्ध नाभिकांचा संप घडवून आणला. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या केशवपनाचे घृणास्पद काम न करण्याचे आवाहन त्यांनी नाभिक समाजाला केले. नाभिक समाजानेही जोतिरावांच्या आवाहनाला चांगला प्रतिसाद दिला. या संपामुळे केशवपनाची प्रथा कमी




प्रबोधनकार ठाकरे

होण्यास मदत झाली. छोट्या छोट्या घटनांमध्ये मोठा आशय दडला असतो. त्याची परिणामकारकता मोजण्याची समाजाची परिमाणे वेगवेगळी असू शकतात. परंतु अत्यंत दबलेल्या घटकांच्या माणूसपणाचे जे दमन होत होते, ते रोखण्याचे, ते कमी करण्याचे काम या प्रयत्नातून झाले.

## ध्येयासाठी तडजोड नाही

महात्मा फुले यांच्या परंपरेचे तेवढेच सशक्त पाईक म्हणून प्रबोधनकार ठाकरे यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी ध्येयप्राप्तीसाठी कधीच तडजोड केली नाही. मग भले बालविवाहासारखी रूढी असो,



महात्मा जोतिराव फुले

मंदिरांमधील पुजाऱ्यांची अरेरावी, असो, अस्पृश्यता असो किंवा हुंडाप्रथेचा प्रश्न असो; अशा सर्व अनिष्ट बाबींविरोधात ते आक्रमकपणे लढत राहिले. त्यांच्या तत्त्वांपासून त्यांना परावृत्त करण्याचा अनेकांनी प्रयत्न केला, अनेक आमिषे दाखवली पण प्रबोधनकारांनी त्याला दाद दिली नाही. अन्याय्य रूढी, जाति-व्यवस्थेविरोधात वक्तृत्व, लेखन आणि प्रत्यक्ष कृती अशा तिन्ही मार्गांनी त्यांनी पुराणमतवाद्यांशी लढा दिला. धार्मिक पूजेचे विधी, उपासतापास, व्रतवैकल्ये आणि धर्म या नावाखाली सर्व जातींमध्ये जे रूढ परिपाठ आहेत, ते सर्व परिपाठ ब्राह्मणांनी आपल्या स्वतःच्या फायद्यासाठी प्रस्थापित केले आहेत. या दुष्ट रूढींमुळेच स्त्रियांवर, बहुजन समाजावर अन्याय होतो. अशिक्षित लोक या रूढींखाली भरडले जातात असे वाटल्याने त्यांनी या सर्व घटकांच्या मुळावर घाव घालण्याचे प्रयत्न केले.

त्यांनी हुंडाप्रतिबंधक चळवळही हाती घेतली होती. हुंडाप्रतिबंधक स्वयंसेवक सेना स्थापन करून अनेक वरपित्यांना त्यांनी घेतलेली हुंड्याची रक्कम परत देण्यास भाग पाडले.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीत केलेला प्राथमिक शिक्षणाच्या सक्तीचा कायदा, अस्पृश्यता निर्मूलनासाठी केलेले प्रयत्न त्यातील विशेषतः गंगाराम कांबळेला हॉटेल काढायला लावून तिथे स्वतः चहा प्यायला जाणे, फासेपारध्यांसारख्या भटक्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करणे यातून शाहू महाराज जोतिरावांचीच वाट अधिक विस्ताराने पुढे नेत असल्याचे दिसून येते.

## प्रबोधनाची परंपरा कायम

प्रबोधनाची हीच परंपरा पुढे सुरू ठेवण्याचे काम अनेक व्यक्ती व संस्थांनी केले. अलीकडच्या काळात अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे त्यातील योगदान विशेष उल्लेख करण्याजोगे आहे.

गणपती उत्सव हा महाराष्ट्राचा लोकोत्सव आहे. या लोकोत्सवात आधुनिक काळात काही अनिष्ट प्रथा घुसल्या होत्या. त्या दूर करण्याची आवश्यकता होती. शिवाय कालानुरूप काही प्रथा थांबवण्याचीही आवश्यकता होती. गणेशमूर्ती नदीत विसर्जित केल्यामुळे नदीचे पाणी प्रदूषित होते आणि त्याचा परिणाम जलचरांच्या परिसंस्थेवर तसेच मानवी आरोग्यावरही होत असल्याचे अनेक अभ्यासांतून आढळून आले. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती, त्यांना दिलेले रसायनयुक्त रंग, मूर्तीसोबतचे निर्माल्य हे सगळेच पाण्याचे प्रवाह दूषित करणारे होते. त्या संदर्भात प्रबोधन सुरू करण्यात आले. शाडूची मूर्ती बसवण्याचे आवाहन करण्यात येऊ लागले. केमिकलयुक्त रंग न वापरण्याची जोड त्याला देण्यात आली. निर्माल्य नदीत न टाकण्याचे आवाहन केले जाऊ लागले आणि त्यासाठी स्वतंत्रपणे निर्माल्यकुंडाची व्यवस्था करण्यात आली. प्रबोधन टप्प्याटप्प्याने करायचे असते. एकदम मोठा धक्का देण्याचा प्रयत्न केला तर त्याचा उलटा परिणाम होऊ शकतो. विशेषतः धार्मिक बाबींमध्ये विशेष काळजी घ्यावी लागते. त्यामुळे निर्माल्य नदीत टाकू नका, या मोहिमेचे रूपांतर पुढे मूर्ती नदीत टाकू नका इथपर्यंत पोहोचले. अंधश्रद्धा निर्मूलन समितीने 'विसर्जित मूर्ती दान करा' ही मोहीम सुरू केली. विसेक वर्षांपूर्वी कोल्हापुरात ही मोहीम सुरू झाली तेव्हा तिला मिळणारा प्रतिसाद अत्यल्प स्वरूपाचा होता. पहिल्या वर्षी जेव्हा ही मोहीम सुरू झाली, तेव्हा दान केलेल्या मूर्तींची संख्या तीन आकड्यांपर्यंतही पोहोचली नव्हती. त्या वेळी मूर्तिदान करण्याचे आवाहन करणारी मंडळी

धर्मविरोधी असल्याची टीका केली जात होती. मूर्ती दान न करता नदीत वाहत्या पाण्यात विसर्जित करा, असे आवाहन करणारी मंडळी नदीवर उन्मादाने झेंडे नाचवत होती. परंतु काळाबरोबर लोकांना कर्मकांडातले फोलपण उमगत गेले, पाणी प्रदूषणाच्या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आले आणि हळुहळू मूर्तिदान उपक्रमाला प्रतिसाद मिळू लागला. आता कोल्हापूरसारख्या शहरात विसर्जित मूर्ती दान करण्याचा आकडा पन्नास हजारांच्यावर गेला आहे. याचा अर्थ योग्य-अयोग्य काळाच्या पातळीवरच ठरत असते आणि चांगल्या गोष्टींचा लोक स्वीकार करत असतात. आज संपूर्ण राज्यभर ही मोहीम राबवली जाते आणि लाखो लोक आपली मूर्ती दान करतात. शेकडो लोक घराच्या अंगणातच मूर्ती विसर्जित करतात. वीस वर्षांपूर्वी होणाऱ्या आरोपांना आणि तीव्र विरोधाला घाबरून मंडळींनी आपले प्रयत्न थांबवले असते, तर महाराष्ट्र आज समजुतीच्या पातळीवर एवढ्या उंचीवर पोहोचला नसता. प्रबोधन परंपरेचे आपण खरेखुरे पाईक आहोत, हे सिद्ध करण्याची संधी महाराष्ट्राच्या जनतेला मिळाली नसती.

## जनमानस तयार होतेय

दक्षिण महाराष्ट्रासह कर्नाटकच्या सीमाभागात दीर्घकाळ देवदासी प्रथा होती. या प्रथेने अनेक स्त्रियांच्या आयुष्याची वाताहत झाली. केवळ अनिष्ट प्रथा आणि अंधश्रद्ध समाजामुळे स्त्रियांच्या वाट्याला उपेक्षा, अवहेलना आणि शोषण आले. या प्रथेविरुद्ध मोठ्या चळवळी झाल्या. सीमाभागात रमेश शिपूरकर, प्रा. सुभाष जोशी, अच्युत माने वगैरे मंडळी तसेच कोल्हापूर जिल्ह्यात प्रा. विठ्ठल बन्ने, आनंद वास्कर, राजन गवस आदी मंडळींनी ही चळवळ पुढे नेली. देवदासी सोडण्याच्या अनिष्ट प्रथांविरुद्ध प्रबोधन, महिलांना त्यापासून परावृत्त करणे आणि त्याचबरोबर जटानिर्मूलन असे या चळवळीचे स्वरूप होते. या प्रथेचे पूर्ण उच्चाटन झाले नसले तरी त्याची अनिष्टता लोकांच्या मनावर बिंबली आहे आणि बऱ्यापैकी प्रथेला आळा बसला आहे. आजच्या काळातही त्या संदर्भातील प्रबोधनाचे काम ठिकठिकाणी सुरू आहे. कराडचे डॉ. सुधीर कुंभार आजही या चळवळीत सक्रिय आहेत. त्यांनी व्यक्तिशः आजपर्यंत सुमारे सव्वाशे महिलांच्या जटा सोडवल्या आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रत्येक केसमध्ये जटा असण्याची, ती ठेवण्याची कारणे वेगवेगळी असतात. अशा व्यक्तींचे समुपदेशन करून जटा सोडवण्याची पद्धती, त्यांना समजावून सांगायची पद्धती भिन्नभिन्न ठेवायला लागते.त्यांनी सांगितलेले एक उदाहरण खूपच बोलके आहे.

एका श्रीमंत स्त्रीला अस्वच्छतेमुळे व केसांची निगा न राखल्यामुळे जटा आल्या. त्यावेळी तिचे वय साधारण पन्नास वर्षे असावे. सुखी संसार असलेल्या या महिलेच्या डोक्यावर पंधरा वर्षांपूर्वी जटांचा गठ्ठा तयार झाला होता. जटांचा हा टोप ही महिला अभिमानाने मिरवत होती. भात काढणीच्या वेळी घरातील आणि शेतातील कामाचा खूप व्याप असतो. त्या कालावधीत या महिलेने केस विंचरले नसावेत. या जटा नवीन असल्यामुळे तयार झाल्यावर समजले नसावे. केसावर पाणी न घेतल्यामुळे तसेच बांधून ठेवलेले केस ती सोडायची विसरली असावी. तसेच बांधून ठेवलेले केस पुढे एकमेकात गुंतले आणि त्याच्या जटा झाल्या. जटांमुळे डोकेदुखी, अर्धशिशी, मान दुखणे, डोळ्यांचा त्रास, सर्दी अशा बाबी कायम होत असतात, तसेच कंबरदुखीचा त्रास होतो; पण या महिला असा त्रास अंगावर काढतात. जटाधारी महिलांना पाठीवर झोपताच येत नाही. जटा भिजल्या, तर त्यामध्ये वाढलेल्या बुरशीमुळे सतत वासाचा त्रास होतोच. त्यातच ऊवा व लिखांचा त्रास सुरू झाल्यास रक्तातील हिमोग्लोबीन कमी होते. यामुळे अशक्तपणा येतो, हिमोग्लोबीन कमी असल्यामुळे चक्कर आणि थकवा येण्यासारख्या बाबी सुरू होतात. पंधरा वर्षांनंतर या महिलेचे जटानिर्मूलन करण्यात आले. स्त्रियांच्या या त्रासाविरुद्धची ही मोहीम आजच्या काळात फारशी गाजावाजा होत नसली तरीही एक महत्त्वाची मोहीम आहे, हे लक्षात घ्यावे लागते.

## विज्ञाननिष्ठेने व्यवहार

खूप छोट्या-छोट्या घटना असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रभावातून तयार झालेले जुने जाणते कार्यकर्ते ज्या विज्ञाननिष्ठेने व्यवहार करतात ते पाहिले तर थक्क व्हायला होते. साध्या-साध्या माणसांची विज्ञाननिष्ठा आणि तर्कशुद्ध जीवनशैली अनेकदा विस्मयचकित करून जाते.

तीसेक वर्षांपूर्वीची घटना मला आठवतेय. कोल्हापुरात आंबेडकरी चळवळीचे अनेक छोटे मोठे कार्यक्रम व्हायचे. छोट्या बैठका, कार्यक्रम कव्हर करावे लागायचे. आजच्यासारखे प्रेसनोट जर्नालिझम तेव्हा नव्हते. असाच एक कार्यक्रम कव्हर करायला गेलो होतो. पंचवीस तीस लोकच असतील. शंकरराव आवळे नामक ज्येष्ठ आंबेडकरी कार्यकर्ते बोलत होते. त्या वेळी त्यांचे वय सत्तरेक वर्षे असावे. सफेद दुटांगी धोतर, तीन बटणाचा पिवळसर रंगाचा नायलॉनचा शर्ट असा स्वच्छ पेहराव. समोर किती लोक आहेत याचा विचार न करता ते पोटतिडकीने बोलत होते. धर्मातील चुकीच्या गोष्टींवर बोलताना ते म्हणाले, ‘अरं लोकं चंद्रावर फिरायला जायला लागलेत, तरी अजून ही लोकं चंद्राची पूजा करतात.’ मोजक्या इयत्ता शिकलेल्या शंकररावांचे ते वक्तव्य त्यांच्यातील विज्ञाननिष्ठेचा पुरावा होता.

महाराष्ट्रात मराठा समाजात माणसाच्या मृत्यूनंतरचे विधी तेरा दिवस असतात. या काळात ते सगळे कुटुंब कामधंदा सोडून घरी थांबते. सुतकामुळे भावकीची कामे खोळंबतात. त्यासंदर्भात साकल्याने विचार करून काही भागांमध्ये मराठा समाजाने पाचव्या दिवशीच सर्व विधी उरकण्याचा निर्णय घेतला. एका अर्थाने हेसुद्धा प्रबोधनाचे महत्त्वाचे पाऊल आहे.

प्रबोधन परंपरेमध्ये असे अनेक छोटे-मोठे टप्पे येत असतात. अनेक वळणे येत असतात. महापुरुषांनी केलेल्या कामांचा गौरव करत असताना अनेकदा या छोट्या प्रयत्नांकडे दुर्लक्ष होत असते. खरेतर प्रबोधनाच्या या पायवाटाच समाजाला उत्कर्षाच्या, प्रगतीच्या हमरस्त्यावर घेऊन जात असतात!

लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.


# पत्रकार घडवणारे प्रबोधनकार

**प्रबोधनकार ठाकरे यांनी आपल्या लेखणीने सामाजिक सुधारणा घडवून आणल्याच पण त्याचबरोबर त्यांनी महाराष्ट्रात अनेक माणसे घडवली. समाजाला दिशा देणाऱ्या या विचारवंताने अनेकांच्या जीवनाला कलाटणी दिली. ज्येष्ठ पत्रकार पंढरीनाथ सावंत यांना प्रबोधनकार ठाकरे यांचा सहवास मिळाला आणि त्यांचे एकूण आयुष्य बदलले. चित्रकार होण्याचे स्वप्न बघणाऱ्या पंढरीनाथ सावंत यांच्यातील पत्रकार हेरून त्याची जडणघडण करून पुन्हा समाजकार्यासाठी त्यांना समाजाच्या स्वाधीन करणारे प्रबोधनकार हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडणीचे अग्रगण्य नेते होते.**

**पंढरीनाथ सावंत**

आपण मोठेपणी कोण व्हायचे याची स्वप्ने रंगविण्याचे एक वय असते. त्या वयात अनेक स्वप्ने रंगवली. त्यात चित्रकार होण्याचेसुद्धा नव्हते पत्रकार होण्याचे तर नव्हतेच नव्हते. जी स्वप्ने पाहिली नाहीत अशा अनेक गोष्टी केल्या. एका अवघड डोंगरावर शाळामास्तर झालो. मग मुंबईमधल्या एका कंपनीत हेल्पर म्हणजेच हमाल झालो ते काम सुटल्यावर गणपती रंगवणे, बेस्टमध्ये कंडक्टर झालो. त्या वेळी चित्रकार होण्याचे स्वप्न मनात बाळगून होतो, पण फक्त बाळगून होतो, चित्रे काढता येऊ लागली होती.

आमच्या घराण्यात आजोबा लष्करात होते. वडील आधी लष्करात होते. मग पोलिसात होते. डेप्युटी इन्स्पेक्टर म्हणून निवृत्त झाले आणि आम्ही आमच्या गावी राहायला गेलो. आमचे घर ब्राह्मण आळीच्या एका टोकाला होते. मुलांना ज्या वयात नाना तऱ्हेचे खेळ खेळायचे वेड असते त्याच वयात मला चित्रकलेच्या वेडाने कसे झपाटले ते सांगायला हवे. आमच्या पुढचे घर दत्तूबुवा जोशी यांचे होते. त्यांचा मुलगा वसंता हा आमचा पुढारी. त्याच्या अंगात अनेक कला होत्या. तो आमच्याकडून काही ना काही उपक्रम करून घ्यायचा. गणपती गेले की, कुंभार डोहात बुड्या मारून त्या आणणे आमचा उद्योग असायचा. वसंता त्या मूर्तीपासून पुन्हा माती करून त्याचे ठोकळे बनवून ठेवायचा. मग त्या मातीचे पुराणातल्या कथांवर देखावे बनवायचे. उदा. दुष्यंत-शकुंतला, सीताहरण, विश्वामित्र-मेनका वसंताला म्हणजेच अण्णाला पुतळे बनवण्याचे



शिक्षण नसताना तो पुतळे इतके प्रमाणबद्ध अन् अप्रतिम व्यवस्थित बनवायचा की, पाहत राहावेसे वाटे. ते पाहून मलासुद्धा मूर्तिकार व्हावे, असे वाटायला लागले. मी खूप प्रयत्न केला पण त्याची निष्पत्ती भेसूर होत असल्याचे पाहून चित्रे तरी काढून पाहू या, असा विचार करावयाला लागलो.

ते साल होते १९४४ स्वातंत्र्य तीन वर्षे दूर होते. पण स्वातंत्र्याची भावना खेड्यापाड्यापर्यंत गेली होती. जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन असे एक पंचायतनाचे कॅलेंडर होते. पत्री सरकारच्या नाना पाटलांचेही एक कॅलेंडर होते. महात्मा गांधीजी, सुभाषबाबू यांची कॅलेंडरे घरोघरी होती. तशी ती आमच्या घरीही होती. इतकेच काय आमच्या शाळेचे हेडमास्तर विद्वांस प्रभात फेऱ्या काढत. त्यात जी गाणी म्हणत ती स्वातंत्र्याची असत. अशा कॅलेंडरवरील चित्रांची नक्कल पेन्सिलीने करायला लागलो, आणि आश्चर्याची बाब म्हणजे ती जमायलाही लागली. सातवी, म्हणजे व्हर्नाक्युलर फायनल होईपर्यंत गणपतीची आखणी म्हणजे डोळा, दीड दात, मुकुटावरील रत्ने, बायांचे ओठ रंगवू लागलो आणि माझ्या मनाला चित्रकार होण्याचे वेड लागले. पण जेव्हा नोकरी करण्याचा प्रश्न आला तेव्हा प्रथम शाळामास्तर, त्यानंतर मुंबईत हेल्पर, गणपती पेंटर, बस कंडक्टर अशा नोकऱ्या कराव्या लागल्या. चित्रकार होण्याचे स्वप्न विरजते न विरजते तो पुन्हा आले. त्याचे असे झाले, वडाळा डेपोच्या तिकीट अँड कॅश डिपार्टमेंटचे प्रमुख जयवंतराव देशमुख यांना मी चित्रे काढतो हे माहीत होते. एकदा जनरल मॅनेजर घाटेसाहेब डेपोत आले असताना तिकिटाच्या कोऱ्या स्लिपवर त्यांचे स्केच केले. ते देशमुख साहेबांना दाखवले. त्यांनी ते ठेवून घेतले मग एक दिवस माझ्या टाईमकार्डला चिठ्ठी लागते. अमुख तारखेला अमुख वाजता जीएम म्हणजे जनरल मॅनेजर यांच्यासमोर हजर राहावे. यावर काही मित्र कंडक्टरांचे म्हणणे पडले की, जीएमची चिठ्ठी म्हणजे तुला नारळ मिळणार. पण तसे झाले नाही. जीएम साहेबांनी माझी भरपूर चौकशी केली. आता मला दिवसा चित्रकला शिकता यावी, यासाठी एकदम शेवटची १८.४५ची ड्युटी कायम लावून दिली. देशमुख साहेब डेपो मॅनेजर किर्तीकर साहेब यांनी मला दादरच्या मॉडेल इस्टिट्यूटमध्ये दाखल केले. तो डिप्लोमा पूर्ण व्हायच्या आधी डी.टी.सी. हा चित्रकला शिक्षकाचा डिप्लोमा केला पण माझे चित्रकार होणे व्हायचे नव्हते. देशमुख साहेबांचे माझे संबंध चांगले होते. त्यांचा मुलगा श्याम एक दिवस मला म्हणाला,

''चला येता का ठाकरेंकडे''

गेलो, बाळासाहेब आतल्या खोलीत मार्मिकचे काम करत होते. प्रबोधनकार बाहेरच्या खोलीत काहीतरी टाईप करत होते. श्याम त्यांना सहज म्हणाला हा पंढरीनाथ सावंत. जाम वाचलो, अक्षर एकदम टाइप केल्यासारखे.

''वा! येता का माझ्याकडे''

माझ्या डोक्यात हजार बल्ब पेटले, मी हो कधी म्हणालो, ते आठवत नाही. पण तिसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता हजर झालो. तेवढ्या अवधीत राजीनामा दिला होता. दादांनी - म्हणजे प्रबोधनकारांनी सांगितले होते, ९ म्हणजे ९ उशीर झाला तर जमायचं नाही. सबब चालणार नाही. शाम मला बोलला होता की, दादा किती शिस्तीचे व वक्तशीर आहेत ते. अशा प्रकारे चित्रकार राहिला बाजूला माझ्या पत्रकारितेचा प्रवास सुरू झाला. पण मला त्या वेळी कळले नाही. पहिल्या दिवशी दादांनी मला अग्रलेखाचे शुद्धलेखन तपासण्याचे काम दिले. मी. व्ह. फा. म्हणजेच व्हर्नाक्युलर फायनल असल्याने अगदी ऱ्हस्व, दीर्घ, विरामचिन्हांपर्यंत सगळे बरोबर होते. माझे हे काम बघून दादा म्हणाले,

''चला हाकलून लावण्याचे कष्ट वाचले.''

माझी नेमणूक दादांचे सांगणे लिहून घेण्याची होती, पण ते कधी कधी असे काही बोलत की मला नंतर शेवटपर्यंत उपयोगी पडत.

आपण अग्रलेख लिहितो खरे पण ज्या बातमीवरून लिहितो ती १०० टक्के खरी आहे की, तिच्यात काही खोट आहे हे कळायला काही मार्ग नसतो. माझ्यासारख्या बिछान्याला बूड टेकून बसणाऱ्याला हे कसं कळणार. खरं म्हणजे पत्रकाराने शहानिशा करून लिहिले पाहिजे. मी त्यांचे हे शब्द कधीच विसरलो नाही.

एक दिवस मला म्हणाले, आज जरा माझा मूड नाही. संपादकीय लिहिशील? मी हो म्हणालो आणि लिहिले. तो लेख वाचून दादा हसत सुटले. मग म्हणले ही विष्णुशास्त्र चिपळूणकरांची भाषा तुझ्या बापाला तरी कळेल काय? सोपं एकदम सोपं लिहायला पाहिजे गिरणी कामगाराला, घरगड्यालासुद्धा कळलं पाहिजे. पुन्हा असलं अभद्र लिखाण माझ्याकडे आणू नको.

हळूहळू मी बाळासाहेबांच्या सभा दौरे यावर लिहू लागलो. ते दादांना आवडायचे- मग बारीक-बारीक लेख लिहू लागलो. पथ्य एकच सत्याकडे जाणे, बोगस स्तुतिपाठ नको, योग्य तिथे टवाळी पण चालेल. दादा मला माझ्या नकळत पत्रकार बनवत होते; पण मला कळत नव्हते. माझे 'टोचा' हे सदर त्यांचीच फर्माइश होती. असा काळ जात होता. अगदी एक दिवस काम आटोपल्यावर मला म्हणाले, उद्या तयारीने ये. मला कळले नाही. दुसऱ्या दिवशी आलो तर म्हणाले,

''आत्तापर्यंत कोंबडीच्या पिलासारखं माझ्या पंखाखाली होतास, मोकळ्या जगात जा आणि मी शिकवले तसे काम कर.'' त्यांनी एका कागदावर लिहिलं,

'बाळ मी पंढरीला मोकळं केलंय, अडवू नये.'

तो कागद बाळासाहेबांना दाखवायला सांगितला.

दाखवला! बाळासाहेब म्हणाले, ''दादांच्या पुढे मी काय बोलणार, या!''

असे दादांनी मला पत्रकार बनवले. त्यांनी मला एक कानमंत्र-दिला होता. बड्या वृत्तपत्र साखळीत-टेबलच्या खुराला बांधून घेऊ नकोस. ते मी पाळले. माझा मी वार्ताहर, माझा मी फोटोग्राफर, सगळा माझा मी झालो. दादांनी माझ्या नशिबातला 'चि' काढून तिथे 'प' टाकला. असे मी चित्रकाराचा पत्रकार झालो. त्यानंतर मी ब्लिटझ्, प्रभंजन, नागपूर लोकमत, औरंगाबाद लोकमत, पुढारी आणि परत मार्मिक यात अशा प्रकारे ५३ वर्षे काढली.

**लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.**




**जपानची राजधानी टोकियो शहरात नुकत्याच पार पडलेल्या पॅराऑलिंपिक स्पर्धा २०२० मध्ये देशातील खेळाडूंनी उत्तम कामगिरी करून देशाची मान उंचावली आहे. या स्पर्धेसाठी देशातून १८ क्रीडा प्रकारात १२६ खेळाडूंनी देशाचे प्रतिनिधित्व केले. यामध्ये महाराष्ट्रातील ८ खेळाडूंचा समावेश होता. पदक विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन.**

## पॅराऑलिम्पिक स्पर्धेतील पदक विजेते

| विजेत्यांची नावे | पदक | खेळाचा प्रकार |
|---|---|---|
| भाविनाबेन पटेल | रौप्य | टेबल टेनिस |
| निशाद कुमार | रौप्य | उंच उडी |
| अवनी लेखरा | सुवर्ण | नेमबाजी, १० मीटर एअर रायफल शुटींग |
| देवेंद्र झाझरिया | रौप्य | भालाफेक |
| सुंदरसिंह गुर्जर | कांस्य | भालाफेक |
| योगेश कथुनिया | रौप्य | थाळीफेक |
| सुमित अंतिल | सुवर्ण | भालाफेक |
| सिंहराज अधाना | कांस्य | नेमबाजी, १० मीटर पिस्टल शुटींग |
| मरिअप्पन थंगवेलू | रौप्य | उंच उडी |
| शरद कुमार | कांस्य | उंच उडी |

| विजेत्यांची नावे | पदक | खेळाचा प्रकार |
|---|---|---|
| प्रवीण कुमार | रौप्य | उंच उडी |
| अवनी लेखरा | कांस्य | नेमबाजी, ५० मीटर रायफल शुटींग |
| हरविंदर सिंग | कांस्य | धनुर्विद्या |
| मनीष नरवाल | सुवर्ण | नेमबाजी |
| सिंहराज अधाना | रौप्य | नेमबाजी, ५० मीटर पिस्टल शुटींग |
| प्रमोद भगत | सुवर्ण | बॅडमिंटन |
| मनोज सरकार | कांस्य | बॅडमिंटन |
| सुहास यथिराज | रौप्य | बॅडमिंटन |
| कृष्णा नागर | सुवर्ण | बॅडमिंटन |

## • सर्व विजेत्या खेळाडूंचे महाराष्ट्रातर्फे अभिनंदन •



**श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे**
मा. मुख्यमंत्री



**श्री. अजित पवार**
मा. उपमुख्यमंत्री



**श्री. बाळासाहेब थोरात**
मा. महसूल मंत्री



**श्री. सुनील केदार**
मा. क्रीडा मंत्री



**कु. आदिती तटकरे**
मा. क्रीडा राज्यमंत्री

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / **TO**

**O.I.G.S.** भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य **LOKRAJYA**

***If undelivered, please return to:***

प्रेषक / **From**

**अनिल आलूरकर**
**उपसंचालक** (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंट प्लस प्रा.लि., ई-१, जय जलाराम इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१ ३११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक: डॉ. दिलीप पांढरपट्टे